कि
बा. वा.
नों. क्र. ८९८

# स्वातंत्र्योत्तर माझा भारत

१५ ऑगस्ट १९४७ ते १५ ऑगस्ट १९७२ या
पंचवीस वर्षांतील स्वतंत्र भारताची वाटचाल

राजा मंगळवेढेकर

म. सं. मं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
८९७ दिनांक .....
अनिरुद्ध साहित्य
किशोर क्र. 395

● अनिरुद्ध साहित्य : ६

● **स्वातंत्र्योत्तर माझा भारत**
राजा मंगळवेढेकर

● मुखपृष्ठ
**सुभाष अवचट**

● आतील चित्रे
**दिगंबर दत्तात्रय बापट**

● प्रथमावृत्ति
२ ऑक्टोबर १९७२

● सर्वाधिकार
**राजा मंगळवेढेकर**

**प्रकाशक**
गजानन दामोदर क्षीरसागर
अनिरुद्ध साहित्य
१४९३ क, सदाशिव, पुणे ३०.

**मुद्रक**
सौ. कमल रामचंद्र घळसासी
संजीव मुद्रणालय
४६९ सदाशिव, पुणे ३०.

**मूल्य पाच रुपये**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. ...१९८... दिनांक .......
विषय ...किशोर... क्र. ...३९५.

**प्रिय भाऊसाहेब रानडे**

तुमच्या आरडाओरडीमुळे
बेशिस्तीलाही शिस्त लागली.

BVBK-0400818

# स्वातंत्र्योत्तर

१५ ऑगस्ट १९४७ ते
१५ ऑगस्ट १९७२
भारतीय स्वातंत्र्य पंचवीस वर्षांचे झाले.
भारत स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सव साजरा करीत आहे !
आजची तरुण पिढी भाग्यवंत आहे.
या तरुणांचा जन्मच मुळी ' स्वतंत्र भारतात ' झाला.
जन्मल्याबरोबर मुक्त देशातल्या मुक्त हवेचा श्वास त्यांना घेता आला.
मुक्त वारे, मुक्त तारे, डोंगर-दऱ्या, शेत-मळे, आकाश-पाताळ,
समुद्र-सरिता....सारेच त्यांच्यापुढे मुक्त आहे.
आणि तेही मुक्त-स्वतंत्र आहेत.
शरीरधारणेला अन्न-पाणी, हवा जितकी आवश्यक
तितकेच राष्ट्राला स्वातंत्र्य आवश्यक.
स्वातंत्र्य म्हणजे सर्वस्वच !

**तुजसाठी मरण ते जनन**
**तुजवीण जनन ते मरण**

अशा भावनेने स्वातंत्र्यवीरांनी जीवनाचा होम केला.
स्वातंत्र्य पंचवीस वर्षांचे झाले, पण

☆ ☆ ☆

# माझा भारत

ही भगवती स्वतंत्रता प्रसन्न व्हावी यासाठी
शे-सव्वाशे वर्षांचे अनुष्ठान या देशी मांडलेले होते.
यात अनेकांनी अनेक प्रकारांनी आपला हविर्भाग दिला,
कारावास, देहदंड भोगला, संसार वाऱ्यावर उधळले,
लाठ्याकाठ्यांचे वार झेलले.
संगिनींच्या नि तोफांच्या पुढे देहाची चाळण केली,
हसत हसत कंठाशी फास आवळून घेतले....
अपूर्व शौर्य, अपूर्व साहस आणि अपूर्व देशभक्ती यांनी
हा कालखंड मंत्रित झालेला आहे.
१० मे १८५७ रोजी भारतीय स्वातंत्र्य युद्धाची ठिणगी पडली.
त्या ठिणगीने धगधगत्या उज्ज्वल ज्वालेचे स्वरूप धारण केले
आणि १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य तिच्यातून अवतरले !
जे स्वप्न होते ते सत्य झाले !
स्वराज्याकडून सुराज्याकडे-अशी वाटचाल सुरू झाली
नवभारताच्या उभारणीला प्रारंभ झाला.
पंचवीस वर्षांतील स्वतंत्र भारताच्या वाटचालीचा
हा ललित शब्दबद्ध आलेख

☆ ☆ ☆

| | |
|---|---|
| नवे पर्व | ७ |
| काश्मीरचे रणकंदन | १६ |
| जुनागडचे दुखणे | २७ |
| राष्ट्रपित्याचा अंत | ३२ |
| हैद्राबादचे विलिनीकरण | ३८ |
| प्रजासत्ताक भारत | ४३ |
| स्वतंत्र भारताचे आर्थिक नियोजन | ४९ |
| पुढची वाटचाल | ५४ |
| भाषिक संघर्ष | ६२ |
| भारताचे परराष्ट्रीय धोरण | ६९ |
| पंचवार्षिक योजना | ७५ |
| नवी तीर्थक्षेत्रे | ८० |
| गोमंतकाची मुक्ति चळवळ | ८६ |
| मधल्या घडामोडी | ९४ |
| चीनचे आक्रमण | १०२ |
| नेहरू पर्व संपले | ११२ |
| दुसरे पंतप्रधान | ११७ |
| भारत-पाक युद्ध | १२१ |
| इंदिरा युग | १३१ |

# नवे पर्व

१५ ऑगस्ट १९४७

भारत स्वतंत्र झाला. परकीय सत्तेच्या अंताचा आरंभ झाला. सुमारे दीड-दोन शतकांनंतर भारताचा पृथ्वीच्या पाठीवर ' स्वतंत्र राष्ट्र ' म्हणून पुनरपी जन्म होत होता. भारत, दीर्घकालीन पारतंत्र्याच्या गुदमरून टाकणाऱ्या अंधारातून, मुक्त होऊन स्वातंत्र्याच्या प्रकाशात न्हात होता. नव्या जीवनाचा श्वास घेऊ लागला होता. नव्या युगाची नवी वाट चालू लागला होता.

आझादीच्या वाऱ्याने तरुण मने उन्मादित झाली होती, तर वृद्धांना कृतकृत्य झाल्याचे समाधान वाटत होते. कालचे गुलाम आज स्वतंत्र झाले होते. कालचे शासक आज सेवक बनले होते. स्वतंत्र भारताचे व्हाइसरॉय म्हणून अधिकारसूत्रे हाती घेताना लॉर्ड मौंटबॅटन म्हणाले, "मला आता तुम्ही आपल्यापैकीच समजा."

कालचक्र फिरत आहे ! ते केव्हा, कसे दिवस दाखवील याची कल्पनाच करवत नाही. म्हणून तर सत्ताग्रहण कर-

ताना पं. जवाहरलाल नेहरूंसारखा इतिहासाचा अभ्यासकसुद्धा स्तिमित होऊन गेला. भरतभूमीचा विशाल, विस्तीर्ण कालपट त्यांच्या डोळ्यांपुढे उभा राहिला. ते म्हणाले,

" आज एका युगाचा अंत होत असून आपण एका नवीन युगात प्रवेश करीत आहोत. या प्रसंगी माझे मन, भारताच्या महान भूतकाळाकडे वेधले जात आहे. पाच सहस्त्र वर्षांचा भूतकाळ माझ्या नजरेपुढून गर्दीने सरकत आहे. माझे मन थरारून गेले आहे. इतिहासाच्या प्रभावकाळी भारताने आपल्या कधीही न संपणाऱ्या शोधास प्रारंभ केला. या शोधात, झगड्यात त्याच्या यशापयशांनी न मळलेल्या वाटेची शतकानुशतके भरून गेली आहेत. सुदैव आणि दुर्दैव यांना समान लेखून भारताने आपला शोध कधीही दृष्टीपथाबाहेर जाऊ दिला नाही. किंवा त्याला सामर्थ्य देणाऱ्या ध्येयांचा त्याला कधी विसर पडला नाही. दुर्दैवाच्या कालखंडाची आज समाप्ती होत असून, भारताला पुनः आपले सत्त्व गवसत आहे. ज्या कामगिरीचा उत्सव आपण आज साजरा करीत आहोत, ते केवळ एक पाऊल आहे. अधिक मोठ्या विजयाच्या आणि कर्तृत्वाच्या संधीचे हे फक्त प्रवेशद्वार आहे. ही संधी हस्तगत करण्याइतके आणि भविष्याचे आव्हान स्वीकारण्याइतके शूर आणि शहाणे आपण आहोत का ? स्वातंत्र्य आणि सत्ता यांच्या अनुषंगाने जबाबदारीही येते.

भारताची सेवा म्हणजे पीडित अशा कोट्यवधींची सेवा. याचाच अर्थ दारिद्र्य आणि अज्ञान, रोगराई आणि संधीमधील विषमता यांचा अंत. आपल्या पिढीतील सर्वश्रेष्ठ पुरुषाची महत्त्वाकांक्षा प्रत्येक नेत्रातील अश्रू पुसण्याची आहे. ते कदाचित आपल्या शक्तीपलीकडचे असेल, पण जोवर अश्रू आणि हालअपेष्टा अस्तित्वात

आहेत, तोवर आपले प्रदीर्घ कार्य पुरे होणार नाही. "

पंधरा ऑगस्टचा दिवस दिल्लीत आणि सर्व देशभरच स्वातंत्र्योत्सव साजरा करण्यात, धामधुमीत गेला.

१६ ऑगस्ट रोजी सकाळी दिल्लीतील लाल किल्ल्यावर पं. जवाहरलालजींच्या हस्ते झेंडावंदन झाले.

स्वतंत्र भारताला भारताच्या घटना परिषदेने तिरंगी राष्ट्रध्वज दिला आहे. या तीन रंगांचा तत्त्वज्ञानात्मक अर्थ सर्वपल्ली डॉ. राधाकृष्णन यांनी लावला, तो असा—

> भगवा रंग, त्याग व निःस्पृहता यांचे प्रतीक आहे. आपल्या पुढाऱ्यांनी लौकिक लाभाविषयी उदासीन राहिले पाहिजे, व निरलसपणे कार्य केले पाहिजे. पांढरा रंग प्रकाशाचा, म्हणजे आपल्या आचरणाचे मार्गदर्शन करणाऱ्या सत्याच्या मार्गाचा प्रतीक आहे. हिरवा रंग, जमिनीबरोबरचे ज्यावर इतर जीवसृष्टी अवलंबून आहे, त्या वनस्पती-जीवनाबरोबरचे, आपले नाते व्यक्त करतो. अशोकचक्र हे धर्मचक्र आहे. या ध्वजाखाली कार्य करणाऱ्यांनी सत्याचे व धर्माचे पालन केले पाहिजे. चक्र म्हणजे गती! गतीशून्यता म्हणजे मृत्यू! गतिशीलता हे जिवंतपणाचे लक्षण आहे. भारताने परिवर्तनाला विरोध करता कामा नये. भारताने गतिशील राहिले पाहिजे. पुढे गेले पाहिजे. चक्र हे गतिशीलतेचे, शांततामय परिवर्तनाचे प्रतीक आहे.

स्वतंत्र भारताचे मंत्रिमंडळ पं. जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली भारताचा राज्यकारभार पाहू लागले. पंतप्रधान नेहरूंच्या पहिल्या मंत्रिमंडळाचा १५ ऑगस्ट रोजी शपथविधी झाला त्यावेळी त्यांत पुढील मंत्री होते. ( १ ) पं. जवाहरलाल नेहरू, ( २ ) सरदार वल्लभभाई पटेल, ( ३) डॉ. राजेंद्र प्रसाद, ( ४ ) मौ. अबुलकलम आझाद, ( ५ ) जॉन मथाई,

( ६ ) बलदेव सिंग, ( ७ ) जगजीवनराम, ( ८ ) सी. एच. भाभा, ( ९ ) रफी अहमद किडवाई, ( १० ) राजकुमारी अमृत कौर, ( ११ ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ( १२ ) आर. के. षण्मुखम् चेट्टी, ( १३ ) डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी, व ( १४ ) एन्. व्ही. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ.

भारत स्वतंत्र झाला. भारताचे स्वतंत्र सरकार प्रस्थापित झाले. स्वातंत्र्याचा महोत्सव देशभर सुरू होता. परंतु त्याच वेळी पंजाब आणि बंगाल प्रांतांत माणुसकीला कलंक लावणाऱ्या घटना घडत होत्या. देशाची फाळणी झाली होती. पण जातीय विद्वेष शमला नव्हता. उलट तो वाढलाच होता. भारताचा जो भाग पाकिस्तानात गेला होता तेथे हिंदूंची व शिखांची अमानुष कत्तल चाललेली होती. त्यांची घरे-दारे पेटवली गेली होती. शेतीभाती, उद्योगधंदे उध्वस्त करण्यात आले होते. आणि निराधार, निराश्रित बनलेल्या लक्षावधी हिंदूंचा नि शीखांचा लोंढा निर्वासित म्हणून भारताकडे येत होता. स्वतंत्र भारताच्या सरकारला या महान समस्येला सुरुवातीलाच तोंड द्यावे लागले. एवढी अमानुष कत्तल आणि लोकसंख्येचे स्थलांतर मानवी इतिहासात यापूर्वी एवढ्या मोठ्या प्रमाणावर झालेले नव्हते, असे अभ्यासक म्हणाले. येणाऱ्या निर्वासितांचा लोंढा एवढा होता की 'कुरुक्षेत्र' येथे निर्वासितांच्यासाठी उघडलेल्या छावणीत रात्रीतून पंचवीस-तीस हजार लोक येत असत. भारतात त्यावेळी निर्वासितांसाठी ठिकठिकाणी सुमारे १६० छावण्या उघडलेल्या होत्या. या छावण्यांतून



पहिले पंतप्रधान

येणारे सिंधी, बंगाली, पंजाबी निर्वासित आपले सर्वस्व गेल्याने निराश, संतप्त बनलेले असत. सरकारी अहवालानुसार ऑगस्ट ते नोव्हेंबर अखेर-पर्यंत स्पेशल रेल्वेद्वारा सुमारे २३ लक्ष निर्वासितांचे स्थलांतर करण्यात आले. आगबोटीने १ लक्ष ३२ हजार सिंधी निर्वासित आले. १९४७-४८ मध्ये पुढीलप्रमाणे निर्वासित आल्याची सरकारी नोंद आहे. प. पंजाब-मधून ५५ लक्ष, पूर्व बंगालमधून १२ लक्ष आणि सिंधमधून ४ लक्ष. अशा सुमारे पाऊण कोटी निर्वासितांच्या पुनर्वसनाचा कठीण प्रश्न भारत सरकारपुढे उभा राहिला होता.

या निर्वासितांच्या शिवाय कत्तलीत, किंवा येताना रस्त्यातही कितीतरी लोक मृत्यू पावले. त्यांची संख्या सुमारे अडीच लक्षाच्या घरात असावी.

स्वातंत्र्य मिळाल्यावर अवघ्या दोन तीन आठवड्यांतच ही भीषण परिस्थिती हाताळण्यासाठी सरकारला एका आणिबाणी-मंडळाची स्थापना करावी लागली होती आणि या मंडळाचे प्रमुखपद लॉर्ड मौंटबॅटन यांना, त्यांना सिमल्याहून मुद्दाम बोलावून घेऊन द्यावे लागले होते. केवळ घटना-प्रमुख म्हणून न राहता त्यांनी या बाबतीतली सर्व अधिकार सूत्रे हाती घ्यावीत अशी नेहरू व पटेल यांनी त्यांना विनंती केली होती. मौंटबॅटन यांनी तातडीने उपाययोजना सुरू केली. जिथे दळणवळण तुटले होते, तिथे ते सुरळीत केले. आकाशवाणीचा उपयोग करून खास वार्तापत्रांची सोय केली. घाबरलेल्या जनतेला धीर देण्यासाठी लक्षावधी पत्रकांचा विमानांतून गावोगावी पाऊस पाडला. निर्वासितांच्या छावण्यांत साथीच्या रोगांनी हातपाय पसरू नयेत म्हणून रोगप्रतिबंधक उपाययोजना करण्यात आली. पं. जवाहरलालजींनी सरहद्दीवरच्या दंगलग्रस्त भागांचा दौरा केला.

प. बंगालमध्ये कलकत्त्यास म. गांधी हिंदु-मुसलमान ऐक्यासाठी प्रयत्न करीत होते. त्यांच्या प्रयत्नाला हळूहळू यश येत होते. शांतता प्रस्थापित होत होती. हिंदु-मुसलमान निर्भयपणाने त्यांच्या प्रार्थना-प्रवचनाला हजर

राहात होते. स्वातंत्र्याच्या तिसऱ्या दिवशी, म्हणजे १९ ऑगस्ट रोजीच ईद होती. या दिवशी गांधीजींच्या सायंप्रार्थनेला कलकत्त्यात तीन लाख हिंदु-मुसलमानांचा जमाव उपस्थित होता. गांधीजी म्हणाले,

"स्वसंरक्षणासाठी हिंसा व युद्ध करायला हरकत नाही हे तत्त्वज्ञान अनादी कालापासून चालू घटकेपर्यंत जगाच्या पाठीवरील सर्व माणसांनी अंगिकारलेले आहे. अत्याचार करणाऱ्या माणसापेक्षा स्वसंरक्षण करू पाहणारा मनुष्य भारी असला तरच तो स्वसंरक्षण करू शकतो, हा अगदी सरळ नियम आहे. याचाच दुसऱ्या भाषेत स्पष्ट अर्थ असा की, स्वसंरक्षण करण्याची खरी कला मानवाने अजून आत्मसात करून घेतलेली नाही."

गांधीजींची २० ऑगस्टची प्रार्थना खेंग्रापाटी येथे झाली. या वेळी चार लाखांहून अधिक श्रोते जमलेले होते. एकीकडे, पंजाबच्या भूमीवरच जातीय वैमनस्याचा कळस होत असतानाच बंगालच्या भूमीवर तो शमवून सलोखा घडवण्याचा गांधीजींचा एकाकी चाललेला प्रयत्न मोठा स्तिमित करणारा होता.

२३ ऑगस्टच्या त्यांच्या सभेच्या वेळी 'अल्ला हो अकबर' या घोषणेला काही हिंदूंनी हरकत घेतली. तेव्हा गांधीजी म्हणाले,

"अल्ला हो अकबर ही घोषणा इतकी थोर आहे की याहून अधिक थोर घोषणा अजून निर्माण व्हावयाची आहे. 'परमेश्वरच काय तो थोर आहे' असा या घोषणेचा अर्थ आहे. ही घोषणा अरबी भाषेत आहे म्हणूनच हिच्यावर आक्षेप घ्यायचा की काय? ही घोषणा हिंदुस्थानातील हिंदूंच्या कानाला जशी कडू लागते तशी ती जगाच्या पाठीवरील इतर कोणत्याही देशातील लोकांच्या कानांना लागत नाही. 'सत् श्री अकाल' ही सुद्धा एक अशाच प्रकारची घोषणा आहे. कोणत्याही हिंदूला किंवा मुसलमानाला ही

घोषणा करायला काय हरकत आहे? या घोषणेचा अर्थ असा आहे की, 'आहे असा काय तो परमेश्वरच आहे-दुसरा कोणीच नाही'.

ऑगस्ट महिना संपला. सप्टेंबर उजाडला. आणि चोहोकडून जातीय दंगलींच्या वार्ता कानी येऊन आदळू लागल्या. मने अस्वस्थ होऊन गेली. उद्विग्न बनली. गांधीजी भोवती जमलेल्या मंडळींना म्हणाले,

"दंगेखोरांना भेटून त्यांना त्यांच्या माथेफिरूपणापासून परावृत्त करा किंवा तसा प्रयत्न करीत असताना आत्मबलिदान करा. पण अपयशाने काळवंडलेले तोंड घेऊन परत येऊ नका. पुढाऱ्यांनी स्वतः आत्मबलिदान करण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे. या जातीय दंग्याच्या आगीत आतापर्यंत गोरगरिबांच्या आहुत्या पडल्या. पण तेवढ्यावर त्या अग्नीची भूक शमलेली दिसत नाही.

ही आग गुंडांनी पेटवलेली नाही. तर जे स्वतःला सभ्य म्हणवितात. पण वास्तविक जे आज गुंड बनलेले आहेत अशांनी ती पेटविलेली आहे. गुंडांना आपणच निर्माण करीत असतो. गुंडांना आपली सहानुभूती किंवा प्रत्यक्ष आधार मिळाला नसता तर नुसते उभे राहतानासुद्धा त्यांचे पाय लटपटू लागले असते. ज्यांनी या गुंडांना पाठीशी घातले आहे त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीला मला कौल लावावयाचा आहे. मला जे काही करावयाचे आहे ते आताच केले पाहिजे. होणारा दंगा टाळण्यासाठी मी उपवास करणार आहे. जर माझ्या या निश्चयापासून मी परावृत्त झालो तर जातीय दंग्याचा वणवा बेसुमार भडकेल आणि आपल्याला मिळालेल्या स्वातंत्र्याचा घास गिळण्यासाठी टपून बसलेल्या राष्ट्रांचे फावेल असे स्पष्ट चित्र या वेळी माझ्या डोळ्यांना दिसत आहे."

१ सप्टेंबर १९४७ च्या रात्री गांधीजींच्या उपोषणास प्रारंभ झाला.

गांधीजींची शक्ती जसजशी क्षीण होऊ लागली तसतशी कलकत्यात शांती प्रस्थापित होऊ लागली. गांधीजींच्या निवासस्थानी येऊन ज्या गुंडांनी दोन दिवसांपूर्वी काचेची तावदाने फोडली होती, ज्यांच्या लाठीच्या तडाख्यापासून गांधीजी थोडक्यात बचावले होते, ज्यांनी फेकलेली वीट गांधीजींना लागून उभ्या असलेल्या मुसलमानाच्या डोक्याला लागलेली होती....ते सर्व गुंड एके दिवशी गांधीजींच्याकडे आले आणि त्यांनी आपल्या कृत कर्माबद्दल पश्चात्ताप व्यक्त केला. ४० हिंदू मुसलमानांच्या पुढाऱ्यांच्या सह्यांनी काढण्यात आलेले पत्रक गांधीजींना देण्यात आले. त्यात आपल्या मोहल्ल्यात यापुढे कधीही दंगा होणार नाही असे आश्वासन देण्यात आलेले होते. गांधीजींनी आपले उपोषण सोडले. कलकत्त्यात शांतता झाली.

गांधीजींच्या या कार्याविषयी ' टाईम्स 'ने त्यावेळी म्हटले होते, " हजारो सैनिक जे कार्य करू शकले नसते ते एकट्या गांधीजींनी करून दाखविले आहे. "

राजाजी म्हणाले, " गांधीजींनी अनेक मोठमोठी कामे केली आहेत. त्यांनी स्वातंत्र्य मिळविण्याची जी अतिशय थोर कामगिरी केली तिच्याहून कलकत्त्यातील पाशवी वृत्तीवर त्यांनी मिळविलेल्या विजयाचे मला अधिक कौतुक वाटते. "

मौंटबॅटन यांनी उद्गार काढले, " गांधीजी म्हणजे एका माणसाचे सैन्य ! "

गांधीजी ९ सप्टेंबर १९४७ रोजी दिल्लीला आले, तो दिल्लीत जातीय दंग्याने पेट घेतला होता. घरादारांना आगी लागल्या होत्या. कत्तली झाल्या होत्या. दिल्ली शहरावर प्रेतकळा पसरलेली होती. गांधीजी शांतीप्रस्थापनेच्या कामाला लागले. म्हणाले, " स्वातंत्र्याच्या वृक्षाला हेच फळ का यायचे होते? दिल्लीच्या नागरिकांना वेड तर नाही लागले ? त्यांच्यामध्ये मानवतेचा लेशही उरलेला नाही की काय ? देशाविषयीचे प्रेम आणि

देशाचे स्वातंत्र्य या शब्दांनाही ते आज पारखे झाले आहेत की काय ? ”

दिल्लीतील निरनिराळ्या मोहल्ल्यात जाऊन गांधीजींनी शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न चालविले. दिल्ली व ओखला येथील निर्वासित केंद्रांनाही त्यांनी भेटी दिल्या.

भारत सरकारचेही शांतता प्रस्थापनेसाठी सर्व तऱ्हेने प्रयत्न चाललेले होते. निर्वासितांच्या स्थलांतराचे हे संकट मोठे होते. नवजात स्वातंत्र्याला हे एक आव्हानच होते. अन्यत्र जे कुठे घडले नाही ते भारतात घडत होते !

☆ ☆ ☆

# काश्मीरचे रणकंदन

भारत स्वतंत्र झाला. भारताचा काही भाग फाळणीमध्ये पाकिस्तानात गेला. परंतु येथे असलेल्या संस्थानांचा प्रश्न मात्र कायम होता. तसे पाहिले तर ३ जून १९४७ च्या ब्रिटिशांच्या योजनेनुसार भारतातील सारी संस्थाने ब्रिटिश सत्तेपासून मुक्त झालेली होती. ती स्वतंत्र बनली होती. स्वातंत्र्य देताना पाकिस्तानची निर्मिती करण्याची जी धूर्त दृष्टी ब्रिटिशांनी दाखवली होती तीच संस्थानांना स्वातंत्र्य देण्यात होती. वस्तुतः देश स्वतंत्र झाल्याबरोबर तेथील संस्थानेही आपोआप विलीन व्हावयास हवी होती. परंतु तसे घडले नाही. तथापि, भारताचे कणखर गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कर्तबगारीने भारतामधील काश्मीर, जुनागड व हैद्राबाद या मोठ्या संस्थानांव्यतिरिक्त बाकीची, जवळ जवळ सगळी संस्थाने स्वातंत्र्याबरोबर किंवा त्यानंतर काही थोड्या दिवसांनी भारतात विलीन झाली. भारत सरकारने या संस्थानिकांशी त्यांच्या हक्कांबद्दल काही करार केले आणि त्यांना त्यांच्या उत्पन्नाच्या प्रमाणात तनखेही

नेमून दिले. अशा रीतीने संस्थानिक हे नामधारी राजे बनले आणि संस्थानातील प्रजाही स्वातंत्र्य उपभोगू लागली.

काश्मीरबद्दल मात्र पेचप्रसंग निर्माण झाला होता. काश्मीर हे भारत आणि पाकिस्तान यांच्या सरहद्दींना लागून आहे. काश्मीरमधली बहुसंख्य जनता ही मुस्लीम आहे, पण तेथील राजघराणे मात्र हिंदू होते. त्या वेळी महाराजा हरिसिंग हे काश्मीरच्या गादीवर होते.

काश्मीरमध्ये बहुसंख्य मुस्लीम प्रजा असल्यामुळे काश्मीरने पाकिस्तानात सामील झाले पाहिजे असा पाकिस्तानचा दावा होता आणि त्यासाठी महाराजा हरिसिंगांवर पाकिस्तान हरतऱ्हेचा दबाव आणीत होते. संस्थाने स्वतंत्र झाल्यानंतर त्यांनी कुठे सामील व्हायचे हे त्यांनीच ठरवायचे होते. भारतानेही काश्मीरने भारतात सामील व्हावे यासाठी प्रयत्न सुरू ठेवलेले होते. कोठे सामील व्हायचे याचा विचार करण्यास वेळ मिळावा म्हणून महाराजा हरिसिंगांनी सुरुवातीस पाकिस्तान व भारत यांच्याशी 'जैसे थे' करार केला. या कराराने महाराजा हरिसिंग केवळ निर्णयाची टाळाटाळ करीत होते व वेळ दवडीत होते. पण पाकिस्तानने आपली कारवाई सुरू केली होती. रीतसर सामील झाला तर ठीकच नाहीतर जुलूम-जबरदस्तीने का होईना पण काश्मीर बळकवायाचे हे पाकिस्तानने ठरवलेच होते. काश्मीरमध्ये जाणारे त्यावेळी दोन मुख्य मार्ग होते. एक श्रीनगरहून बारामुल्ला मार्गाने रावळपिंडीपर्यंत जात होता, आणि दुसरा रेल्वेमार्ग जम्मू-रावळपिंडी असा होता. परंतु फाळणीनंतर हे दोन्ही मार्ग पाकिस्तानात गेले आणि भारताला काश्मीरमध्ये जाण्याला तसा सरळ, तयार रस्ताच राहिला नाही. पठाणकोटपर्यंत रेल्वेने जाता येत होते, पण तिथून पुढे जम्मूला पोचण्यासाठी नंतर भारताला नवीन सडक बनवावी लागली.

धाकदपटशाने महाराजा हरिसिंग बधत नाहीत हे पाहिल्यावर पाकिस्तानने दोन्ही मार्ग बंद करून टाकले व काश्मीरची रसद तोडली.

काश्मीरला आर्थिक कोंडीत पकडण्याचा डाव टाकला. परंतु याही दड-पणाला महाराजांनी काही दिवस भीक घातली नाही. मग पाकिस्तानने सरहद्दीवरल्या पठाण टोळ्यांना काश्मीरमध्ये घुसण्यासाठी चिथावणी दिली. टोळीवाल्यांना हत्यारे पुरवली. मार्गदर्शनासाठी सैनिकी अधिकारीही धाडले.

टोळीवाले मोठ्या संख्येने पश्चिमेकडून काश्मीरमध्ये घुसले. ठिकठिकाणी त्यांनी धाकदपटशा दाखवून लूटमार करायला सुरुवात केली. शेतातली पिके कापली. घरांना आगी लावून दिल्या. स्त्रियांवर बलात्कार केले. मुलांचे प्राण घेतले. सर्रास कत्तली सुरू केल्या.

पाच हजार टोळीवाल्यांच्या पाठोपाठ पाकिस्तानी फौजाही काश्मीरात घुसल्या. २४ आक्टोबरला ही वार्ता भारत सरकारला कळली. नेहरूंनी व्हाइसरॉय मौंटबॅटन यांच्याशी ताबडतोब चर्चा केली. व्हाइसरॉयनी तात-डीने संरक्षण समितीची बैठक बोलावली.

टोळीवाल्यांनी मुझफराबाद जाळून टाकले होते. चारीबाजूंनी ते श्रीनगरवर चाल करून चालले होते. एक तुकडी उटीला जाऊन धडक-लीही होती. दुयेल लुटले होते. दुसऱ्या एका तुकडीने महोराचे विद्युत्‌गृह मोडून तोडून जाळून टाकले होते. त्यामुळे साऱ्या काश्मीरमध्ये अंधःकार माजलेला होता. पाहता पाहता टोळीवाले व पाकिस्तानी सैनिक बारामुल्ला-पर्यंत मुसंडी मारून आले. येताना वाटेतली गावे, वस्त्या त्यांनी जाळून पोळून टाकल्या होत्या. लूटमार, कत्तल केलेली होती. काश्मीर संस्थानची फौज तशी फारच थोडी होती. त्यातीलही काही मुस्लीम सैनिक पाकिस्तानी फौजांना मिळालेले होते. ठिकठिकाणची मंदिरे, मशिदी, चर्चेस पाडून टाकली होती.

बारामुल्ला येथे काश्मीरच्या फौजेने व सशस्त्र नागरिकांनी टोळीवाल्यांना काहीसा प्रतिकार केला, पण त्यांचे सामर्थ्य फारच थोडे होते.

पाकिस्तानच्या ह्या हल्ल्याने मात्र महाराजा हरिसिंग हलले. आपल्या

सामर्थ्यावर पाकिस्तानशी आपण लढू शकणार नाही याची त्यांना जाणीव झाली आणि त्यांनी साहाय्यासाठी भारताकडे धाव घेतली. २६ आक्टोबर १९४७ रोजी त्यांनी भारताच्या व्हाइसरॉयना लिहिले,

"पाकिस्तानातून हत्यारबंद लष्करी व साध्या वेषातील हजारो सैनिक आणि टोळीवाले माझ्या संस्थानात घुसलेले आहेत. त्यांनी नाना प्रकारचे अत्याचार सुरू केलेले आहेत. काश्मिरी स्त्रियांवर बलात्कार केले आहेत, पुष्कळ स्त्रिया पळवून नेल्या आहेत, मुलाबाळांची निर्घृण हत्या केली आहे, महोराचे विद्युत्‌गृह जाळून टाकले आहे, त्यांच्या ह्या अमानुष अत्याचारापासून काश्मीर संस्थानचे संरक्षण करणे मला अशक्य आहे. माझ्या मुलखाला या हल्ल्यापासून जो धोका निर्माण झालेला आहे त्यातून वाचण्यासाठी भारताकडे मदत मागण्याशिवाय मला दुसरा मार्गच उरलेला नाही." महाराजांनी काश्मीर संस्थान भारतात विलीन करीत असल्याचा सामीलनामाही याचवेळी धाडला.

काश्मीरमधली आणीबाणीची परिस्थिती लक्षात घेऊन भारत सरकारने काश्मीरचा सामीलनामा ताबडतोब मंजूर करून टाकला. त्याबरोबर काश्मीर हा आता भारताच्या अधिकारातला प्रदेश झाला. आणि आपल्या प्रदेशावरील पाकिस्तानी आक्रमण हुसकून लावण्यासाठी भारताने काश्मीर-मध्ये ताबडतोब हिंदी फौजा धाडण्याचा निर्णय केला.

काश्मीरी फौज शत्रूशी लढत होती तरी तिचे सामर्थ्य थोडे होते. आणि पाकिस्तानी फौजा श्रीनगरपासून अवघ्या पस्तीस चाळीस मैलांवर येऊन ठेपल्या होत्या. श्रीनगरच्या वेशी ठोठावू लागल्या होत्या. वेळ फार थोडा होता. आणि लष्कर नेण्याला तर जवळचा चांगला रस्ताही नव्हता. भारत सरकारने विमानाने काश्मीरमध्ये सैन्य उतरवण्याचा निर्णय घेतला. तत्काळ विमानदलातील आणि नागरी वाहतूक कंपन्यांचीही विमाने सैनिकांनी, हत्यारांनी व दारूगोळ्यांनी भरून निघाली.

पण तेवढ्यात टोळीवाल्यांनी श्रीनगरचा विमानतळ घेरून टाकला होता. विमाने उतरविणे धोक्याचे झाले होते. विमानतळावर गोळीबारही होत होता. परंतु धोका पत्करूनही जाणे भाग होते. तशा परिस्थितीतही चौथ्या कुमाऊँ पलटणीचे सैनिक श्रीनगरच्या विमानतळावर कसेबसे उतरविण्यात आले. या आघाडीच्या तुकडीचे नेतृत्व होते मेजर सोमनाथ शर्मा यांच्याकडे.

विमानतळावर उतरताच मेजर शर्मा यांनी सैनिकांच्या लहान लहान तुकड्या बनवल्या आणि श्रीनगरकडे येणारा मुख्य राजरस्ता आणि विमानतळाच्या आजूबाजूच्या वाटा रोखून धरल्या. विमानतळाची डागडुजी करून टाकली. पाठोपाठ आणखी सैनिक येऊन उतरले. मेजर शर्मांनी एक तुकडी बडगाव या श्रीनगरजवळील मुख्य रस्त्यावरच्या गावात नेऊन ठेवली. ताबडतोब मोर्चेबंदी झाली. खंदक खणण्यात आले. उखळी तोफा डागण्यात आल्या. कुमाऊँ राजपूत शत्रूशी मुकाबला करण्यासाठी सिद्ध झाले. टोळीवाले आणि पाकिस्तानी सैनिक यांच्या मानाने ते कितीतरी थोडे होते. पण त्यांनी आपल्या पराक्रमाने आपण भारी आहोत हे सिद्ध केले. ते प्राणपणाने लढले. श्रीनगरची वाट रोखून धरली.

तेवढ्या अवधीत आणखी सैनिक मदतीला आले.

ब्रिगेडियर उस्मान यांच्या नेतृत्वाखाली काश्मीरचे रणकंदन सुरू होते. श्रीनगर येथेच ब्रिगेडियरची कचेरी उघडण्यात आली होती. वायरलेस-टेलिफोनवरून ब्रिगेडियर उस्मान सारखा कानोसा घेत होते. मार्गदर्शक सूचना देत होते. मेजर शर्मांना ते म्हणाले, "राष्ट्राच्या जीवनमरणाचा हा प्रश्न आहे. एकही गोळी वाया घालवू नका. शर्थ करा! भारताची शान राखा!"

मेजर सोमनाथ शर्मांनी बाणेदारपणाने सांगितले, "साहेब, एक रेसभरही आम्ही हटणार नाही याची खात्री बाळगा. अखेरचा सैनिक, अखेरची

गोळी जवळ असेपर्यंत प्राणपणाने लढेल. भारताची प्रतिष्ठा राखेल !"

कुमाऊँ राजपूत प्राणाची बाजी लावून सहा तास लढत राहिले, त्यांची चिकाटी, जिद्द व शौर्य पाहून पाकिस्तानी चिडले. त्यांनी गोळ्यांचा भडीमार सुरू केला. अंगावर जखमा झाल्या होत्या, रक्त वाहत होते तरी मेजर शर्मा आपल्या जवानांना धीर देत, मार्गदर्शन करीत लढत होते. तेवढ्यात त्यांच्या छातीतच एक गोळी घुसली. मेजर सोमनाथ शर्मा खाली कोसळले; पण तेवढ्यात नवीन कुमक येऊन धडकली. मेजर शर्मांना त्याही स्थितीत आनंद झाला. कर्तव्य करता करता देशासाठी दि. ३ नोव्हेंबर १९४७ रोजी मेजर शर्मांनी प्राण सोडला.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे पहिले 'परमवीर चक्र' नंतर मेजर सोमनाथ शर्मा यांना मरणोत्तर अर्पण करण्यात आले.

ब्रिगेडियर उस्मान यांनी आपल्या सैन्याची उत्तम व्यूहरचना केली. श्रीनगरच्या परिसरातील नौशेरा गावच्या उत्तरेस तायधार येथे डोंगरावर त्यांनी एक भारतीय ठाणे वसवले. या ठाण्यावर उस्मान यांनी एक प्लॅटून ठेवली. डोंगरावर मोर्चे बांधले. पायथ्याशी खोल खंदक खणले. उतारावर काटेरी कुंपणाच्या तारांची गुंडाळी पसरून ठेवली. पायवाटांवर भुईसुरुंग पेरले. मुख्य ठाण्यापासून जवळच एका ठिकाणी मशिनगन बसवली. मशिनगनच्या टप्प्यात सर्व डोंगरउतार येत होता. सैनिक सज्ज होते. डोळ्यांत तेल घालून शत्रूच्या हालचाली टिपीत होते.

शत्रूने एके दिवशी पहाटेच हल्ला चढवला. हजार एक पठाण असतील. त्यांची कल्पना अशी की या वेळी भारतीय जवान बेसावध असतील. पण भारतीय जवान स्वदेश–स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी भूक तहानझोपही विसरलेले होते. त्यांना ठाऊक होते की तायधरचे हे ठाणे फार महत्त्वाचे आहे. ते जर शत्रूच्या हाती पडले तर सर्व काश्मीर खोऱ्यास धोका होईल. ब्रिगेडियर उस्मान यांनी वाटेल ते होवो, ठाणे हातून जाऊ

घायचे नाही असे प्लॅटून कमांडरला बजावले होते.

परंतु पठाणांनीही काही करून ठाणे जिंकायचेच असा निश्चय करून मोठ्या पद्धतशीर रीतीने, दुपारीने हल्ला चढवलेला होता. प्राणाची तमा त्यांनाही नव्हती. सुरुंग पेटलेल्या जमिनीवर काही पठाण आडवे पडले आणि त्यांच्या अंगावरून मागील पठाण पुढे आले. सुमारे सहाशे यार्डां-वर शत्रू आला तेव्हा मोर्चातील सैनिकांनी गोळीबार सुरू केला. भारतीय जवानांचे बाहू स्फुरण पावत होते. त्यांनी नेम धरून, टिपून एकेक पठाण मारण्यास सुरुवात केली. पठाणांनी उखळी तोफा, रायफल्स व मशिन-गन्सचा मारा सुरू केला. जवानांच्या गोळ्या खात पठाण पुढे पुढे सरकत होते.

होता, होता पठाणांची पहिली जंगी तुकडी काटेरी तारेजवळ आली. जवानांनी आपली मशिनगन सुरू केली. शेकडो पठाण ठार झाले. शेकडो जखमी, घायाळ झाले. परंतु तरीही पठाण मागाहून येतच राहिले. दोन्ही बाजूंनी जबरदस्त गोळीबार सुरू होता. उखळी तोफा धडाडत होत्या. मशिनगन्स आग ओकीत होत्या. आजूबाजूच्या डोंगरदऱ्या दणाणून गेल्या होत्या.

हजारो पठाण विरुद्ध मूठभर भारतीय जवान अशी लढाई रंगली होती! जवान शर्थीने लढत होते. पण पठाणांचा माराही जबरदस्त होता. काही जवान कोसळले आणि अवघे आठ-दहाजणच शिल्लक राहिले. पठाणांनी तार ओलंडली की ठाणे हातचे जाणार होते. तेव्हा त्यांना तारेपलीकडेच थोपवून धरणे आवश्यक होते. जवान शर्थ करीत होते.

ब्रिगेडियर उस्मान यांनी तत्काळ कुमक धाडली. पण ती वर पोचण्या-सही काही अवधी लागणारच होता. तेवढा वेळ तरी पठाणांना तारेपलीकडे रोखणे जरूर होते. ब्रिगेडियरनी रेडिओ संदेश धाडला, " कुमक पाठवली आहे. थोड्याच वेळात तेथे पोचेल, तोवर शत्रू थोपवून धरा. शौर्याची शर्थ

करा !" संदेश मिळताच जवानांच्या अंगात पुनश्च वीरश्री संचारली त्यांना बळ चढले. ते हिरीरीने लढू लागले. वेळ अत्यंत आणीबाणीची होती. प्रसंग बाका होता. आठ-दहा जवानातीलही काही कामी आले. अवघे तिघेच उरले. पठाण तर तारेजवळ येऊन धडकलेही. पण तेवढ्यातच दोनशे जवानांची नवी कुमकही येऊन पोचली. एकाएकी दोनशे बंदुका पठाणांवर गोळ्यांचा पाऊस पाडू लागल्या. पठाण ह्या नव्या हल्ल्याने हादरले. कित्येक जागचे जागीच ठार झाले. बाकीचे, तोंडाशी आलेला घास टाकून, जीव घेऊन सैरावैरा पळू लागले. बघता बघता लढाईचा मोहरा पालटला. शत्रू पळाला. भारतीय जवानांनी विजय खेचून आणला. पराक्रमाची शर्थ केली !

ब्रिगेडियर उस्मान आपल्या बहादूर जवानांच्या मर्दुमकीने दिपून गेले. त्यांच्या डोळ्यांतून आनंदाचे, कौतुकाचे, धन्यतेचे अश्रू ओघळू लागले. ते म्हणाले,

" शाब्बास वीरांनो ! स्वतंत्र भारताची पहिली लढाई आपण जिंकली. शाब्बास ! Well done ! we have won the first battle of independence ! "

त्या वेळी असेच शौर्य रामा राघोबा राणे, जदुनाथसिंग, कर्नल हरिश्चंद्र व अशा कितीतरी वीरांनी गाजवले ! पाकिस्तानी सैन्याचा व टोळीवाल्यांचाही पराभव केला.

ज्या वेळी महाराजा हरिसिंग यांनी काश्मीरचे सामीलीकरण भारताशी केले त्याच वेळी काश्मीरचा कारभार तेथील राष्ट्रीय परिषदेकडे सुपूर्त केला होता. राष्ट्रीय परिषदेचे लोकप्रिय नेते होते शेख अब्दुल्ला. त्यांना गौरवाने 'शेरे काश्मीर' म्हणत असत. शेख अब्दुला काश्मीरचे पंतप्रधान झाले होते. पाकिस्तानी हल्लेखोरांशी भारतीय जवान लढत होते. त्याप्रमाणे राष्ट्रीय परिषदेचे देशभक्त कार्यकर्तेही झगडत होते. त्यांनीही शौर्याने शत्रूशी दोन

हात केले. हौतात्म्य पत्करले.

मीर मकबुल शेरवाणी हे बारामुल्लातील काश्मीरच्या राष्ट्रीय परिषदेचे एक तरुण व शूर पुढारी होते. तिशीच्या आसपास त्यांचे वय. राष्ट्रीय परिषदेचे ते एक महत्त्वाचे पुढारी आहेत असे कळल्यावर आक्रमकांनी निशात बोलपटगृहाजवळ दोन खांबांशी त्यांना बांधले. त्यांनी प्रथम त्यांना मारहाण केली. नंतर अखिल जम्मू आणि काश्मीर राष्ट्रीय परिषद व तिचे नेते शेख अबदुल्ला यांच्याशी संबंध तोडून टाकण्यास त्यांना फर्मावण्यात आले. पालन दरीत आक्रमकांनी बळकावलेल्या प्रदेशाची आझाद काश्मीरच्या हंगामी सरकारची कचेरी होती. त्या सरकारविषयी राजनिष्ठेची शपथ घेण्यास त्यांच्यावर सक्ती करण्यात आली.

परंतु मीर शेरवाणींनी या गोष्टीला निर्भयपणे नकार दिला; एवढेच नव्हे, तर ते म्हणाले, "शेख अब्दुल्ला हे आता मुख्य सूत्रधार आहेत. हिंदी फौजाही आल्या आहेत. थोड्याच दिवसांत तुम्हां आक्रमकांना काश्मीरच्या पवित्र सुंदर भूमीतून हाकून लावण्यात येईल."

मीर शेरवाणींचे हे उद्गार ऐकताच आक्रमक चिडले. त्यांनी लागोपाठ शेरवाणींना चौदा गोळ्या घातल्या. त्यांचे नाक कापून तोंड विद्रूप केले. त्यांच्या शरीरावर एक फलक लावला. त्यावर लिहिलेले होते—'हा देश-द्रोही आहे. याचे नाव शेरवाणी. सर्व देशद्रोह्यांची ही दशा होईल.'

परंतु ही अमानुष, क्रूर घटना होऊन पुरते अठ्ठेचाळीस तासही उलटले नाहीत तोच हिंदी फौजा काश्मीरात येऊन थडकल्या. त्यांनी आक्रमकांना धडा शिकवला. आक्रमक वाट फुटेल तिकडे पळत सुटले. मीर शेरवाणींची भविष्यवाणी खरी ठरली.

अभिमान वाटावा असे हौतात्म्य, शौर्य, साहस त्या लढ्यात व्यक्त झाले.

काश्मीरचे रणकंदन चालू असतानाच भारताचे पंतप्रधान पं. नेहरू व पाकिस्तानचे पंतप्रधान लियाकत अलीखान यांच्यात वाटाघाटी चालू

झाल्या. काश्मीर-चढाईच्या मागे पाकिस्तानचा हात आहे ही गोष्ट पाकिस्तान मान्य करीत नव्हते, तसेच सगळे काश्मीर घशात घालण्याचे स्वप्न पाहात होते. त्यामुळे वाटाघाटी सफळ होणेच शक्य नव्हते. परिस्थिती दिवसेदिवस चिघळत चालली तेव्हा मौंटबॅटन यांच्या सल्ल्याने हा प्रश्न यूनोत नेण्याचे ठरले आणि ३० डिसेंबर १९४७ ला काश्मीर प्रश्न यूनोच्या सुरक्षा समितीकडे नेण्यात आला. यूनोने ३ एप्रिल १९४८ रोजी एका ठरावान्वये एक कमिशन नेमले. या कमिशनमध्ये पाच सदस्य होते. भारत व पाकिस्तान या दोन देशांशी वाटाघाटी करून शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करावा, आणि त्यांच्या मदतीने सार्वमतासाठी अनुकूलता व व्यवस्था निर्माण करावी असे या कमिशनकडे सोपवलेले काम होते. परंतु भारताने आणि पाकिस्तानने दोघांनीही हा ठराव फेटाळला.

भारतीय सेना आणि पाकिस्तानी सेना यांच्या चकमकी झडत होत्याच. जनरल करिअप्पांनी २० जानेवारीला पश्चिमेकडील सैन्याची सूत्रे हाती घेतली. लढाईला उग्र स्वरूप आले. झांगरच्या लढ्यात ब्रिगेडियर उस्मान पतन पावले. पांडू नामक टेकडी भारतीय सैन्याने जिंकली त्या वेळी तेथे जे युद्धकैदी पकडण्यात आले, ते पाकिस्तानी लष्करातील होते. यावरून टोळीवाल्यांच्या मागे पाकिस्तान्यांचा हात होता हे सिद्ध झाले होते. सर्वच आघाड्यांवर पाकिस्तानचा पराभव होत होता. पाकिस्तानी सैन्य माघार घेत होते. माघारी जाता जाता वाटेतली गावे ते भस्मसात करीत असत. अत्याचार करीत असत.

अशातच १० जुलै १९४८ रोजी यूनोचे कमिशन भारतात आले. युद्ध थांबवण्याची विनंती भारताला व पाकला त्यांनी केली. भारताने ती मान्य केली, पण पाकिस्तानने सबबी सांगून टाळाटाळ सुरू केली. त्यामुळे युद्ध सुरूच राहिले. भारतीय सैन्याने एकाहून एक चढ असे पराक्रम या लढाईत दाखवले आणि पाकिस्तानी कारवाई हाणून पाडली. अखेर ३१ डिसेंबर

१९४८ रोजी काश्मीरमध्ये युद्धबंदी करण्याविषयी पाकिस्तानशी यूनोच्या मध्यस्थीने करार झाला. १ जानेवारी १९४९ पासून युद्धबंदी अमलात आली. काही थोडा भाग तेव्हापासून आझाद काश्मीर सरकारच्या ताब्यात राहिलेला आहे. आझाद काश्मीर सरकार हे पाकिस्ताननेच उभे केलेले, पोसलेले एक बाहुले आहे.

भारतातील संस्थानांचा कठीण प्रश्न वल्लभभाई पटेलांच्या कणखरपणामुळे स्वातंत्र्याबरोबरच सुटला. जुनागड व हैदराबाद यांनी त्रास दिला, वेळकाढूपणा केला. पण अखेरीस तीही संस्थाने विलीन झाली. काश्मीरने भारताशी सामीलनामा केला आहे. काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे, हे वेळोवेळी भारताने स्पष्ट केलेले आहे. सर्व सार्वत्रिक निवडणुकांमधून काश्मीरी जनतेनेही तसा कौल दिलेला आहे. परंतु त्या वेळी यूनोत नेलेल्या प्रश्नाचे घोंगडे मात्र अद्याप तसेच भिजत पडलेले आहे. यूनोचे निरीक्षक तेथे आहेत.

मध्यंतरीच्या काळात शेख अबदुल्ला यांनीही वेगळा सूर लावला. त्यांनी भारतीय संघराज्यापासून फुटून वेगळे होण्याची भाषा सुरू केली. त्यामुळे ८ ऑगस्ट १९५३ रोजी त्यांची मुख्यप्रधानपदावरून हकालपट्टी करण्यात आली. त्यांना कारावासात ठेवण्यात आले. काही दिवसांनी सोडले. पण बाहेर येताच त्यांनी परत आपल्या फुटीर कारवाया सुरू केल्या. म्हणून परत त्यांना बंदिस्त करण्यात आले. सध्या ते मुक्त आहेत. परंतु त्यांच्या मतात फारसा बदल झालेला नाही.

☆ ☆ ☆

# जुनागडचे दुखणे

गुजरातमधील काठेवाड भागात काही संस्थाने होती. त्यात जुनागड हे एक प्रमुख संस्थान होते. या संस्थानचा राजा मुस्लीम नबाब होता. परंतु ८० टक्के प्रजा मात्र हिंदू होती. जुनागड भौगोलिक दृष्ट्या भारतीय हद्दीशीच संलग्न होते. दक्षिणेकडे अरबी समुद्रकिनारा होता. काठेवाडातील इतर संस्थानांनी भारतीय संघराज्यात विलीन होण्याचा निर्णय केला होता. पण जुनागडचा नबाब मात्र टाळाटाळ करीत होता. स्वातंत्र्याबरोबर संस्थानेही स्वतंत्र झाली आणि त्यांनी कुठे विलीन व्हायचे हे ब्रिटिशांनी त्यांच्या मर्जीवर सोपवलेले होते. इतर बहुसंख्य संस्थानिकांनी भौगोलिक संलग्नता, आर्थिक प्रश्न, दळणवळण, संरक्षण या बाबींची सुकरता व प्रामुख्याने प्रजेची इच्छा या गोष्टी लक्षात घेऊन भारतात विलीन होण्याचा निर्णय केला होता. त्यानुसार भारताशी सामीलनामा करून ती संस्थाने विलीन झालीही. जुनागडच्या नबाबाने मात्र पाकिस्तानातील काही मुस्लीम लीगच्या पुढाऱ्यांच्या पढवण्यावरून पाकिस्तानात सामील

होण्याचा निर्णय केला. पाकिस्तानातील शहानवाज भुट्टो नावाचे एक कट्टर लीग नेते जुनागडचे दिवाणच बनले होते. त्यांच्या सल्ल्यानेच नबाब वागत होता.

इतर संस्थानांप्रमाणेच भारत सरकारने जुनागडच्या नबाबाकडेही सामीलनाम्याच्या पत्राची प्रत धाडलेली होती. त्या पत्रावर सही करून ते १४ ऑगस्ट १९४७ च्या आत भारत सरकारकडे पाठवायचे होते. परंतु भारत सरकारने तातडीची तार करूनही १४ ऑगस्टला 'आम्ही अजून विचार करीत आहोत' असे उत्तर दिवाणाने धाडले आणि १५ ऑगस्ट १९४७ स्वातंत्र्य दिनाच्या दिवशीच, 'बरेच दिवस जुनागडचे सरकार विलिनीकरणाच्या बाबतीत बारकाईने विचार करीत होते. भारत वा पाकिस्तान यापैकी कोणत्या राष्ट्रात सामील होण्याने जुनागडच्या प्रजेचा फायदा होईल याचाच प्रामुख्याने विचार करून जुनागड संस्थान पाकिस्तानात सामील करण्याचा निर्णय या सरकारने घेतला आहे' असा फतवा प्रसिद्ध केला.

या निर्णयाने जुनागडच्या प्रजेला आणि भारत सरकारलाही नवल वाटले! जुनागडच्या बहुसंख्य प्रजेने भारतात विलीन होण्याची आपली इच्छा एका निवेदनाद्वारे त्याआधीच नबाबाला कळविलेली होती. परंतु तिच्याकडे नबाबाने दुर्लक्ष केले होते. त्यामुळे जुनागडच्या व त्याला लागून असलेल्या इतर काठेवाडी संस्थानातील प्रजेत असंतोष निर्माण झाला होता. तेथील शांतता व सुव्यवस्था बिघडण्यासारखी विपरित परिस्थिती उत्पन्न झाली होती.

भारत सरकारने या गोष्टीची तत्काळ दखल घेतली. जुनागड सरकारशी पत्रव्यवहार सुरू केला. नेहरूंनी लियाकत अलीखान यांनाही तार केली. पाकिस्तानने जुनागड जर प्रजेच्या विरुद्ध विलीन करून घेतले तर भारतपाक संबंध बिघडण्याचा धोका, निर्माण होईल असा इशारा मौंटबॅटन

यांनी पाकला दिला.

जुनागडचा नबाब हा पाकिस्तानी कारस्थानातील एक बाहुले बनलेला होता. स्वतःची जबाबदारी ओळखणे नि ती पार पाडणे एवढीही कर्तबगारी त्याच्यात नव्हती. चैन, ऐषआराम, विक्षिप्त लहरीपणा यांतच कालक्रमणा करणारा तो तऱ्हेवाईक राजा होता. इतर गोष्टी होत्याच, पण त्याला कुत्री पाळण्याचा विलक्षण शौक होता. जुनागडच्या राजवाड्यात शंभर कुत्र्यांसाठी अनेक सुसज्ज खोल्या होत्या. प्रत्येक खोलीत सर्व तऱ्हेची सोय, टेलिफोन व एक नोकर कुत्र्याच्या तैनातीसाठी ठेवलेला होता. संस्थानी कुत्र्यांची लग्ने लावली जात असत आणि त्या निमित्ताने टोलेजंग थाटामाटाचे समारंभ होत असत. माणसापेक्षा कुत्र्याचे जीवन तिथे अधिक सुखी व सुरक्षित होते !

पाकिस्तानने भारताला, जुनागडच्या नबाबांच्या इच्छेप्रमाणे आम्ही त्यांचे संस्थान सामील करून घेतले आहे, असे कळविले. नबाबांना खुद्द जीनांचीही फूस होती. तुमच्यावर कुठल्याही प्रकारचे संकट आले तर आम्ही तुमच्या साहाय्याला धाऊन येऊ असे जीनांनी सांगितलेले होते.

काठेवाड संस्थानात मात्र जुनागडच्या या उपद्व्यापाने बरीच खळबळ माजली. तिथली परिस्थिती दिवसेदिवस स्फोटक बनत चालली होती. तेथील नेत्यांनाही ती काबूत ठेवणे कठीण जात होते. केव्हा स्फोट होईल व भडका उडेल याचा नेम नव्हता.

जुनागडच्या नबाबाने असा विचित्र निर्णय केला आणि वर शेजारच्या मंगरोळ व बाबाटियावाड संस्थानात आपली फौज पाठविली. या संस्थानातील पन्नास खेड्यांचा पूर्वी राजकीय दृष्ट्या जुनागडशी संबंध होता. स्वातंत्र्यानंतर तो राहिला नव्हता व तेथील प्रजेला भारतात विलीन व्हावयाचे होते. काठेवाड संस्थानातील लोकांनी भारत सरकारकडे साहाय्याची विनंती केली.

भारत सरकारने संरक्षक दलाची एक तुकडी तिकडे रवाना केली. मंगरोळ, मानवदार या संस्थानांचा ताबा या तुकडीने घेतला. तेथील नबाब पाकिस्तानात पळून गेले. स्थानिक नेत्यांनी सामळदास गांधी यांच्या नेतृत्वाखाली जुनागडचे हंगामी सरकार स्थापन केले होते. लोकांचा या सरकारला हार्दिक पाठिंबा होता.

परिस्थिती जशी बिकट होऊ लागली तशी एके दिवशी आपले नातेवाईक, बेगमा, काही कुत्री, जडजवाहीर घेऊन जुनागडच्या नबाबाने पाकिस्तानात पळ काढला.

हंगामी सरकारने आपले कार्य जोराने सुरू ठेवले. काही मुलूखही ताब्यात घेण्याची योजना केली. परिस्थिती अशी चिघळत चालल्याचे पाहून व प्रजेच्या दडपणाने संस्थानच्या दिवाणाने अखेरीस सर्व सत्ता सामळदास गांधींच्या हाती देण्याचा निर्णय केला.

नंतर दिवाण, मंत्रिमंडळ, सामळदास गांधी आणि इतर स्थानिक नेते यांच्यात वाटाघाटी, चर्चा होऊन संस्थान भारतात विलीन करण्याचा निर्णय झाला आणि त्यानुसार भारत सरकारला तातडीने कळवूनही टाकले.

जुनागडचा ताबा घेण्यासाठी प्रादेशिक कमिशनर बुच यांना धाडले. १० नोव्हेंबर १९४७ रोजी जुनागडच्या दिवाणांनी सत्तांतर करून पाकिस्तानला प्रयाण केले.

इकडे सत्तांतर झाले, पण पाकिस्तानने भारत सरकारवर जुनागडमध्ये आक्रमक कारवाई केल्याचा आरोप करून, फौजा परत घेण्याची व परिस्थिती पूर्ववत करण्याची धमकी दिली. याला पं नेहरूंनी सडेतोड उत्तर पाठवून कळविले, "त्यावेळच्या परिस्थितीत जुनागडच्या दिवाणांची विनंती मान्य करूनच भारत सरकारने ताबा घेतलेला आहे." परंतु पाकिस्तानने ही वस्तुस्थिती अमान्य केली आणि जुनागड हा पाकिस्तानचाच भाग आहे असे पुनश्च जाहीर केले.

१३ नोव्हेंबर रोजी सरदार पटेल जुनागडला गेले; त्यावेळी त्यांचे तेथे प्रचंड स्वागत झाले. एका विशाल सभेत त्यांनी जनतेला आपल्याला कोठे सामील व्हावयाचे आहे असे विचारले. तेव्हा हजारो लोकांनी हात वर करून भारतात सामील होण्याची इच्छा व्यक्त केली.

२० फेब्रुवारी १९४८ रोजी तेथे लोकमत अजमावण्यात आले. संस्थानातील बहुसंख्य लोकांनी भारतात विलीन होण्याच्या बाजूने आपला कौल दिला.

नंतर आणखी एक घटना घडली. त्या भागात अनेक लहान लहान संस्थाने होती, ती सर्व एकत्र आली आणि त्यांनी भारताचा घटक अशा सौराष्ट्र प्रांताची निर्मिती केली. सौराष्ट्रात जुनागड विलीन करण्यात आले.

जुनागडचा प्रश्न मिटला.

☆ ☆ ☆

# राष्ट्रपित्याचा अंत

गांधीजींनी दिल्लीत राहून शांती-प्रस्थापनेचा हिंदू-मुस्लीम ऐक्याचा प्रयत्न चालवलेला होता. देशात झालेल्या दंग्यांमुळे ते व्यथित झालेले होते. तसेच काश्मीर प्रश्नावरून पाकिस्तान व भारत या दोन देशांत निर्माण झालेल्या कटु संबंधाबद्दलही त्यांना चिंता वाटत होती. फाळणीच्या वेळी ठरलेल्या अटीनुसार भारताने पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये द्यावयाचे होते. परंतु ही रक्कम जर आत्ताच दिली तर पाकिस्तान आपल्याविरोधी युद्ध भडकत ठेवण्याच्या कामी खर्च करील म्हणून सर्व भारत-पाक-प्रश्न निकालात निघेतोवर ही रक्कम पाकिस्तानला द्यावयाची नाही अशी भारत सरकारने भूमिका घेतली होती. गांधीजींना सरकारचे हे धोरण आवडले नाही. त्यांनी याबाबत मौंटबॅटन यांच्याशी चर्चा केली व मौंटबॅटन यांनीही भारत सरकारचे हे धोरण कायदेशीर दृष्टीकोनातून अयोग्य असल्याचे मत दिले.

परस्पर अविश्वासाच्या वातावरणात गांधीजी अस्वस्थ

झाले आणि त्यांनी १३ जानेवारी १९४८ पासून आमरण उपोषण सुरू केले. दि. १२ जानेवारीच्या सायंप्रार्थनेनंतर बोलताना ते म्हणाले,

" कलकत्त्याहून ९ सप्टेंबरला मी दिल्लीस आलो. प. पंजाबला जाण्यासाठी म्हणून आलो. परंतु ते जाणे नव्हते व्हायचे. आनंदी दिल्ली मृतवत दिसली. गाडीतून उतरलो तेव्हा सर्वांच्या मुद्रेवर चिंता दाटलेली दिसली. सरदार नेहमी विनोद करणारे आणि विनोदामुळे मिळणाऱ्या आनंदाने आनंदी असणारे; परंतु तेही अपवाद नव्हते. राजधानीत घडलेल्या अत्याचारी हकिकती त्यांनी लगेच मला सांगितल्या. मी दिल्लीतच राहणे आवश्यक, येथेच केले पाहिजे वा मेले पाहिजे, असे तत्क्षणी माझ्या ध्यानात आले. पोलीस आणि लष्कर यांच्या तडकाफडकी उपयोगामुळे वरपांगी शांती आहे. परंतु आत तुफान आहे. ते केव्हाही उठेल. करीन म्हणून जी प्रतिज्ञा केली, ती या वरपांगी शांतीने पुरी झाली असे मला वाटत नाही. ती प्रतिज्ञा पुरी झाली तरच मी जगू शकतो. ज्याचासारखा मित्र नाही अशा मृत्यूपासून दूर राहू शकतो. हिंदु, शीख, मुसलमान यांच्यांत खरी अंतःकरणपूर्वक मैत्री यावी म्हणून माझे हृदय तहानलेले आहे. परवापर्यंत ती मैत्री होती. आज ती कुठेच नाही. देशभक्त म्हणवून घेणाऱ्या कोणाही माणसास शांतपणे हे सारे कसे पाहवेल ? अंतःकरणातील आवाज कधीपासून हाक मारीत आहे. परंतु मी मुद्दाम कान बंद केले होते. कदाचित सैतानाचा म्हणजेच माझ्या दुबळेपणाचा हा आवाज असेल असे मी मनात म्हणे. सारे उपाय थकले असे मानणे मला कधीच आवडत नाही. सत्याग्रहीने कधीही निरुपाय होता कामा नये. तरवारीच्याऐवजी मला किंवा दुसऱ्याला शेवटचा उपाय उपवास हा असतो. अलिकडे माझी कर्महीनता मला चावत असते. उपवासाने तत्काळ मला शांती मिळेल. गेले तीन दिवस याचा मी सारखा विचार करीत आहे. अखेरचा निर्णय विजेप्रमाणे आला. मला त्याने सुखी वाटत आहे. जो शुद्ध आहे, त्याला स्वतःच्या प्राणाहून

अधिक मौल्यवान असे द्यायला काय आहे ? जे पाऊल मी टाकीत आहे, त्याचे समर्थन करण्याइतपत विशुद्धता माझ्याजवळ आहे असे मला वाटते. ती असावी अशी माझी प्रार्थना आहे. माझ्या प्रयत्नाला तुम्ही सारे आशीर्वाद द्या. माझ्यासाठी नि माझ्यासमवेत प्रार्थना करा. हा अनिश्चित कालमर्यादेचा उपवास आहे. कोणाचे बाह्य दडपण न पडता कर्तव्याचे भान येऊन जेव्हा सर्व जातिजमातींचे हृदयैक्य झाले आहे असे मला वाटेल, तेव्हा उपवास सुटेल. हिंदुस्थानची प्रतिष्ठा घसरत आहे. आशियाच्या आणि तद्द्वारा जगाच्या हृदयावर भारताची असलेली प्रभुता झपाट्याने मावळत चालली आहे. ही प्रतिष्ठा, ही प्रभुता पुन्हा मिळेल. हेच बक्षिस. हिंदुस्थानने आत्मा गमावणे म्हणजे दुःखी, कष्टी, वादळात हेलकावणाऱ्या बुभुक्षित जगाची आशा नष्ट होणे होय. कोणाही मित्राने किंवा कोणी असेलच, तर शत्रूने, मजवर रागवू नये. मी जे पाऊल टाकीत आहे, त्याला सर्वांनी अपरिहार्यपणे मान्यता द्यावी. सारा हिंदुस्थान जर कर्तव्य करायला प्रवृत्त होईल, निदान दिल्ली कर्तव्य करायला उभी राहिली, तरीही माझा उपवास सुटेल."

गांधीजींच्या या उपवासाने सारे राष्ट्र खळबळून गेले. नेत्यांची धावपळ सुरू झाली. दिल्लीत शांतता प्रस्थापनेसाठी प्रयत्न सुरू झाले. एका सभेत जवाहरलालजी म्हणाले, "या उपासात महात्मा गांधींना मृत्यू आला तर हिंदुस्थानचा आत्मा गमावला असेच म्हणावे लागेल." सर्व जमातींनी आपसात स्नेहभाव प्रस्थापित करून गांधीजींचे प्राण वाचवावे अशी त्यांनी सर्वांना कळकळीची विनंती केली.

१५ जानेवारी १९४८ रोजी गांधीजींच्या शांतता प्रस्थापनेच्या प्रयत्नाशी सुसंगत अशी कृती करावयाची म्हणून पंचावन्न कोटीची रक्कम पाकिस्तानला ताबडतोब देऊन टाकण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला. आपल्या दुसऱ्या दिवशीच्या प्रार्थनासभेत गांधीजींनी भारत सरकारने

दाखवलेल्या मनाच्या मोठेपणाबद्दल त्याचे अभिनंदन केले. ते म्हणाले,

"जबाबदार अशा कोणत्याही मंत्रिमंडळाला विचारपूर्वक ठरवलेली नीती बदलणे सोपे काम नसते. तरीही आमच्या मंत्रिमंडळाने—जे सर्वार्थाने जबाबदारीने वागणारे आहे—तितक्याच विचाराने परंतु त्वरेने, ठरलेली नीती बदलली आहे. काश्मीरपासून केप कामोरिनपर्यंत, कराचीपासून आसामपर्यंत, सगळ्या देशाने यासाठी मनापासून धन्यवाद द्यायला हवेत. आणि हिंदी संघराज्याच्या मंत्रिमंडळाने घेतलेला हा निर्णय ऐकून जगातील सारी राष्ट्रे म्हणतील, की इतके मोठे मन करून निर्णय घेणे हिंदी संघराज्याचे मंत्रिमंडळच फक्त करू शकेल. हे धोरण मुस्लीमधार्जिणे नाही. हे धोरण स्वतःच्या संतोषार्थ आहे, आत्म्याच्या समाधानार्थ आहे. विचारहीन जनतेची तात्पुरती स्तुती मिळवण्याच्या इच्छेने मोठ्या मानव-समाजाचे प्रतिनिधित्व करण्यास लायक नि पात्र असणाऱ्या कोणत्याही मंत्रिमंडळाने कोणतेही पाऊल टाकता कामा नये. सर्वत्र अविवेकाचे साम्राज्य चालू असता आमच्या उत्तमोत्तम प्रतिनिधींनी विवेकाने तोल सांभाळून नको का जायला? स्वतःच्या ताब्यातील राष्ट्रनौका धीरोदात्त वर्तनाने त्यांनी फुटण्यापासून नको का वाचवायला? मंत्रिमंडळाला प्रेरणा कोणी दिली? माझ्या उपवासाने. माझ्या उपवासाने सारी दृष्टीच बदलून टाकली. हा उपवास नसता, तर जे केवळ कायदेशीर आहे आणि करणे प्राप्तच आहे, त्याच्यापलीकडे मंत्रिमंडळ गेले नसते. परंतु हिंदी-संघराज्य-सरकारचे आजचे हे कृत्य केवळ शुद्ध सद्भाव नि सदिच्छा यांनी भरलेले आहे. पाकिस्तानची कसोटी आता ते पाहात आहे. आता पाकिस्तानची सत्त्व-परीक्षा. आता केवळ काश्मीरच्या बाबतीत सन्मान्य तडजोड व्हावी असे नाही, तर दोन्ही देशांतील सारेच मतभेद निकालात निघावेत. खरा न्याय केवळ कायद्याच्या अक्षरात नसतो; तो त्या अक्षरांच्या पलीकडेही कधी जाणे अवश्य असते."

काँग्रेस, हिंदुमहासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, मुस्लीम लीग, शिखांच्या संस्था, निर्वासित इत्यादींनी गांधीजींनी मागितलेली लेखी हमी दिल्यावरून दिनांक १८ जानेवारी १९४८ रोजी गांधीजींनी आपले उपोषण सोडले. यानंतर त्यांनी पुढील संदेश दिला, " सत्याच्या म्हणजेच परमेश्वराच्या नावाने मी हे उपोषण सुरू केले होते. फक्त जिवंत सत्यातच परमेश्वराचा वास असतो. गेले काही दिवस आपण निरपराध स्त्रीपुरुषांची व बालकांची कत्तल करण्यात चूर होऊन गेलो होतो. बायकामुलांना पळवून नेताना किंवा सक्तीने धर्मांतर करायला लावताना आपणाला तिळमात्रही शरम वाटली नव्हती. ही सर्व कृत्ये आपण सत्याच्या नावाने केली असतील असे मला वाटत नाही. मी माझे हे उपोषण सत्याच्या नावाने सोडले आहे. "

परंतु गांधीजींच्या मुस्लीम ऐक्याच्या प्रयत्नाने मुस्लीमधार्जिणेपणाचा त्यांच्यावर आरोप लादणारी काही धर्मांध मंडळी होतीच. पाकिस्तानला ५५ कोटींची रक्कम देवविली हे गांधीजींचे कृत्य त्यांना आवडले नाही, ते संतप्त झाले होते.

२० तारखेला बिर्लाभवनाच्या आवारात गांधीजी प्रार्थनेला आरंभ करणार इतक्यात कोणीतरी त्यांच्यावर बाँब फेकला. गांधीजींच्या पासून पन्नास यार्डांवर बाँबचा स्फोट झाला, पण कोणालाही दुखापत वगैरे झाली नाही. या प्रकरणी पश्चिम पंजाबमधून आलेल्या मदनलाल नावाच्या हिंदू निर्वासिताला अटक करण्यात आली. या बाँबस्फोटामुळे गांधीजी यत्किंचितही विचलीत झाले नाहीत. दि. २१ च्या प्रार्थनासभेत ते म्हणाले, " काल माझ्या प्रार्थनेच्या वेळी झालेला स्फोट बाँबचा होता व तो माझ्यावर फेकण्यात आलेला होता हे मला माहीत नव्हते. कालच्या तरुणाने ज्या लोकांच्या पाठबळावर हे दुष्कृत्य केले असेल त्या लोकांना माझी अशी प्रेमाची विनंती आहे की त्यांनी अशा आततायी कृत्यापासून परावृत्त व्हावे, हिंदुधर्माचे संरक्षण करण्याचा हा खरा मार्ग नव्हे."

३० जानेवारी १९४८ रोजी गांधीजी नेहमीप्रमाणे पहाटे साडेतीन वाजता उठले. प्रार्थना आटोपून ते कामाला लागले. दिवसभर त्यांचे नित्याचे उद्योग, भेटीगाठी, मुलाखती इत्यादी चाललेच होते.

सायंकाळी बरोबर पाच वाजून दहा मिनिटांनी गांधीजी आपल्या खोलीतून बाहेर पडले व आपल्या प्रार्थनेच्या जागेकडे निघाले. आपल्या नातीच्या खांद्यावर त्यांनी आधारासाठी हात ठेवलेले होते. प्रार्थनेसाठी पुष्कळ लोक जमलेले होते. जाताना लोकांना नमस्कार करण्यासाठी त्यांनी हात काढून घेतले. इतक्यात नथूराम गोडसे नामक एक माथेफिरू गर्दीतून घुसून पुढे आला. तो गांधीजींच्या पाया पडण्यासाठी पुढे घुसत असावा अशा कल्पनेने गांधीजींच्या एका नातीने त्याला बाजूला करण्यासाठी त्याचा हात पकडला, पण त्या उद्दाम माणसाने तिच्या हाताला हिसडा मारून आपला हात सोडवून घेतला. चटकन तो गांधीजींच्या समोर गेला आणि त्याने त्यांच्यावर पिस्तूल रोखून तीन गोळ्या झाडल्या. गांधीजी खाली कोसळता कोसळता पुटपुटले, ' हे राम ! '



राष्ट्रपिता हरपला

युगायुगातून संभवणाऱ्या एका महामानवाचा आत्मा अनंतात विलीन झाला ! सारे जग शोकाकुल झाले. भारतीय जनतेचा राष्ट्रपिता हरपला !

☆ ☆ ☆

# हैद्राबादचे विलिनीकरण

भारताच्या किंवा पाकिस्तानच्या घटनासमितीत आपला प्रतिनिधी आपण पाठवणार नाही व १५ ऑगस्ट १९४७ पासून आपले हैद्राबाद संस्थान पूर्णपणे स्वतंत्र होईल अशी घोषणा निझामाने आधीच करून टाकली होती. सुमारे दीड कोटहून अधिक लोकसंख्येचे व ८०-८२ हजार चौरस मैलांइतका विस्तीर्ण प्रदेश असलेले हैद्राबाद संस्थान स्वतंत्र राज्य म्हणूनच ठेवण्याची निजामाची इच्छा होती. म्हणून त्याने भारत सरकारच्या सामीलनाम्यावरही मुदतीत सही केली नव्हती. त्याने मौंटबॅटनला कळविले होते की, " हैद्राबाद संस्थान भारतात व पाकिस्तानात सामील करण्याचा जरी माझा विचार नसला तरी भारत सरकारशी काही बाबतीत मी तह करायला तयार आहे. " आणि एवढे कळवूनच निझाम थांबला नव्हता तर, रेल्वे आणि दळणवळण, उभय राष्ट्रांना मान्य होईल एवढे सैन्य भारताच्या संरक्षणासाठी ठेवणे आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारात सामान्यतः भारताच्या अनुमतीने हैद्राबादचे स्थान ठरवणे

अशा तऱ्हाच्या बाबीही त्याने कळवून टाकल्या होत्या. अर्थात या सर्व गोष्टी तेथील जनतेच्या इच्छेविरुद्ध होत्या. जनतेला भारताशी विलीन होऊन स्वातंत्र्य भोगण्याची इच्छा होती.

सरदार वल्लभभाई पटेलांना निझामाचे धोरण मुळीच पटले नाही. भारतीय संघराज्यात विलीन होण्याव्यतिरिक्त निझामाला अन्य मोकळीक देता येणार नाही, व निझामाला आपल्या प्रजेची आकांक्षा लक्षात घेऊनच वागावे लागेल हे त्यांनी स्पष्ट केले. या नुसार मौंटबॅटननी निझामाला संस्थानात ब्रिटिश अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली लोकमत घेण्याविषयी सूचना केली, परंतु निझामाने "हैद्राबादची घटनात्मक परिस्थिती आणि हैद्राबादपुढील समस्या यांचा विचार करता जनमताचा कौल घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही" असे कळविले.

पत्रव्यवहार, शिष्टमंडळ, वाटाघाटी यांचे असे गुऱ्हाळ चालू होते, विलीनीकरणाचा क्षण काही ना काही सबबी उकरून काढून निझाम एकीकडे लांबणीवर टाकीत होता. परंतु दुसरीकडे मात्र प्रसंग पडलाच तर भारत सरकारशी लढा देण्याचीही तो तयारी करीत होता. झेकोस्लोव्हाकियाकडून बरीच शस्त्रास्त्रे व दारूगोळा खरेदी केल्याचे वृत्त होते. पाकिस्तानात जीनांशीही त्याने वाटाघाटी सुरू केल्या होत्या. पाकिस्तानचे सर झाफरुल्लाखान यांना हैद्राबादला प्रमुखपदी आणण्याची खटपट सुरू होती. ब्रिटनच्या राजाकडेही त्याने गुप्तपणे मदत मागितली होती आणि यूनोतही हा प्रश्न घेऊन जाण्याचा त्याचा विचार होता. दिल्लीशी चाललेल्या वाटाघाटीतून काही निष्पन्न होत नव्हते, परंतु हैद्राबादच्या निझामाच्या हालचालींवर दिल्लीचे पूर्ण लक्ष होते. २९ नोव्हेंबरला 'जैसे थे' स्वरूपाचा एक तात्पुरता करार मात्र उभयतांत झाला होता.

राजकीय पातळीवर वाटाघाटींचा घोळ चाललेला होता, तर प्रत्यक्ष

संस्थानात इत्तिहाद-उल-मुसलमीन या धर्मांध संस्थेच्या पिसाटांनी नंगा-नाच सुरू केलेला होता. त्यांना रझाकार म्हणत असत आणि त्यांचा नेता कासीम रझवी हा एक हेकट, उग्र, महत्त्वाकांक्षी व गुंड प्रवृत्तीचा इसम होता. त्याने आपल्या रझाकारांना हिंदूंना छळण्यासाठी चिथावणी दिली. ठिक-ठिकाणी रझाकारांनी अमानुष कृत्ये केली. हिंदूंची घरेदारे लुटली, पेटवली. शेतीभाती ओस पाडली. अत्याचार केले. सबंध संस्थानभर क्रूर दडपशाही आणि अन्यायाचे राज्य सुरू झाले. या हिंसक, दुष्ट चळवळीचा हैद्रा-बादच्या निझामाने वरकरणी निषेध केला. आपला त्याच्याशी संबंध नाही असे जाहीर केले. परंतु आतून त्याचे प्रोत्साहनच होते. संस्थानातील मुसल-मानांचा भारताशी विलीन होण्यास विरोध आहे, व त्यांच्याविरुद्ध जर सामीलनाम्यावर सही केली तर संस्थानात मोठ्या प्रमाणावर दंगे उसळतील, विध्वंस होईल, रक्तपात होईल यांची चुणुक तो याद्वारे दाखवीत होता कासीम रझवी ह्या माथेफिरूची मजल भारताशी युद्ध पुकारण्यापर्यंत गेलेली होती.

रझाकारांच्या अत्याचाराने प्रजा अत्यंत गांजली होती. कित्येक लोक प्राणभयाने गावे सोडून गेले होते. प्रवाशांवर, गाड्यांवर रझाकार हल्ले चढवीत असत, माणसे ठार मारली जात असत, पण निझामी पोलीस त्यांना प्रतिबंध करीत नसत.

दिल्लीशी वाटाघाटी करण्यासाठी निझामाचे शिष्टमंडळ खेपा घालीत होते. काही करारमदार चर्चिले जात होते. २७ ऑक्टोबरच्या पहाटे रझा-कारांनी शिष्टमंडळातील सभासदांच्या बंगल्यालाच घेराव घातला. रझा-कारांना भारताशी कसलीही तडजोड नको होती. शिष्टमंडळातील छत्तारीचे नबाब यांनी कसेबसे पोलीस संरक्षण मिळवून सुटका करून घेतली.

निझामाने भारताशी 'जैसे थे' करार केला होता; परंतु त्या करारातील

एकाही कलमाचे पालन निझाम करीत नव्हता. आपले पहिले मंत्रिमंडळ बदलून त्यात दुसरे जातीयवादी लोक घेतले. कासीम रझवी हा निझामाला भडकावीत होताच. काश्मीर व अन्य निर्वासित प्रश्नांत भारत सरकार गुंतलेले असल्यामुळे हैद्राबादला काहीही धोका नाही अशी त्याची कल्पना होती. रझाकारांचे अत्याचार वाढत होते. शेवटी सरदार वल्लभभाई पटेल यांनी जबाबदार मंत्रिमंडळ आणि संस्थानचे सामीलीकरण याशिवाय कुठलाही पर्याय स्वीकारायचा नाही हे ठरवले. तसेच अधिक वेळ घालविला तर परिस्थिती अधिक बिघडून भारत सरकारच्या हाता-बाहेर जाण्याची शक्यताही त्यांनी लक्षात घेतली. कारण हैद्राबाद संस्थानातील कारभार रझाकारांच्या हाती गेलेला होता आणि जंगली कायदा अमलात आलेला होता. संस्थानातील उपद्रवाची झळ सर-हद्दीवरील प्रांतांनाही पोचली होती.



पोलादी नेतृत्व

शांततेने प्रश्न सुटण्याची शक्यता नष्ट झाल्यावरच भारत सरकारने शेवटी हैद्राबादमध्ये पोलीस कारवाई करण्याचा निर्णय केला. त्यानुसार १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारतीय सेना हैद्राबादच्या हद्दीत घुसली. सोलापूर–हैद्राबाद व विजयवाडा–हैद्राबाद अशा दोन्ही बाजूंनी ही चढाई सुरू झाली. मेजर जनरल जे. एन्. चौधरी आणि लेफ्टनंट जनरल महाराज राजेंद्रसिंहजी यांच्याकडे या चढाईचे नेतृत्व होते. भारतीय सेनेला रझाकार आणि हैद्रा-बादची संस्थानी फौज यांनी सुरुवातीला थोडा प्रतिकार केला; पण भारतीय

फौजेपुढे त्यांना फार काळ टिकाव धरता आला नाही. वल्गना करणारे रझाकार आणि कासीम रझवी यांना भारतीय सेनेपुढे पळता भुई थोडी झाली. रझाकारांची वरीच हानी झाली. सुमारे आठशे लोक या चकमकीत कामी आले.

१०८ तास चाललेली ही कारवाई १७ सप्टेंबरच्या सायंकाळी थांबली. हैद्राबादच्या संस्थानी फौजा शरण आल्या. १८ तारखेला मेजर जनरल चौधरींच्या नेतृत्वाखाली भारतीय सेनेने हैद्राबाद या राजधानीच्या शहरात प्रवेश केला. हैद्राबादच्या प्रजेने त्यांचे अंतःकरणपूर्वक, हर्षभराने स्वागत केले. हैद्राबादच्या जनतेचा तो मुक्तिदिन होता. त्याच दिवशी चौधरींनी हैद्राबादचे लष्करी प्रशासक म्हणून अधिकाराची सूत्रे स्वीकारली. हैद्राबादचे प्रकरण निकालात निघाले. हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झाले.

☆ ☆ ☆

# प्रजासत्ताक भारत

काश्मीरचा रेंगाळत पडलेला एक प्रश्न सोडला तर भारतातील बाकी सर्व लहानमोठ्या संस्थानांचा प्रश्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कुशल आणि कणखर धोरणामुळे १५ ऑक्टोबर १९४९ पर्यंत पूर्णपणाने सुटला होता. ही सर्व संस्थाने भारतीय संघराज्यात विलीन झाली होती.

या अवधीत भारताचे गव्हर्नर जनरल लॉर्ड मौंटबॅटन यांची २१ जून १९४८ ला मुदत संपली आणि ते आपल्या मायदेशी इंग्लंडला परत गेले. त्यांच्या जागी चक्रवर्ती राजगोपालाचारी ऊर्फ राजाजी यांची भारताचे गव्हर्नर जनरल म्हणून नियुक्ती झाली.

राजाजी हे स्वतंत्र भारताचे पहिले हिंदी गव्हर्नर जनरल होत. त्याचप्रमाणे १५ जानेवारी १९४९ रोजी जनरल के. एम्. करिअप्पा यांनी पहिले भारतीय लष्कर प्रमुख म्हणून सेनेची सूत्रे हाती घेतली.

गांधीजींच्या पश्चात भिन्न भिन्न विचारांच्या गटांना

एकत्र ठेवू शकणारा नेता देशात उरला नाही. काँग्रेसचे स्वरूपही स्वातंत्र्यानंतर एकपक्षीय बनलेले होते. स्वातंत्र्यापूर्वी काँग्रेस ही एक स्वातंत्र्यप्राप्तीच्या समान ध्येयाने एकत्र आलेल्या राष्ट्रभक्तांची आघाडी होती. राष्ट्रीय सभा होती. म्हणूनच गांधीजींनी अखेरच्या दिवसात काँग्रेसचे स्वातंत्र्यप्राप्तीचे ध्येय सिद्ध झालेले असल्यामुळे काँग्रेसचे 'लोकसेवक' पक्षात परिवर्तन करावे असा सल्ला दिलेला होता. या लोकसेवक पक्षाच्या घटनेचा कच्चा आराखडाही त्यांनी तयार केलेला होता. परंतु गांधीजींची ही इच्छा काँग्रेसश्रेष्ठींनी मानली नाही. आणि काँग्रेस हा स्वातंत्र्योत्तर काळातला देशातला एक प्रमुख व सत्ताधारी पक्ष बनला. साहजिकच या पक्षाहून थोडी भिन्न मते वा विचारसरणी असलेल्या गटांना काँग्रेस पक्षात स्थान उरले नाही. त्या काळी काँग्रेसने अद्याप समाजवादी समाजरचनेचा ध्येय म्हणून स्वीकार केलेला नव्हता, अशा परिस्थितीत काँग्रेस समाजवादी पक्षाला काँग्रेसबाहेर पडून समाजवादी आंदोलनाची आघाडी उघडून ती संघटित केल्याशिवाय गत्यंतरच नव्हते. मार्च १९४८ मध्ये नासिक येथेच काँग्रेस समाजवादी पक्षाचे अधिवेशन झाले आणि हा पक्ष काँग्रेसमधून बाहेर पडला. 'समाजवादी पक्ष' म्हणून भारतात पर्यायी पक्षाचे काम करू लागला.


चक्रवर्ति राजगोपालाचारी

९ डिसेंबर १९४६ रोजी घटना समितीच्या कामकाजाला सुरुवात

झाली होती. या समितीचे कामकाज दोन वर्षे अकरा महिने आणि अठरा दिवस चालले. डॉ. राजेंद्रप्रसाद हे घटना परिषदेचे अध्यक्ष म्हणून काम पाहात होते. देशातील निरनिराळी घटक राज्ये, त्यांची आर्थिक; सामाजिक आणि राजकीय परिस्थिती यांचा अभ्यास करून राज्यघटनेचा मसुदा तयार करण्याचे महत्त्वाचे कार्य ह्या घटना परिषदेला करावयाचे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली नेमलेल्या एका उपसमितीने हा मसुदा तयार केला. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 'भारतीय घटनेचे शिल्पकार' असे म्हणतात.

लोकांनी निवडलेली अशी एखादी घटना परिषद असावी ही कल्पना म. गांधींना प्रथम १९२२ मध्ये सुचली. त्यांनी त्यावेळी असे म्हटले होते, "भारताचे स्वराज्य ही काही ब्रिटिश पार्लमेंटने दान केलेली वस्तू राहणार नाही तर भारताचे विचार व आकांक्षा नमूद करणारी ती एक घोषणा राहील. ते पार्लमेंटच्या कायद्यातून व्यक्त केले जाईल हे खरे असले तरी भारतीय लोकांनी जाहीरपणे व्यक्त केलेल्या इच्छेवर सौजन्यपूर्वक शिक्कामोर्तब करणारी ती केवळ घोषणा राहील."


भारताच्या घटना परिषदेने २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संघराज्याच्या घटनेस मान्यता दिली. त्यावेळी उद्घोषित करण्यात आलेला सरनामा असा :—

> "आम्ही भारताचे लोक, भारताचे सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक राज्य निर्माण करण्याचे आणि सर्व भारतीय नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय **न्याय**; विचार, उच्चार, समजुती व श्रद्धा, पूजा यांचे **स्वातंत्र्य** आणि दर्जा व संधी यांची **समानता** प्राप्त होण्यासाठी आणि व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राचे ऐक्य याविषयी भरंवसा देऊन त्यांच्यामध्ये **बंधुभाव** वाढावा यासाठी आमच्या घटना परिषदेत, २६ नोव्हेंबर १९४९ या दिवशी ही घटना मंजूर

करीत आहोत व तत्संबंधी कायदा करून, तिचा अंगीकार करीत आहोत."

न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या चार प्रमुख तत्त्वांच्या पूर्ततेसाठी प्रत्येक भारतीय नागरिकाला या घटनेने अत्यंत मोलाचे हक्क दिलेले आहेत. या हक्कांना 'मूलभूत हक्क' असे म्हणतात. हे हक्क व्यक्तिविकासाच्या आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असे आहेत. ह्या हक्कांवर जर कोणी गदा आणली, ते उपभोगण्यात अडचणी निर्माण केल्या तर त्याविरुद्ध नागरिकाला न्यायालयाकडे दाद मागता येते. न्यायालय या हक्कांचे संरक्षण करते.

भारताची घटना हा एक मोठा दस्तऐवज आहे. बहुधा जगातील ही सर्वात प्रदीर्घ लिखित घटना असेल. इतर घटनांमध्ये राज्यकारभाराची मूलभूत तत्त्वे केवळ नमूद केली आहेत. परंतु भारताची घटना तशी नाही. तसेच केवळ संघराज्यात्मक ( फेडरल ) सरकारचा तिच्यात परामर्श घेण्यात आला नाही. तिच्यात खालील विषयांच्या बाबतींत सविस्तर तरतुदी करण्यात आल्या आहेत :



डॉ. बाबासाहेब आंबेडकर

( १ ) नागरिकत्व ( २ ) मूलभूत हक्क ( ३ ) सरकारी धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे ( ४ ) सरकारी यंत्रणा ( ५ ) संसद व राज्याची विधीमंडळे ( ६ ) संघाची न्याय व्यवस्था व वरिष्ठ न्यायालये ( ७ ) संघ व घटक राज्ये यांचे संबंध ( ८ ) नोकऱ्या ( ९ ) सरकारी भाषा व ( १० ) मह-

स्वाचे इतर विषय.

भारताची घटना निःसंशय लोकशाही आणि लोकसत्ताक स्वरूपाची आहे. भारत हे एक सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक आहे, असे ती जाहीर करते. हेच दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे प्रत्येक नागरिकाला केवळ मतदानाचा व आपले प्रतिनिधी निवडण्याचा हक्क आहे असे नाही, तर अधिकारपद ग्रहण करण्याचा व त्यासाठी निवडला जाण्याचाही हक्क आहे. भारताच्या इतिहासात प्रथमच या घटनेने हा हक्क सर्व प्रौढ नागरिकांना दिला असून जन्म, वंश, पैसा अथवा लिंग यापैकी कोणत्याही कारणावरून केला जाणारा पक्षपात व सर्व भेदभाव दूर करण्यात आले आहेत. संसदीय पद्धतीचे सरकार आणि प्रौढ मताधिकार यांच्यामुळे सरकार, लोकांना आणि त्यांच्या प्रतिनिधींना जबाबदार आहे.

भारतात अनेक धर्मांचे व जातींचे लोक राहात असले तरी धर्म किंवा जात यांच्यावर आधारलेल्या धोरणाला घटनेचा विरोध आहे आणि भारत धर्मनिरपेक्ष राज्य असल्याचा ती पुरस्कार करते. धर्म, जात, वंश किंवा लिंगभेद या बाबी विचारात न घेता सर्वांना एकच नागरिकत्व देण्यात आले आहे. राज्य कोणत्याही विशिष्ट धर्माचा पुरस्कार करीत नाही, धर्मनिरपेक्ष राज्य, माणूस आणि देव यांच्यांतील नव्हे तर केवळ माणसामाणसांतील संबंधांचाच विचार करते, या सिद्धांतावर हे ध्येय आधारलेले आहे. व्यक्तीच्या केवळ इतर माणसांबरोबरच्या आचरणाचे नियमन राज्य करते.

भारताची घटना लिखित असल्यामुळे विधीमंडळ, कार्यकारीमंडळ व न्यायमंडळ यांना घटनेनुसार विशिष्ट अधिकार मिळाले आहेत. केंद्रीय किंवा कोणत्याही राज्याच्या विधिमंडळाने केलेला एखादा कायदा घटनेत नमूद केलेल्या मूलभूत हक्कांचा किंवा इतर कोणत्या तरतुदींचा भंग करणारा असल्यास तो असनदशीर असल्याचे जाहीर करण्याचा अधिकार घटनेने न्यायमंडळाला दिला आहे.

भारताची राज्यघटना संयुक्त राज्यात्मक असून तिचा कल एकात्म पद्धतीकडे आहे. संयुक्त राज्यात्मक पद्धतीच्या निरनिराळ्या सिद्धांतांमधील तडजोड तिने साधली आहे. कोणत्याही संयुक्त राज्यात्मक घटनेची सर्वसामान्य लक्षणे तिच्यात आढळतात; ती म्हणजे घटनेचे सर्वश्रेष्ठत्व, सर्वोच्च न्यायालयाचे अस्तित्व व अधिकारांची विभागणी.

आणीबाणीच्या काळात केंद्र सरकारला घटक राज्यसरकारांच्या अधिकारांवर अतिक्रमण करण्याचा अधिकार आहे हे भारताच्या संयुक्त राज्यात्मक राज्यव्यवस्थेचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

लोकशाही घटना लवचिक असली पाहिजे व बदलत्या परिस्थितीची दखल घेणारी असायला हवी. भारताच्या घटनेत हा गुण आहे. ही घटना सर्वस्वी निर्दोष आहे व ती बदलता येणार नाही असे घटना परिषदेने म्हटले नाही. घटना दुरुस्त करण्याच्या विविध पद्धतींची तरतूद या घटनेत आहे.

अशोक चक्रांकित तिरंगी राष्ट्रध्वज, 'जन गण मन' हे राष्ट्रगीत व अशोकस्तंभ हे राष्ट्रचिन्ह भारताला घटना परिषदेने दिले.

घटना परिषदेने मंजूर केलेली भारताची राज्यघटना २६ जानेवारी १९५० पासून अमलात आली. या दिवशी भारत प्रजासत्ताक बनला. म्हणून २६ जानेवारी हा प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो.

नव्या घटनेत गव्हर्नर जनरल हे पद गेले आणि लोकप्रतिनिधींनी निवडलेला राष्ट्रपती हे पद आले. भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद बनले आणि उपराष्ट्रपती म्हणून डॉ. राधाकृष्णन यांची निवड झाली.

☆ ☆ ☆

# स्वतंत्र भारताचे आर्थिक नियोजन

पं. जवाहरलाल नेहरू यांनी पंतप्रधानकीची सूत्रे हाती घेतल्यानंतर नवभारताची उभारणी करण्यास सुरवात केली. हे काम अत्यंत विकट तसेच प्रतिभेचे देखील होते. देशाला केवळ स्वराज्य मिळवून भागत नाही, तर मिळवलेल्या स्वराज्याचे सुराज्य करावयाचे असते. ज्यांच्यासाठी हे स्वातंत्र्य मिळवले ते समाजातील शेवटच्या थरातील माणसामाणसापर्यंत पोचेल अशी योजना करावी लागते. नाहीतर काही मूठभर उच्चभ्रू लोकांनाच स्वातंत्र्याच लाभ होतो आणि देशातील बहुजन गोरगरीब, आदिवासी, हरिजन, गिरीजन यांना काहीच मिळत नाही. पारतंत्र्यात चालू होते तसेच शोषण, तसेच दारिद्य, तीच दुःखे, हालकष्ट, आणि अज्ञान, रोगराई, अस्वच्छता-सर्व गोष्टींचा अभाव- हे सर्व जर तसेच राहिले तर पारतंत्र्य गेले काय नी स्वातंत्र्य आले काय, बहुजनांच्या परिस्थितीत फरक पडणार नाही. परंतु स्वातंत्र्य म्हणजे तर विकासाची, समृद्धीची, सुखाची, शांतीची, कामाची संधी ! प्रत्येकाच्या पुरु-

षार्थाला वाव ! अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, संरक्षण, औषधोपचार या जीवनावश्यक गरजा स्वातंत्र्यात पुरवल्या गेल्याच पाहिजेत. या माणसाच्या किमान आवश्यक गरजा आहेत. याहून कला, साहित्य, वाणिज्यशास्त्र इत्यादी कितीतरी जीवनाच्या विकासाची अंगोपांगे आहेत. स्वातंत्र्याने ही सगळी द्वारे सगळ्यांना खुली झाली पाहिजेत. माणसाचे व्यक्तिमत्त्व पूर्ण विकसित प्रगल्भ, जबाबदार बनले पाहिजे. दारिद्र्य, आळस, भेदाभेद, विषमता यांचा नायनाट झाला पाहिजे.

परंतु स्वातंत्र्य म्हणजे काही जादूची कांडी नव्हे, किंवा एखादा अद्‌भुत मंत्र नव्हे, की ज्याच्या योगाने झटपट आबादीआबाद करून सोडता येईल ! स्वातंत्र्य संधी उपलब्ध करून करून देते, पारतंत्र्याने बंद केलेली दारे उघडी करून देते.

२६ जानेवारी १९५० रोजी भारत प्रजासत्ताक बनला. त्याची नवी घटना अमलात आली. पंडित नेहरूंनी भारताच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने विचार करून २८ फेब्रुवारी १९५० रोजी 'नियोजन मंडळ'— (प्लॅनिंग कमिशन) स्थापन केले. नेहरूंचे मन आधुनिक विचार ग्रहण करणारे होते. रशियासारख्या देशाने क्रांतीनंतर आपली आर्थिक घडी कसकशी टप्प्याटप्प्याने बसवली हे त्यांनी पाहिले होते. अभ्यासले होते. देशाची सर्वांगीण समृद्धी करायची तर त्यासाठी सुसूत्र, मूलभूत अशी काही योजना हवी हे त्यांना पटलेले होते. स्वातंत्र्यापूर्वीपासूनच त्यांनी याचा विचार केलेला होता.

२ सप्टेंबर १९४६ रोजी नेहरूंनी हंगामी सरकारचे उपाध्यक्षपद स्वीकारले होते. भविष्यकाळाविषयी त्यावेळी निश्चितपणाने कोणीच काही सांगू शकत नव्हते. अशावेळी सुद्धा नेहरूंनी पहिली गोष्ट केली ती म्हणजे सल्लागार योजना मंडळीची स्थापना, व पुढे याच बोर्डाने नियोजन मंडळ नेमण्याची सूचना केली. त्यानंतर शास्त्रीय व तांत्रिक शिक्षणाच्या दृष्टीने

पाऊल टाकण्यात आले. ‘Scientific Man Power Committee’ अस्तित्वात आली. राष्ट्रीय प्रयोगशाळांची स्थापना करण्याचे आधीपासूनच घाटत होते, परंतु नेहरूंनी या योजनेचा मोठ्या प्रमाणावर विस्तार करून सातत्याने पाठपुरावा केला.

स्वातंत्र्यनंतरचा दोन वर्षांचा काळ खूपच अस्थिरतेचा गेला. देशाची फाळणी, काश्मीर-आक्रमण आदी नवी संकटे व विवंचना देशापुढे उभ्या राहिल्या. या काळात मनात असूनही नेहरूंना नियोजनाकडे लक्ष पुरवता आले नाही. मात्र थोडी संधी मिळताच १९४९ च्या मध्यास नेहरूंचे लक्ष अन्नप्रश्न व आर्थिक नियोजनाकडे वळले. १९४९ च्या अखेरीस एका परदेशी तज्ज्ञाकडून आर्थिक नियोजन आणि त्याची कार्यपद्धती यांसंबंधी त्यांनी एक मसुदा तयार करून घेतला. वरिष्ठ अधिकारी व सेक्रेटरी यांनी त्यावर विचार-विनिमय केला. परंतु त्यांचा दृष्टीकोन नियोजनास अनुकूल नव्हता. यावर नेहरूंनी स्वतंत्रपणे कॉंग्रेस वर्किंग कमिटीमध्ये १९५० साली नियोजन मंडळ नेमण्याचा निर्णय केला. सरकारी ठरावाचा बराचसा भाग त्यांनी स्वतः लिहिला. नियोजन मंडळाच्या कार्याची घटनेतील मार्गदर्शक तत्त्वे व मूलभूत हक्क यांच्याशी त्यांनी सांगड घातली. ते हक्क असे :

( १ ) देशातील नागरिकांना निर्वाह-साधन प्राप्त करून देणे.

( २ ) देशातील भौतिक संपत्तीची मालकी व वाटणी अशा रीतीने केली जाईल की त्यात सामान्य लोकांचे हित साधेल.

( ३ ) अर्थव्यवस्था अशा रीतीने हाताळली जाईल की संपत्तीचे केंद्रीकरण होणार नाही व उत्पादन साधनांनीही सर्वसामान्य लोकांचे अहित होणार नाही.

या मार्गदर्शक तत्त्वांच्या आधाराने व सरकारने जाहीर केलेल्या ध्येयानुसार उत्पादन वाढवून लोकांच्या जीवनमानात जलद वाढ करणे हे ध्येयही नियोजनमंडळापुढे होते.

१९८
किशोर ३९५

तज्ज्ञांच्या मते भारताच्या नियोजनाचा विशेष असा की या नियोजनाचे मूळ लोकशाही व समाजवादात रुजलेले आहे.

भारत व इतर देशातील नियोजनात एक महत्त्वाचा फरक असा केला जातो की, भारतीय नियोजनात येथील राष्ट्रीय आंदोलनापासून घेतलेली स्फूर्ती व प्रेरणा त्यात प्रामुख्याने प्रतिबिंबित झालेली आहे. तसेच एका योजनेकडून दुसऱ्या योजनेकडे जाताना आढळणारे सातत्य व राष्ट्रीय जीवनातील प्रत्येक पातळीवर सामान्यांचाही होणारा समावेश निदर्शक वाटतो. भारतातील नियोजनात केवळ आर्थिक विकासाचे ध्येयच साध्य होत नसून त्याबरोबर समाजाचा कायापालट घडवून आणणे, अधिक व्यापक नेतृत्व निर्माण करणे व लोकशाही संस्थांची निर्मिती करून त्याच्याद्वारे समान प्रश्नांची सोडवणूक करणे, व जीवनमान वाढविण्याचा प्रयत्न करणे ही उद्दिष्टे साधण्याचाही मानस आहे. दादाभाईंपासून महात्माजींपर्यंत अनेक राष्ट्रीय पुढाऱ्यांचा दृष्टिकोनही या विचारसरणीस कारणीभूत आहे.

'नियोजन' ही पं. नेहरू यांची स्वतंत्र भारताला मिळालेली अभिनव व अत्यंत महत्त्वाची अशी देणगी आहे. स्वातंत्र्याच्या पंचवीस वर्षांच्या काळात चार पंचवार्षिक योजना झाल्या. त्यापैकी तीन योजना नेहरूंच्या १७ वर्षांच्या पंतप्रधानजींच्या कारकीर्दीत झाल्या. या तीनही योजना त्यांनी त्यावेळी लोकसभेपुढे मांडल्या. योजनांचा प्रारंभ व समाप्तीच्या तारखा ऐतिहासिक महत्त्वाच्या आहेत असे त्यांनी सांगितले. त्यांनी वेळोवेळी पंचवार्षिक योजनांवर केलेली भाषणे ही योजनातील अग्रक्रम व मर्यादा एवढ्यापुरतीच मर्यादित नसून भविष्यकाळातील त्यांनी रेखाटलेली स्वप्ने त्यांच्या कल्पकतेची, प्रतिभेची प्रचीति देतात.

नियोजन कार्यावर पं. जवाहरलाल नेहरूंची विलक्षण भक्तीच होती असे म्हटले तरी चालेल. भारताच्या नवनिर्मितीच्या ध्यासातून ही भक्ती जन्मलेली होती. आणि म्हणूनच मग ते ठिकठिकाणची धरणे, कारखाने

विद्युतगृहे आदी प्रकल्पांना ' भारताची नवी तीर्थक्षेत्रे ' असे म्हणत असत.

पं. जवाहरलाल नेहरू यांचा नियोजनाशी आलेला संबंध हा देखील जनतेच्या प्रश्नाशी तादात्म्य पावूनच आला होता. स्वातंत्र्यपूर्व काळातही राष्ट्रीय नियोजन समितीत अनेक वर्षे त्यांनी आस्थेने काम केले होते. नियोजन मंडळाच्या स्थापनेनंतर त्याचे अध्यक्ष म्हणून नेहरूंनी सातत्याने सर्वत्र संबंध ठेवलेले होते. नियोजन मंडळाच्या बहुतेक बैठकांना ते हजर राहत असत, तेथील चर्चेत भाग घेत असत आणि प्रसंगी तत्त्वाला मुरड घालण्याची वेळ उद्भवली तर ते स्वतः काळजीपूर्वक अभ्यास करून मार्गदर्शन करीत असत. आपला जास्तीत जास्त वेळ नियोजन कार्यासाठी खर्च करावा. अशी त्यांची उत्कट मनीषा होती. या उत्कटतेमधून ' आराम हराम है ! ' ही घोषणा त्यांच्या मुखातून आली.

या नियोजन मंडळामार्फतच पुढील पंचवार्षिक योजनांची आखणी झाली.

☆ ☆ ☆

## पुढची वाटचाल

अडचणीतून, संकटांतून भारत आपली वाटचाल करीत होता.

१५ डिसेंबर १९५० रोजी भारताचे उपपंतप्रधान आणि गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांचे दुःखद निधन झाले. वल्लभभाईंना भारताचा ' पोलादी पुरुष ' असे म्हटले जाई. त्यांच्या खंबीर, निश्चयी धोरणाने त्यांनी हे विशेषण सार्थ केले होते. नुकत्याच स्वतंत्र झालेल्या भारताला आपल्या भावी वाटचालीत वल्लभभाईंच्या नेतृत्वाचा दीर्घकाळ लाभ झाला नाही.

स्वातंत्र्य मिळाल्यावरही भारताचे पाँडेचरी व गोवा हे भूभाग परसत्तेच्याच अमलाखाली होते, त्यापैकी पाँडेचरी ही फ्रेंच वसाहत होती व गोवा हा पोर्तुगीजांच्या अमलाखाली होता.

काळाची चाहूल ओळखून व बदललेली परिस्थिती लक्षात घेऊन चंद्रनगर येथील फ्रेंच वसाहत भारताच्या स्वाधीन करण्याचा करार भारत आणि फ्रान्स यांच्यामध्ये झाला.

याच साली भूदान आंदोलनाचा जन्म झाला. १९५१ सालातील एप्रिल महिना होता. त्यावर्षीचे सर्वोदय संमेलन तेलंगणातील शिवरामपल्ली नावाच्या गावी भरले होते. गांधीजींच्या पश्चात गांधीविचाराच्या मंडळींनी एकत्र येऊन सर्वोदय समाजाची स्थापना केली होती. गांधीजींच्या विचार-सरणीनुसार विधायक कामे करणारे या समाजात होते. गांधीजींचे राजकीय वारस जवाहरलालजी होते, तर आध्यात्मिक वारस विनोबाजी होते. सर्वोदय समाजाचे नेतृत्व स्वाभाविकपणेच विनोबांच्याकडे आले होते.

शिवरामपल्लीहून पदयात्रा करीत विनोबाजी वर्ध्याकडे परत चालले होते. त्या सुमारास तेलंगणात जमिनीच्या प्रश्नावरून दहशतवादी लोकांच्या चळवळीने मोठे उग्र स्वरूप धारण केले होते. जिकडे तिकडे दंगल, जाळपोळ, खून, मारामाऱ्या यांना ऊत आलेला होता. लोक हवालदिल व भयभीत झालेले होते.

एके दिवशी तेलंगणातील ' पोचमपल्ली ' नावाच्या गावी विनोबांचा मुक्काम होता. त्यांच्या नित्य कार्यक्रमाप्रमाणे सायंकाळी त्या गावात विनोबा-जींची प्रार्थना सभा झाली. सभेला लहान-थोर, स्त्री-पुरुष, स्पृश्य-अस्पृश्य सारे गावकरी मोठ्या उत्सुकतेने जमले होते. सभेत भाषण करताना विनोबांनी जमिनीच्या प्रश्नाचा उल्लेख केला.

सभेत एका बाजूलाच काही हरिजन बंधू बसले होते. विनोबांचे भाषण ऐकून त्यांच्यापैकी एकजण उठून उभा राहिला आणि म्हणाला,

" आम्ही जमिनीत कष्ट करायला, घाम गाळायला तयार आहोत. पण आमच्याजवळ तसूभरही जमिनीचा तुकडा नाही."

विनोबांनी त्यांना विचारले, " किती जमीन लागेल तुम्हाला ? "

त्या हरिजन बांधवांनी आपसात विचार केला. हिशेब केला. आणि सांगितले, " आम्हाला ऐंशी एकर जमीन द्या ! "

त्यांची ही मागणी न्यायाची होती. सत्याची होती. कारण जमीन ही

ईश्वराचीच निर्मिती आहे. हवा, चंद्र, सूर्य, प्रकाश, पाणी, वृक्ष, फुले यांवर जशी कुणाची मालकी असू शकत नाही, तशीच ती जमिनीवरही असता कामा नये. सारी मानवजात ही धरणीमातेचीच संतती आहे. म्हणून जो कुणी भूमीची सेवा करायला तयार असेल त्याला ती मिळाली पाहिजे. तो त्याचा हक्कच आहे.

हरिजन बांधवांच्या मागणीने विनोबांच्या पुढे एक नवीनच प्रश्न उभा राहिला. पण त्यांनी लगेच त्या प्रश्नाचे उत्तर समोर जमलेल्या जनताजनार्दनाकडूनच घेतले. ते सभेला उद्देशून म्हणाले, "या आपल्या भावांची ही जमिनीची भूक कोणी भागविणार नाही का?"


नवा मार्ग सापडला !

त्यांच्या या अंतःकरणाला भिडणाऱ्या हाकेने सारी सभा चित्रासारखी तटस्थ, स्तब्ध झाली ! मागणी न्यायाची, माणुसकीची होती, पण थोडी नवीन व म्हणून विचित्रही वाटत होती ! पण विनोबांनी मानवी अंतःकरणाला लावलेला कौल वाया कसा जाणार? सभेत ताडकन एक गृहस्थ उभे राहिले व म्हणाले,

"या हरिजन बांधवांसाठी मी माझ्या जमिनीपैकी शंभर एकर जमीन दान देतो."

त्या गृहस्थांच्या मुद्रेवर अपूर्व आनंद व समाधान झळकत होते. विनोबांना आणि साऱ्या लोकांना या लहानशा घटनेतून पडलेल्या ठिणगीने एका महान मार्गाचे दर्शन घडवले होते !

ती १९५१ च्या एप्रिलची १८ तारीख होती. हाच भूदानाचा जन्म-दिवस! हेच शंभर एकराचे पहिले भूदान आणि ते देणाऱ्या पोचमपल्लीच्या पहिल्या भूदात्याचे नाव श्री. रामचंद्र रेड्डी!

या घटनेने विनोबा कमालीचे अस्वस्थ झाले. त्यांनी पुढे म्हटले आहे की, 'मला त्या रात्री झोप आली नाही!'—ही नवीन जाग होती. या जागेने नवजागरण देशात घडवण्याचा संकल्प विनोबांनी केला आणि तिथून पुढे सतत १२-१३ वर्षे त्यांनी सर्व भारताची पदयात्रा केली. सुमारे ४५ लाख एकर जमिनीचे भूदान मिळवले. भूदान आंदोलनातूनच ग्रामदान विचाराचा आविष्कार झाला. गावोगावी ग्रामस्वराज्याची स्थापना करण्याच्या या मूलभूत विचाराकडे अनेक देशी आणि परदेशी अर्थशास्त्रज्ञांचे, विचारवंतांचे लक्ष वेधले. जयप्रकाश नारायण यांच्यासारख्या समाजवाद्याला तर समाजक्रांतीची मूलभूत बीजे या आंदोलनात आढळली. आणि म्हणून पक्षीय राजकारणाचा त्याग करून ते सर्वोदयाचे कार्य करू लागले. स्वातंत्र्यानंतर सरकारी पातळीवरून ग्रामीण अर्थरचनेच्या प्रयत्नाव्यतिरिक्त केवळ लोकशक्तीच्या साहाय्याने झालेला हा एकमेव प्रयत्न म्हणून विनोबांच्या ग्रामदान आंदोलनाचा उल्लेख करावा लागेल.

२१ नोव्हेंबर १९५१ रोजी भारतीय जनसंघाची स्थापना झाली. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्यासारखा खंदा, धडाडीचा नेता या पक्षाच्या प्रेरणास्थानी होता. स्वातंत्र्यपूर्व कालापासूनच काँग्रेसचे राजकारण पसंत नसलेली काही मंडळी, गट, पक्ष देशात होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारखी संघटनाही होती. स्वातंत्र्योत्तर कालात हिंदुमहासभा हा पक्ष नाममात्रच उरला होता. संघातील काही कार्यकर्त्यांना संघाचा बंदिस्त कार्यक्रम पुरुषार्थाच्या दृष्टीने अपुरा वाटू लागला होता. जनतेत जावे, त्यांच्याशी संपर्क साधावा, त्यांचे प्रश्न घेऊन जनसंघटना बांधावी अशी आकांक्षा त्यांच्यात उत्पन्न झाली. हिंदुत्वावर त्यांची भिस्त होती. पाकिस्तान

अस्तित्वात आल्यावर देखील अखंड भारताची स्वप्ने या मंडळींनी श्रद्धेने उराशी जपलेली होती. समाजवादी अर्थरचनेला व समाजपद्धतीला तसेच निधर्मीपणालाही त्या काळी तरी त्यांचा विरोध होता. त्यामुळे स्थितिप्रिय, परंपरावादी, धर्मनिष्ठ लोकांचे मध्ये या पक्षाने लवकरच मूळ धरले. परंतु पक्षाच्या बाल्यावस्थेतच पक्षावर आकाशीची कुऱ्हाड कोसळली. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींचा २३ जून १९५३ रोजी काश्मीरच्या कारावासात असतानाच दुःखद अंत झाला. डॉ. मुखर्जी हे शिक्षणप्रेमी देशभक्त होते. कलकत्ता विद्यापीठाचे ते कुलगुरू होते. हिंदु सभेचे नेते होते. पण स्वातंत्र्यानंतर सभेचे धोरण त्यांना पटले नाही. त्यांनी हिंदुसभा सोडली. पं. नेहरूंच्या पहिल्या मंत्रिमंडळात ते पुरवठा व उद्योग खात्याचे मंत्री होते. पण तेथेही पाकिस्तान विषयक भूमिकेवरून त्यांचे पं. नेहरूंशी मतभेद झाले व १९५० साली त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. पाकिस्तानातून आलेल्या निर्वासितांची त्यांनी पुष्कळच सेवा केली. काश्मीरच्या प्रश्नावरून जम्मूमध्ये प्रजापरिषदेने चळवळ आरंभिलेली होती. ती दडपण्याचा मार्ग काश्मीर सरकार अवलंबीत आहे असे डॉ. मुखर्जींचे म्हणणे होते. शासनाने तिकडे दुर्लक्ष केले म्हणून डॉ. मुखर्जी स्वतःच जम्मूकडे निघाले. परंतु त्यावेळी जम्मू-काश्मीरमध्ये जाण्यास प्रवेश परवाना लागत असे. मुखर्जींनी ११ मे १९५३ रोजी विनापरवाना जम्मूत प्रवेश केला. तेथील सरकारने त्यांना अटक करून श्रीनगर येथे स्थानबद्ध करून ठेवले होते.

भारताची स्वतंत्र घटना अस्तित्वात आल्यानंतर भारतातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांचा प्रारंभ २५ ऑक्टोबर १९५१ रोजी झाला. २१ वर्षांवरील १७ कोटी ६६ लक्ष, भारतीय स्त्री-पुरुषांना यावेळी नव्या घटनेनुसार मतदानाचा हक्क प्राप्त झालेला होता. भारतासारखा विस्तीर्ण खंडतुल्य क्षेत्रफळाचा नि मोठ्या लोकसंख्येचा देश मतदानाने आपले सरकार निवडीत होता. हा लोकशाहीचा महान प्रयोग होता! सर्व जगाचे

लक्ष भारतातील या प्रयोगाकडे वेधलेले होते. निवडणुकीच्या आखाड्यात कॉंग्रेस, समाजवादी, कम्युनिस्ट, हिंदुसभा, जनसंघ आदी अखिल भारतीय स्वरूपाचे आणि प्रांतिक स्वरुपाचेही काही राजकीय पक्ष उतरलेले होते. शिवाय स्वतंत्रपणाने काही उमेदवारही उभे होतेच. बहुतेक सर्व राजकीय पक्षांनी आपआपले जाहीरनामे प्रसिद्ध करून मतदारांना आपले उद्दिष्ट व कार्यक्रम यांची माहिती दिलेली होती. प्रचारसभा, मिरवणुकी, भित्ती-पत्रके, कलापथके यांद्वारा देशभर निवडणूक प्रचाराची धमाल उडालेली होती. घटनेने प्रदान केलेल्या लेखन व भाषण स्वातंत्र्यानुसार सर्व पक्षांनी आपली भूमिका मांडताना शासनावर व सत्ताधारी पक्षावर व त्याच्या नेत्यांवरही मुक्तपणाने टीका केली. वाद-विवाद, प्रश्नोत्तरे, आरोप आणि त्यांचे खंडण यातूनही जनशिक्षण साधता येते, आणि हे सर्व होऊनही स्वतंत्र भारतातील पहिल्या लोकसभेची आणि प्रांतोप्रांतीच्या विधिमंडळांची पहिली सार्वत्रिक निवडणूक अत्यंत पद्धतशीरपणे व शांततेने पार पडली.

या निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाने ४४·९९ टक्के मते मिळवली, तर समाजवादी पक्षाने १०·२३ टक्के मते मिळवली. त्याखालोखाल इतर पक्षांनी मते मिळवली. कॉंग्रेसला लोकसभेत ४९४ जागांपैकी ३५४ जागा मिळाल्या.

पं जवाहरलाल नेहरू दुसऱ्यांदा भारताचे पंतप्रधान बनले.

१२ मे १९५२ रोजी नव्या भारतीय लोकसभेचे अधिवेशन सुरू झाले.

१३ मे १९५२ रोजी डॉ. राजेंद्रप्रसाद यांची भारताचे राष्ट्रपती म्हणून पुनश्च निवड झाली आणि डॉ. राधाकृष्णन यांची उपराष्ट्राध्यक्ष म्हणून निवड झाली.

प्रजासत्ताक भारतात ‘पंचवार्षिक योजनां’ना फार महत्त्व आले. सर्वत्र या योजनांची चर्चा चालू झाली. पद्धतशीर काम आखून ते पार पाडल्यामुळे देशाची भरभराट होते. आपले मनुष्य बळ व नैसर्गिक संपत्ती यांचा नीट

उपयोग केल्यास मागासलेला देशही पुढे येऊ शकतो. आपल्या मागासलेपणावर मात करून जेव्हा आपण जगातील इतर समृद्ध राष्ट्रांच्या खांद्याला खांदा भिडवून ताठ मानेने उभे राहू शकू तेव्हाच आपल्या स्वातंत्र्याला खराखुरा अर्थ प्राप्त होईल, अन्यथा धान्य, यंत्रसामग्री इत्यादी बाबतीत जर आपण परावलंबीच राहिलो तर देश लाचार होईल. लाचारी म्हणजे पारतंत्र्यच !

पं. जवाहरलालजींनी हे जाणूनच १९५० मध्ये 'नियोजन समिती' नेमली; ते स्वतःच तिचे अध्यक्ष बनले. या समितीने देशातील साधनसामुग्री, मनुष्यबळ यांचा उपयोग करण्याची योजना बनवली. हीच पहिली पंचवार्षिक योजना. या योजनेची मुदत होती एप्रिल १९५१ पासून मार्च १९५६ पर्यंत.

आपल्या देशातील प्रत्येकाचे जीवन जास्त सुरळीत करावे हा योजनेचा मुख्य हेतू असतो. सगळ्या सोयी प्रत्येकाला व्यवस्थितपणे हव्या तशा मिळाल्या पाहिजेत. त्यासाठी समाजाची दृष्टी बदलली पाहिजे व देशाने श्रमनिष्ठ बनले पाहिजे. स्वतःचा विकास स्वतः करून घेण्याची आच समाजातील प्रत्येकाच्या ठायी उत्पन्न झाली पाहिजे. योजनेला मदत म्हणजे स्वतःलाच मदत ! कारण योजनेतून निर्माण होणाऱ्या समृद्धीची फळे देशातील प्रत्येकालाच चाखायला मिळावयाची असतात.

भारताची पहिली पंचवार्षिक योजना २०६९ कोटी रुपयांची होती. शेतीविकास, पाटबंधारे, जंगल संपत्ती, खनिज द्रव्ये, लहान मोठे उद्योगधंदे, रेल्वे, रस्ते, जहाजे इत्यादी दळणवळणाची साधने, शिक्षण, श्रमदान, सर्वांना काम असा या योजनेचा पसारा होता.

पं. जवाहरलाल नेहरू म्हणाले होते, "आपली योजना फार मोठी आहे. तीत देशातील असंख्य चळवळी सामावल्या आहेत. पण जे ध्येय आपल्याला प्रगतीपथाकडे ओढून नेत आहे, ते त्याहूनही मोठे आहे.

त्याकडे जाण्यास धैर्य हवे, जबरदस्त आशावाद हवा. असे ध्येय स्वतःवर व स्वदेशावर निष्ठा ठेवून आपण गाठू या !"

पं. नेहरूंच्या दृष्टीपुढे एक समाजचित्र होते. त्या अनुरोधाने देशाची घडण व्हावी असा त्यांचा प्रयत्न होता. ते म्हणतात, "माझ्यापुढे एकच चित्र स्पष्टपणे उभे आहे आणि ते म्हणजे समाजवादी समाज-रचनेचे समाजवाद हा शब्द मी पारंपरिक अर्थाने वापरत नाही. ज्या समाजात उत्पादन-साधने समाजाच्या मालकीची आहेत व ती समाजहितासाठी वापरली जात आहेत तो समाजवाद मला अभिप्रेत आहे.

"आपण औद्योगिक दृष्ट्या अर्धविकसित लोक. आपल्याला सतत झगडा करूनच या अर्धविकसित अवस्थेतून बाहेर पडले पाहिजे. तरच आपल्याला काहीशी गती येईल. जर आपल्याला उद्योगधंद्यांची निर्मिती करायची असेल तर प्रथम परदेशातून यंत्रसामग्री आणणे बंद व्हावयास पाहिजे. देशातच ती निर्माण करण्याचे आपले उद्दिष्ट हवे."

योजनेकडे पाहण्याचा पं. नेहरूंचा दृष्टीकोन हा मूलभूत स्वरूपाचा, समाज-परिवर्तनाचा होता. ते म्हणतात, "योजना म्हणजे आपल्याला हव्या असलेल्या गोष्टींची यादी नव्हे. किंवा ज्या गोष्टी कार्यवाहीत आणावयास हव्यात त्यांना अग्रहक्क देणे असेही नव्हे. योजना ही अधिक व्यापक व सखोल आहे. योजना म्हटल्यावर आपल्याला कोठे जावयाचे याचे स्पष्ट चित्र नजरेपुढे हवे."

भारताची पुढची वाटचाल या अनुरोधानेच झाली आहे.

☆ ☆ ☆

# भाषिक संघर्ष

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताची भाषावार प्रांतरचना करण्यात येईल असे ठराव स्वातंत्र्यपूर्व कालापासून काँग्रेसच्या अधिवेशनातून पास झालेले होते. नवभारताची आर्थिक-सामाजिक-शैक्षणिक घडण घडविणे जसे आवश्यक मानले जात होते, तसेच भाषावार प्रांतरचना करणेही गरजेचे समजले जात होते. आणि ही गरज होतीही. कारण भारत हा मोठा विशाल देश आहे. येथे चौदा प्रमुख भाषा बोलणारांचे स्वतंत्र प्रांत आहेत. ब्रिटिशांच्या राजवटीत त्यांनी स्वतःच्या राज्यकारभाराच्या सोयीनुसार भारताची प्रांतरचना केलेली होती. पूर्वीच्या मुंबई इलाख्यात महाराष्ट्र, गुजराथ, कर्नाटक आणि सिंध प्रांतांचा समावेश होत असे. तसाच मद्रास इलाखा, बंगाल इलाखा इत्यादी. इंग्रज राज्यकर्ते असल्यामुळे राजकारभाराची भाषा अर्थातच इंग्रजी होती. इंग्रजी शिकवून आपल्याला हव्या असलेल्या नोकरांचा वर्गही त्यांनी तयार करण्याची सोय इंग्रजी शाळा उघडून केलेली होती. आणि मुख्यतः

परक्यांचेच राज्य असल्यामुळे सामान्य माणसाचा राज्यव्यवहाराशी काहीच संबंध येत नसे. सरकारने लादलेले कर निमूटपणाने भरले की संपले.

परंतु स्वातंत्र्यात, आणि विशेषतः लोकशाहीप्रधान देशात प्रत्येक नागरिकाचा शासनाशी संबंध येतो. त्याच्या मतानेच मुळी सरकार अस्तित्वात येते. सरकार निवडण्याचा अधिकार ज्याच्या हातात आहे त्याला सरकारी कामकाजाची भाषा समजणे आवश्यक आहे. घटनेने दिलेल्या अधिकारानुसार निवडून जाऊन सरकारात सहभागी होण्याचाही हक्क त्याला आहे. तेव्हा अशा परिस्थितीत शासनव्यवस्था, कायदे, न्याय, अंमलबजावणी या सर्वच ठिकाणी त्या त्या प्रांतातल्या माणसाला आपल्या मातृभाषेतून व्यवहार, करता आला पाहिजे. आपले मत, विचार भाषणाद्वारे वा लेखणीद्वारे त्याला व्यक्त करता आले पाहिजेत. याशिवाय कला, साहित्य, संगीत इत्यादींद्वारा त्याला आपल्या अस्मितेचे प्रकटीकरण आणि पोषण सहजसुलभतेने करता आले पाहिजे. यासाठीही मातृभाषेला स्थान असणे आवश्यक होते. आणि यासाठी त्या त्या भाषिकांची भाषिक राज्ये निर्मिण्याची आवश्यकता होती. तत्त्वतः पं. जवाहरलाल नेहरूंनाही ही गरज मान्य होती. कॉंग्रेसचा अखिल भारतीय कारभार अशा प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यांच्या मार्फतच चाललेला होता. परंतु भाषावार प्रांतरचनेत त्यांना एक धोकाही दिसे, तो म्हणजे देशाभिमानावर प्रांताभिमानाने मात करण्याची शक्यता ! स्वतंत्र भारताची सारी प्रगती, विकास हे भारत एकात्म राहाण्यावरच अवलंबून आहे. तेव्हा या एकात्मतेला धक्का लागून जर स्थानिक निष्ठा वाढीला लागल्या तर परिस्थिती कठीण होईल असे भय होते. म्हणून पं. नेहरूंनी भाषावार प्रांतरचना तावडतोबीने होण्याला विरोध दर्शविला होता. इतकेच नव्हे तर १९५२ साली लोकसभेत भाषावार प्रांतरचनेचा ठराव आला असता बहुमताच्या जोरावर तो नेहरूंच्या इच्छेसाठी नापासही केला होता. परंतु जनमानसात

भाषावार प्रांतरचनेविषयी उत्सुकता होती. शिवाय स्वातंत्र्यपूर्वकालीन केलेल्या संकल्पाच्या पूर्तीचाही हा प्रश्न होता. अन्य आर्थिक, सामाजिक प्रश्नांवरही सामान्य माणसाच्या मनात स्वातंत्र्यानंतर असंतोषाची भावना मूळ धरू लागली होती. स्वातंत्र्यपूर्व कालात केलेल्या या बाबतीतल्या संकल्पांचीही पूर्ती होताना दिसत नव्हती. सर्व प्रकारची विषमता कायम होती. सत्ताकांक्षा वाढलेली होती. भ्रष्टाचार सुरूच होता.

अशा परिस्थितीत भाषिक प्रांतरचनेवरून असंतोषाला वाचा फुटली. ' स्वतंत्र विशाल आंध्र ' साठी तेथे चळवळ सुरू झाली. पोट्टी श्रीरामुलु यांनी तर प्राणांतिक उपोषण आरंभले. परंतु सुरुवातीला पं. नेहरूंनी त्याला दाद दिली नाही. सरकारवर दडपण येत होते, पण नेहरू ठाम होते. शेवटी पोट्टी श्रीरामुलुचा या उपोषणात १५ डिसेंबर १९५२ रोजी अंत झाला आणि सर्व आंध्रभर सरकारविरोधी संतापाची लाट उसळली. जाळपोळ, मोडतोड, दंगेधोपे, या हिंसक प्रकारांना ऊत आला. इतर प्रांतांतूनही या प्रकरणी सरकारवर ठपका ठेवण्यात आला. लोकांची उग्र निदर्शने झाल्यावर लोक-मतासाठी पं. नेहरूंनी आपले मत मागे घेऊन २० डिसेंबर रोजी स्वतंत्र विशाल आंध्रची घोषणा केली. त्यानुसार २ ऑक्टोबर १९५३ रोजी स्वतंत्र आंध्र राज्याची स्थापना झाली आणि १ नोव्हेंबर १९५६ रोजी इतर भाषिक राज्यांबरोबरच लोकसभेने विशाल आंध्र राज्याला मान्यता दिली.

आंध्रचे स्वतंत्र राज्य घोषित झाल्याबरोबर इतर प्रांतांतही भाषिक राज्याची मागणी जोराने होऊ लागली. त्यासाठी आंदोलने, निदर्शने यांची भाषा बोलली जाऊ लागली. वाढते दडपण लक्षात घेऊन अखेरीस सरकारने २६ डिसेंबर १९५३ रोजी जुन्या प्रांतरचनेचा पुनर्विचार करण्यासाठी आणि नवी पुनर्रचना सुचविण्यासाठी ' प्रांत पुनर्रचना कमिशन 'ची स्थापना केली. या कमिशनमध्ये पं हृदयनाथ कुंझरू, सरदार पण्णीकर व फाझलअल्ली हे तीन सदस्य होते. फाझलअल्ली कमिशनने

सुमारे पावणे दोन वर्षांत तयार केलेला २६७ पानी अहवाल ३० नोव्हेंबर १९५५ रोजी सरकारने लोकांपुढे ठेवला. फाजलअल्ली कमिशनने देशभर दौरा काढून १०४ गावांना भेटी दिल्या. परिस्थितीची पाहणी केली. सुमारे दीड लाख संबंधित कागदपत्रांची तपासणी केली. ९,००० लोकांच्या साक्षी घेतल्या, २००० निवेदने जमा केली.

फाझलअल्ली कमिशनने आपले निष्कर्ष काढून पुढील शिफारसी केलेल्या होत्या :

( १ ) घटक राज्यांची संख्या २७ च्या ऐवजी १६ असावी.

( २ ) महाराष्ट्र-गुजरात यांचे मिळून मुंबई द्विभाषिक राज्य असावे.

( ३ ) तेलुगु भाषिकांची हैद्राबाद व आंध्र अशी दोन राज्ये असावीत.

( ४ ) विदर्भाचे वेगळे राज्य असावे.

( ५ ) बाकी सर्व प्रांतांची पुनर्रचना भाषिक तत्त्वावरच केली जावी.

( ६ ) राज्यांच्या सरहद्दी ठरवताना जिल्हा हा घटक धरण्यात यावा.

( ७ ) संस्थानांच्या विलीनीकरणानंतर आलेली राजप्रमुख ही पद्धत नाहीशी केली जावी.

( ८ ) दिल्ली, अंदमान, निकोबार व मणीपूर हे भाग सरकारच्या शासनाखाली असावेत.

पुढील फेरफारानंतर हा अहवाल सरकारने लोकसभेत मांडला. नवीन फेरबदल असे होते.

( १ ) भारताची विभागणी पाच विभागांत व पंधरा घटक राज्यांत करण्यात आली.

( २ ) आंध्र हे एकच तेलुगु भाषिक राज्य बनवण्यात आले.

( ३ ) विदर्भासह पण मुंबईव्यतिरिक्त सर्व मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य बनवण्यात आले.

( ४ ) गुजराती भाषिकांचे गुजरात राज्य निर्माण झाले.

( ५ ) मुंबई शहर केंद्रशासित ठेवण्यात आले.

( ६ ) हिमाचल प्रदेश व त्रिपुरा हे प्रदेशही केंद्रशासित ठेवण्यात आले.

यावर लोकसभेत बरीच चर्चा झाली व हे बील चिकित्सा समितीकडे धाडण्यात आले. त्यानंतर १३ घटक राज्ये व विशाल मुंबई द्वैभाषिक राज्य १ नोव्हेंबर १९५६ रोजी अस्तित्वात आले.

मराठी भाषिकांची मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी फेटाळून लावली होती. महाराष्ट्रावर अन्याय झाला होता. यामुळे मराठी-भाषिकांत संतापाची प्रचंड लाट सर्वत्र उसळली. पर्यायी योजना, वाटाघाटी, चर्चा यांचे सत्र सुरू झाले. आपली मागणी मान्य करून घेण्यासाठी कॉंग्रेसव्यतिरिक्त सर्व पक्षांनी एकत्र येऊन 'संयुक्त महाराष्ट्र समिती'ची स्थापना केली. श्री एस्. एम्. जोशी हे समाजवादी नेते या समितीचे सरचिटणीस होते. कॉमरेड डांगे, आचार्य अत्रे, सेनापति बापट, जयंतराव टिळक आदि महाराष्ट्रीय नेते आणि बहुसंख्य मराठी जनता या समितीच्या पाठीशी उभी राहिली. काही कॉंग्रेसजनांनीही राजिनामे दिले आणि ते समितीच्या आंदोलनात सहभागी झाले. केंद्र सरकारमध्ये त्यावेळी अर्थमंत्रीपदावर श्री. चिंतामणराव देशमुख हे प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ होते. पण त्यांनीही महाराष्ट्रावर झालेल्या अन्यायाचा निषेध करून अर्थमंत्रीपदाचा त्याग केला. महाराष्ट्रात सभा, मिरवणुकी, धरणे, सत्याग्रह, हरताळ, गोळीबार, लाठीहल्ला या गोष्टींना भरतीच आली. पं. नेहरूंच्या मुंबई-पुणे येथील जाहीर सभांवर समितीच्या आदेशाने जनता कर्फ्यू पुकारण्यात आला. पं. नेहरू प्रतापगडावर छत्रपती शिवाजी पुतळ्याच्या अनावरणासाठी आले असताना मैलन् मैल काळ्या निशाणांनी आणि मागणी-घोषणांनी त्यांच्यापुढे उग्र निदर्शने करण्यात आली.

१९५७ सालच्या दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत प. महाराष्ट्रात सर्वत्र कॉंग्रेस विरुद्ध संयुक्त महाराष्ट्र समितीचा उमेदवार उभा करण्यात आला होता. मराठी जनतेने संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूने प्रचंड प्रमाणावर मतदान

करून सरकारी निर्णयाविरुद्ध आपला कौल दिला. १३३ पैकी फक्त ३२ जागा काँग्रेसला मिळाल्या. जनमताचा स्पष्ट कौल असतानाही सरकारने मुंबईच्या प्रश्नावरून संयुक्त महाराष्ट्र देण्याची अक्षम्य टाळाटाळ केली. मुंबईत धनिकांचे हितसंबंध गुंतलेले होते. आणि या भांडवलवाल्यांचा दबाव सरकारवर येत होता. मुंबईतील अल्पसंख्याकांचे हितसंबंधांचाही बाऊ सरकार निष्कारण करीत होते. परंतु मराठी जनताही आपल्या न्यायासाठी जिद्दीलाच पेटलेली होती. एस्. एम्. जोशी तर 'संयुक्त महाराष्ट्राचा लढा हा समाजवादाचा लढा आहे' असे सांगत असत.

भारतरत्न महर्षी अण्णासाहेब कर्वे यांची जन्मशताब्दी १९५८ साली पं. नेहरूंच्या अध्यक्षतेखाली मुंबईत साजरी झाली. त्यावेळी अण्णांनी त्या वयातही नेहरूंच्या पुढे 'संयुक्त महाराष्ट्र साकार व्हावा' ही आपली मनीषा बोलून दाखवली.

महाराष्ट्रात काँग्रेसला भवितव्यच उरणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाली होती. काँग्रेस नेते जनतेपुढे जाऊ शकत नव्हते. दबावाने फार काळ राज्य रेटणे अशक्य झाले होते. अखेरीस इंदिरा गांधींच्या मध्यस्थीने हा प्रश्न सुटला आणि १ मे १९६० रोजी विदर्भ, मराठवाडा, व मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आला!

जिल्हा घटक असल्यामुळे सरहद्दीवरील बऱ्याच गावांना त्रास झाला. पाटसकर समितीने खेडे हा घटक धरावा अशी शिफारस केली होती. परंतु सरकारने ती अद्यापही मान्य केलेली नसल्यामुळे बेळगाव, निपाणी व इतर सरहद्दीवरील गावांचा प्रश्न तसाच भिजत पडलेला आहे.

भारत सरकारने १ डिसेंबर १९६३ रोजी १७ वे राज्य म्हणून नागालँडची निर्मिती केली.

पंजाबी सुभ्यासाठी शिखांनी जोराची चळवळ केल्यावर पंजाबचे विभाजन करून १ नोव्हेंबर १९६६ रोजी स्वतंत्र हरियाना राज्याची स्थापना झाली.

२५ जानेवारी १९७१ रोजी हिमाचल प्रदेश हे संपूर्ण स्वायत्त राज्य म्हणून घोषित करण्यात आले. २०–२१ जानेवारी १९७२ रोजी पंतप्रधान इंदिरा गांधींच्या हस्ते मेघालय, मणिपूर, त्रिपुरा ह्या तीन राज्यांचे व मिझोराम व अरुणाचल ह्या केंद्रशासित प्रदेशांचे उद्‌घाटन झाले.

भाषावार प्रांतरचनेचे फल संमिश्र स्वरूपाचे आहे. त्या त्या प्रांतातील सामान्य माणसाला राज्यकारभार कळू लागला व त्यात भाग घेण्याच्या दृष्टीने त्याची सोय झाली हे खरे, तथापि प्रांतीय व स्थानीय महात्म्याची भावनाही वाढली व त्यामुळे शेजारी भाषिकांबद्दल मत्सर, बुद्धी, तुच्छता ही आली. भाषेवरून अनेक ठिकाणी दंगेही झाले. विकास प्रकल्पावरून प्रांताप्रांतात झगडे उत्पन्न झाले. नद्यांच्या पाण्यावरून तंटे निर्माण झाले. कारखान्यांवरून भांडणे उद्‌भवली. त्यासाठी उग्र आंदोलने, मोडतोड जाळपोळ झाली. त्यांत कधी कधी अतिरेक होऊन राष्ट्रीय विभूतींचा अवमानही करण्यात आला.

हिंदी राष्ट्रभाषेवरून दक्षिणेत असेच उग्र आंदोलन पेटले. देशाचे उत्तर नि दक्षिण असे जणू परस्परविरोधी भागच भाषेवरून मानले गेले. हिंदी ही उत्तरेकडची बहुसंख्य लोकांची भाषा. उत्तरेकडच्या हिंदी भाषिकांचे साम्राज्यपद आम्ही लादून घेणार नाही अशी भूमिका दाक्षिणात्यांनी घेतली. तेव्हा हिंदीची सक्ती त्यांच्यावर करण्यात येणार नाही असे सरकारने त्यांना आश्वासन दिले.

२६ जानेवारी १९६५ रोजी भारतीय संघराज्याची अधिकृत भाषा म्हणून हिंदी मान्य करण्यात आली. परंतु इंग्रजीचाही हिंदीचे बरोबरीने वापर करण्याची तरतूद करण्यात आली.

संयुक्त समाजवादी पक्षाने ' इंग्रजी हटाव ' मोहीम उघडली. गोव्याने सार्वमतात १८ जानेवारी १९६७ रोजी महाराष्ट्रात सामील न होता केंद्रशासित राहण्याचा कौल दिला.

☆ ☆ ☆

# भारताचे परराष्ट्रीय धोरण

भारत स्वतंत्र झाल्यापासूनच पं. जवाहरलाल नेहरूंनी पंतप्रधानकीच्या जोडीने परराष्ट्र संबंध खाते स्वतःकडे ठेवलेले होते. अर्वाचीन युगात परराष्ट्र संबंधाला विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर तर राष्ट्रा-राष्ट्रांचे प्रबळ सत्तागट निर्माण झाले असून त्यांच्यात एक-मेकांवर ताण करण्याच्या दृष्टीने शीतयुद्धच सुरू झाले. नवनवीन संहारक अण्वस्त्रांचा, क्षेपणास्त्रांचा शोध व वाढ करण्यातच या बड्या राष्ट्रांची शक्ती, बुद्धी व पुष्कळशी संपत्ती खर्ची पडू लागली. स्वसामर्थ्याचे प्रदर्शन होऊ लागले. कुटिलनीतीचा अवलंब होऊ लागला. दुर्बल, गरजू राष्ट्रांना आपल्या संपत्तीच्या, शक्तीच्या व लष्कराच्या बळावर अंकित करण्याचे नवनवीन करार जन्मास येऊ लागले. या कराराची भाषा सहकार्य, मानवता, मैत्री, मागासलेल्या राष्ट्रांना विकासोन्मुख बनवणे–अशी सोज्वळ असे, परंतु अंतरीचा हेतु या ना त्या मार्गाने अंकित करून त्या देशाला आपल्या गटात ओढणे, त्या देशाचा भूभाग,

उद्या युद्ध झालेच तर सोयीचे पडावे म्हणून लष्करी तळासाठी वापरता यावा, असा असे. या शीतयुद्धाच्या अवस्थेमुळे जागतिक शांतता सदैव धोक्यात आलेली आहे. अस्थिर, अशांत मनःस्थितीत जग वावरत आहे. कुठे, काही तरी खुसपट केव्हा निघेल आणि त्यावरून युद्धाचा भडका केव्हा उडेल याचा नेम नाही. असे प्रसंग दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक वेळा आलेले आहेत. राष्ट्राराष्ट्रांच्या झगड्यात मध्यस्ती करावी, त्यांचे प्रश्न सलोख्याने, शांततेने सोडवावेत, जगात मैत्री, सहकार्य, शांतता टिकवावी या उदात्त हेतूने यूनोची स्थापना झाली आहे, पण रशिया, अमेरिका यांसारख्या काही बड्या राष्ट्रांनी बळाच्या जोरावर यूनोतही आपलाच वरचष्मा गाजवायची संधी सोडलेली नाही. त्यामुळे सत्याला सत्य व न्यायाला न्याय म्हणण्यासारखी व त्याची बूज राखण्यासारखी खात्रीलायक परिस्थिती उरलेली नाही. सत्तास्पर्धेने शांती दुरावलेली आहे.

परंतु शांततेशिवाय राष्ट्राचा सर्वांगीण विकास अशक्य असतो. भारतासारख्या नवस्वतंत्र देशाला तर प्रगतीची वाटचाल करताना शांती, स्थैर्य व सहकार्य यांची खूपच आवश्यकता होती. स्वतंत्र भारताची भव्य उभारणी करावयाची होती. द्रुतगतीने आर्थिक प्रगती साधावयाची होती. पण बाहेरच्या जगात तर अशी परिस्थिती होती. अशा वेळी पं. जवाहरलाल नेहरूंनी मोठ्या कौशल्याने व मुत्सद्दीपणाने मार्ग काढला आणि भारत कोणत्याही सत्तागटात सामील होणार नाही, त्याचे परराष्ट्र धोरण अलिप्तपणाचे राहील असे प्रकट केले. परंतु भारताची ही अलिप्तता निष्क्रीय नाही. सर्वांशी शांततामय स्नेह राखणे, समानतेच्या व मानवतावादी भूमिकेवरून सहकार्य करणे, प्रत्येकाच्या सार्वभौम स्वातंत्र्याबद्दल आदर ठेवणे, यातच आपल्या आणि इतर राष्ट्रांचे हित आहे हे त्यांनी जाणले. पं. जवाहरलाल नेहरूंनी भारताच्या परराष्ट्रीय धोरणाची प्रामुख्याने जी तीन उद्दिष्टे मानलेली होती, ती अशी : ( १ ) शांतता ( २ ) स्वातंत्र्य आणि ( ३ ) समृद्धी.

स्वदेशात शांतता नांदणे हे जितके आवश्यक तितकेच परदेशात, जगात नांदणेही आपल्या विकासाच्या दृष्टीने आता गरजेचे झाले आहे, कारण विज्ञानाच्या नव्या शोधांनी, जग जवळ आलेले आहे. त्यामुळे दोन राष्ट्रांतील संघर्ष आता जगाचा संघर्ष होऊ शकतो आणि आपली शांतता ढळून आपल्या विकास-कार्याला खीळ बसू शकते. म्हणून नेहरूंनी जागतिक शांततेचा पुरस्कार सातत्याने यूनोत आणि बाहेरही केला. आणि नुसता शाब्दिक पुरस्कार करून ते थांबले नाहीत तर कोरियामध्ये संघर्ष पेटला त्यावेळी यूनोच्या मार्फत भारतीय सुरक्षा दलाची पहिली तुकडी त्यांनी १ सप्टेंबर १९५३ रोजी कोरियात उतरवली. यूनोच्या शांतता-प्रयत्नात भारताने सतत सहकार्य दिले आहे. इंडोचायनाच्या युद्धबंदी मंडळावर १९ जुलै १९५४ रोजी त्यामुळेच कॅनडा व पोलंडबरोबरच भारताचीही निवड झाली होती. १८ एप्रिल १९५५ रोजी सुरू झालेल्या आफ्रोएशियन राष्ट्रांच्या परिषदेत भारताने महत्त्वपूर्ण भाग घेतला. लहान राष्ट्रांच्या-स्वातंत्र्य लढ्याला भारताने सतत सहानुभूती दाखवली. तिबेट-सारख्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याचे अपहरण झाले त्यावेळी भारताने नापसंती व्यक्त केली. दलाई लामा व अन्य तिबेटी निर्वासितांना आश्रय दिला. कॉंगो, सायप्रस, व्हिएटनाम, गाझा येथल्या संघर्षाचे वेळीही भारताने विधायक कामगिरी बजावली आहे. २० डिसेंबर १९४९ रोजी भारताने कम्युनिस्ट चीनला मान्यता दिली. आणि नवचीनला यूनोत प्रवेश द्यावा असा पुढे सतत आग्रह भारताने धरला. पाकिस्तानसारख्या राष्ट्राला अमेरिकेने जेव्हा जेव्हा लष्करी मदत दिली तेव्हा तेव्हा सत्तेचा समतोल बिघडून, अशांतता माजेल म्हणून भारताने चिंता व्यक्त केली व १ मार्च १९५४ रोजी अमेरिकेचे त्यावेळचे राष्ट्राध्यक्ष आयसेनहॉवर यांनी भारताला देऊ केलेली लष्करी मदत नेहरूंनी साफ नाकारली. निरनिराळ्या देशांशी व्यापार व सांस्कृतिक दळणवळण याबाबत मैत्रीचे करार केले.

२८ जून १९५४ रोजी ‘ पंचशील ’ तत्त्वांचा पं नेहरू आणि चीनचे पंतप्रधान चौ-एन्-लाय यांनी नवी दिल्ली येथे प्रथम पुरस्कार केला व या तत्त्वांवरच भारत-चीन संबंधांची उभारणी होईल असे जाहीर केले.

‘ पंचशील ’ म्हणजे पं. नेहरूंच्या परराष्ट्रीय धोरणाचा सारभूत गाभाच होय. ‘ पंचशील ’ म्हणते--

( १ ) प्रत्येक राष्ट्राने एकमेकांच्या स्वातंत्र्याचा व ऐक्याचा मान राखावा.

( २ ) एकमेकांवर आक्रमण करू नये.

( ३ ) एकमेकांच्या अंतर्गत घडामोडीत ढवळाढवळ करू नये.

( ४ ) परस्परांची समानता व हित सांभाळावे.

( ५ ) शांततेचे सहजीवन उपभोगावे.

पं. जवाहरलाल नेहरूंच्या या उदात्त, मानवतावादी पंचशील धोरणाने इतर शांततावादी राष्ट्रांनाही कुतूहल व आदर वाटू लागला. शांततेसाठी तहानलेल्या लोकांना युद्ध म्हणजे शांतीचा मार्ग नव्हे हे नेहरूंच्या या नवीन विधायक भूमिकेने पटले. ती जनता आपोआपच भारताकडे आकर्षित झाली आणि भारताला जगातील शांतिप्रिय राष्ट्रात मानाचे व आदराचे स्थान प्राप्त झाले.

भारताचे वैशिष्ट्य असे की, कोणत्याही विपरित परिस्थितीमध्येदेखील भारताने आपली विधायक भूमिका सोडली नाही. हातात हात घालून पंच शीलचा उद्घोष करून ‘ हिंदी-चिनी भाई भाई ’ अशा घोषणा दिल्यानंतरही चीनने पुढे भारतावर आक्रमण करून आपली भूमिका बदलली. पण युनोमध्ये चीनला प्रवेश द्यावा ही आपली भूमिका व आग्रह भारताने कधीही सोडला नाही. पाकिस्तानने वेळोवेळी कुरापती काढल्या, सतत त्रास दिला, पण भारताने कधीही आक्रमण केले नाही. आक्रमणाचा प्रतिकार जरूर केला, पण कोणाचा मुलुख बळकावण्याचा व कोणचे स्वातंत्र्य हरण करण्याचा

कधी प्रयत्न केला नाही

स्वातंत्र्योत्तर या २५ वर्षांच्या काळात १७ वर्षे पं नेहरू हेच भारताचे पंतप्रधान व परराष्ट्र मंत्री होते. त्यामुळे त्यांनी आपले धोरण चांगले रुजवलेले आहे. नेहरूंच्या पश्चात झालेल्या दिनेशसिंग, स्वर्णसिंग ह्या परराष्ट्र मंत्र्याचा आणि श्री लालबहादुर शास्त्री व श्रीमती इंदिरा गांधी ह्या पंतप्रधानांना देखील नेहरूंनी घालून दिलेल्या परराष्ट्रीय धोरणात बदल करावासा वाटला नाही. नेहरूंचेच धोरण त्यांनी पुढे चालवले आणि त्यानुसारच शास्त्रीजींनी ताश्कंद करार केला. इंदिराजींनी बांगला देशाला त्याच्या स्वातंत्र्य लढ्यात सहानुभुती दाखवली, लक्षावधी बंगाली निर्वासितांना झळ सोसून आश्रय दिला. युद्धसमाप्तीनंतर सिमला करारान्वये पाकिस्तानचा जिंकलेला मुलुख परत केला. परक्यांची एक इंच भूमी जबरदस्तीने आम्हाला बळकावयाची नसून तेथील जनतेला तिच्या इच्छेविरुद्ध पारतंत्र्यात ठेवण्याची आमचीही इच्छा नाही. हे भारताने प्रत्यक्ष कृतीने दाखवून दिले आहे.

भारताच्या तटस्थतेच्या धोरणावर काही जणांकडून वेळोवेळी टीकाही झालेली आहे. परंतु भारताची तटस्थता ही जशी निष्क्रिय नाही तसेच त्याचे एकंदर धोरणहि नकारात्मक नाही. आपल्याला आपल्या आर्थिक विकासाच्या कार्यक्रमात साहाय्य देणाऱ्या अमेरिका, रशिया या सारख्या बड्या, प्रबल शक्तीशाली राष्ट्रांनी ज्या ज्या वेळी जागतिक शांततेला धोका येईल किंवा एखाद्या राष्ट्राचे मूलभूत स्वातंत्र्याचे हक्क हिरावले जातील अशी भूमिका घेतली त्या त्या वेळी भारताने त्यांचा कसलाही मुलाहिजा न ठेवता स्पष्ट शब्दात नापसंती व्यक्त करून निषेधही केलेला आहे.

कोणत्याही सत्तागटात न गेल्यामुळे आपले विचारस्वातंत्र्य जागतिक क्षेत्रातही भारत टिकवून आहे. प्रत्येक प्रश्नाचा स्वतंत्रपणे तो विचार करू शकतो आणि विश्वशांतीला पोषक असे वातावरण निर्माण करून स्वातंत्र्य



६

शांतता व या समृद्धी उद्दिष्टांच्या परिपूर्तीसाठी प्रयत्नशील राहू शकतो. लष्करी गट करण्याला भारताचा विरोध अशासाठीच आहे की त्यामुळे शीत युद्धाची व्याप्ती वाढत जाते. परिस्थिती तंग राहाते. आपले स्वातंत्र्यही मर्यादीत होते. म्हणून लष्करी गटात सामील होण्यापासून आशिया व आफ्रिका खंडातील लहान राष्ट्रांना परावृत्त करीत असतानाही तिसरा एखादा गट स्थापन करण्याची कल्पना भारताला मंजूर नाही. कारण लष्करी प्रवृत्तीचा गट बनला की स्वातंत्र्य कलंकित बनतेच. म्हणून ज्या योगे आपल्या विचारांवर, धोरणांवर, मूलभूत उद्दिष्टांवर कसलेहि बंधन येणार नाही व त्यांचा संकोच होणार नाही अशी मुक्त राष्ट्रकुलासारखी किंवा आफ्रो-आशियाई राष्ट्रांसारखी स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी संघटना भारत पसंत करतो. आपल्या आर्थिक विकासासाठी जशी बिनशर्त आर्थिक मदत अन्य राष्ट्रांकडून घेतो तशी आणिबाणीच्या काळी बिनशर्त लष्करी मदतही त्याला निषिद्ध वाटत नाही. तसे पाहिले तर यूनोची जी उद्दिष्टे आहेत, तीच भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचीही आहेत. स्वतंत्र भारताला पं. जवाहरलाल नेहरूंनी राष्ट्रहिताचे खंबीर, उदात्त परराष्ट्रीय धोरण दिल्याने ते खरे खुरे नेहरू धोरण झाले आहे व त्याने भारताची मान जगात उंचावलेली आहे.

☆ ☆ ☆

# पंचवार्षिक योजना

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नवभारताच्या सर्वांगीण उभारणीसाठी प्रयत्न सुरू झाले. पं. जवाहरलाल नेहरूंनी भारताला जसे परराष्ट्रीय धोरण दिले, तशीच लोकशाही राज्यपद्धती, वैज्ञानिक दृष्टीकोन, धर्मनिरपेक्ष समाजवादी समाजव्यवस्था आणि नियोजन ह्या महत्त्वपूर्ण गोष्टी दिल्या. नेहरूंची थोरवी एवढ्यावरूनही पटावी.

स्वातंत्र्यानंतर भारताने मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारलेली आहे. भांडवलशाही किंवा समाजवादी या पैकी एकच अर्थव्यवस्था पूर्णपणाने नवजात राष्ट्राला स्वीकारणे शक्य होणार नाही हे नेहरूंनी जाणले होते. परराष्ट्रीय धोरणातलेच सूत्र इथेही दिसते. जागतिक दोन प्रबळ सत्तागटात, एक भांडवलशाहीचा पुरस्कार करणारा अमेरिकन गट आहे, तर दुसरा साम्यवादी अर्थरचनेचा पुरस्कर्ता रशियन गट आहे. नेहरूंनी दोन्हीही गटात सामील व्हायचे टाळले. तसेच अर्थव्यवस्थेतही एकच पद्धत स्वीकारण्याऐवजी दोन्हीचा समन्वय करण्याची दृष्टी स्वीकारली.

भारत स्वतंत्र झाला त्यावेळी महायुद्धामुळे अर्थव्यवस्था कोलमडलेल्या अवस्थेतच होती. लक्षावधी लोक बेकार होते. त्यावेळी दरडोई वार्षिक उत्पन्न फक्त २३० रुपये होते. शिशुसंगोपन, आरोग्य-रक्षण आदी सोयींचा अभाव असल्यामुळे नवीन जन्मलेल्या दर १०,००० बालकांपैकी पहिल्या वर्षांतच १४६० बालकांचा मृत्यू होत असे. भारतीय नागरिकाचे सरासरी आयुर्मान देखील २७ वर्षे एवढेच होते. देवीसारख्या साथींनी दरवर्षी सुमारे ५० लक्ष लोक मृत्युमुखी पडत असत. ५ लक्ष ६० हजार गावांसाठी केवळ ५० हजार डॉक्टर्स उपलब्ध होते. सर्वत्र घोर निरक्षरता होती. शेकडा १६ टक्के लोकच थोडेबहुत लिहिणे-वाचणे जाणत होते. शाळांमधून जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही अवघी १५ टक्के होती. धर्मांधता, रूढी, समजुती, जातपात, भाषाभिन्नता अशा कितीतरी आणखी गोष्टी भरीला होत्याच!

अशा विकट अवस्थेतून विकासाची वाटचाल करावयाची होती. त्यासाठी योजनाबद्ध प्रयत्नांची आवश्यकता होती. नेहरूंच्या प्रयत्नाने १९५० साली नियोजन समितीची स्थापना झाली.

२ ऑक्टोबर १९५२ पासून भारतातील ५ लक्ष गावांमधून नवी जागृती आणण्यासाठी 'समाज विकास कार्यक्रमा' ची सुरुवात झाली. या कार्यक्रमात सरकारी प्रयत्नांपेक्षा स्थानिक जनतेच्या सहकार्यावर भर देण्यात आला. कृषि-उत्पादन, सडका, शाळा, दवाखाने, पशू केंद्रे, छोटे उद्योगधंदे, मनोरंजन, इत्यादी कार्यक्रमांचा यात अंतर्भाव होता. नेहरूंना या कार्यक्रमाबद्दल विलक्षण आस्था होती. त्यातील ताकदही ते ओळखून होते. ते म्हणत,

"सामूहिक विकास ही अद्भुत, क्रांतिकारक कल्पना आहे. ग्रामीण भागाची आजपर्यंत बरीच उपेक्षा झाली. त्यांना एका विवक्षित पातळीपर्यंत वर आणल्याखेरीज आपल्या एकूण विकासात उणेपणा राहाणारच....इतक्या प्रचंड संख्येने असलेल्या लोकांचे प्रश्न सोडविणे

हे त्रिकट काम आहे. त्यांच्यात बदल करावयास हवा असेल तर तो केवळ पार्लमेंटच्या कायद्याने करून भागणार नाही, तर मानवी इच्छाशक्तीमध्ये बदल व्हावयास हवा. ते ज्या गतिशून्य मानसिक अवस्थेत आहेत तेथून त्यांना बाहेर काढले पाहिजे. दीर्घ काळ असणाऱ्या सामाजिक रूढींच्या जबड्यातून त्यांची मुक्तता केली पाहिजे. मी यावर भर देऊ इच्छितो. नियोजन मंडळाचा दृष्टीकोन असा गतिमान ( Dynamic ) नसेल तर त्याची काही उपयुक्तता आहे, असे मला वाटत नाही. प्रत्येक क्षेत्रात बदल घडवून आणण्याची दृष्टी पाहिजे. मग ते राजकारण असो, समाजकारण असो की अर्थकारण असो. "

पहिल्या पंचवार्षिक योजनेत समाज विकास कार्यासाठी 'राष्ट्रीय विस्तार-सेवा मंडळा'ची नियुक्ती झाली, सामूहीक विकास कार्यक्रम गावांच्या पुनर्निर्माणाचे साधन म्हणून अंगिकारण्यात आला. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत 'पंचायती राज्य' या कल्पनेचा प्रारंभ झाला. ग्राम, तालुका, आणि जिल्हा पंचायती स्थापना झाल्या, त्यांना काही अधिकारही मिळाले. तिसऱ्या योजनेत प्रामुख्याने पंचायती–राज्यांचा विकास करणे आणि त्या सुदृढ करणे यावरच भर देण्यात आला.

भारताच्या विकास कार्याने आता गती घेतलेली आहे. यात सरकार आणि खाज़गी उद्योगपती दोघांचाही हातभार लागत आहे. बहुतेक पायाभूत, भारी उद्योगधंदे ( Heavy Industries ) सरकारी क्षेत्रात ( Public Sector ) येतात, तर अन्य लहान मोठे उद्योगधंदे बिगरसरकारी क्षेत्रात (Private Sector ) येतात. याशिवाय देशातील लक्षावधी किसान, कारागीर छोटे-मोठे व्यापारी विकासाच्या कार्यातील आपला वाटा उचलीत आहेत.

भारताची पहिली पंचवार्षिक योजना १ एप्रिल १९५१ ते ३१ मार्च १९५६ या मुदतीत पार पडली. योजना मूळ २०६९ कोटी रुपयांची

होती. पुढे तिच्यात वाढ करून २३५६ कोटींची तरतूद करण्यात आली.

दुसरी पंचवार्षिक योजना १९५७ ते १९६१ या मुदतीत पार पडली. ही योजना ४८०० कोटी रुपयांची होती.

तिसरी पंचवार्षिक योजना १९६१ ते १९६६ या कालावधीत पार पडली. ही योजना १२,१०० कोटी रुपयांची होती. ही योजना मोठी महत्त्वाकांक्षी होती. परंतु या योजना काळात भारताला मोठ्या कठीण परिस्थितीतून जावे लागले. १९६२ साली चीनचे आक्रमण व १९६५ साली पाकिस्तानचे आक्रमण अशी दोन परचक्रे भारतावर आली. भारताला राष्ट्ररक्षणासाठी आपले लक्ष केंद्रित करावे लागले. दोन युद्धे लढावी लागली. १९६२ साली संरक्षणासाठी २० नोव्हेंबरला ९५ कोटी रुपयांच्या जादा अंदाजपत्रकास लोकसभेला मान्यता द्यावी लागली. संरक्षण खर्चात वाढ झाली. आणि मुख्य म्हणजे नियोजनाचे खंबीर आधार व पुरस्कर्ते पं. जवाहरलाल नेहरूंचे १९६४ साली दुःखद निधन झाले. एका अर्थी भारतीय नियोजन पोरके झाले. पाठोपाठ दीड वर्षातच १९६६ च्या प्रारंभी शास्त्रीजींचे निधन झाले! या सर्वांचा परिणाम, तिसरी योजना संकल्पाप्रमाणे फलद्रूप होऊ शकली नाही. म्हणूनच चौथी पंचवार्षिक योजना जी १ एप्रिल १९६६ रोजी कार्यान्वित व्हावयास हवी होती—ती लांबणीवर टाकण्यात आली. चौथी योजना तिसरीहूनही सर्वच दृष्टीने मोठी व महत्त्वाकांक्षी होती. तिच्या स्वरूपाबद्दल व आकारमानाबद्दल बरीच अनुकूल-प्रतिकूल चर्चा झाली. आणि अखेरीस मागील योजना काळात संकल्पिलेली पण पुरी होऊ न शकलेली कामेच पुढील तीन वर्षांत एक-एक वर्षाची योजना आखून त्यानुसार पार पाडावीत असे ठरले. त्यानुसार ६६ ते ६७, ६७ ते ६८ व ६८ ते ६९ अशा तीन वार्षिक योजना पार पाडण्यात आल्या.

२४ मार्च १९७० रोजी २४,८८२ कोटी रुपयांची सुधारलेली

चौथी पंचवार्षिक योजना लोकसभेने मंजूर केली. परंतु ही योजना १ एप्रिल १९६९ पासून सुरू झाली असून ती ३१ मार्च १९७४ पर्यंत चालणार आहे.

अशा प्रकारे भारताने स्वातंत्र्योत्तर काळात तीन पंचवार्षिक योजना व तीन वार्षिक स्वरूपाच्या योजना पार पाडल्या असून स्वातंत्र्याला पंचवीस वर्षे पूर्ण झाली त्यावेळी भारत चौथ्या योजनेची पूर्तता करीत आहे.

या नियोजनबद्ध विकास कार्यामुळे देशाची सर्वांगीण भरभराट झाली, देश परिपूर्ण समृद्ध झाला, असे जरी नसले तरी गेल्या पंचवीस वर्षांत आपल्या राष्ट्रीय उत्पन्नात दुपटीहून अधिक वाढ झाली आहे. १९४८-४९ मध्ये आपले राष्ट्रीय उत्पन्न ८,६५० कोटी रुपयांचे होते. ते १९७०-७१ मध्ये १८,७७५ कोटी रुपयांचे झाले आहे. वाढ वाढत्या लोकसंख्येच्या संदर्भात झाली आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. १९४७ साली ३६ कोटी लोकसंख्या होती. १९७२ साली ती ५४ कोटी झालेली आहे. म्हणजे स्वातंत्र्यानंतर भारताची लोकसंख्या १८ कोटी वाढली आहे. स्वातंत्र्यकाळी दरडोई वार्षिक उत्पन्न २३० रुपये होते, ते या पंचवीस वर्षांत ३४७ रुपये झाले आहे. म्हणजेच दरमहा दरडोई अवघे २८-२९ रुपये पडतात. दिवसेदिवस वाढत चाललेली महागाई लक्षात घेता हे फारच अपुरे आहे, हे खरेच. पण त्यासाठीच तर आपल्याला परिश्रमांची शर्थ करावयाची आहे.

☆ ☆ ☆

# नवी तीर्थक्षेत्रे

भारताच्या समृद्धीसाठी योजनेनुसार प्रांतोप्रांती विकासाची कामे सुरू झाली. भारत हा मूलतः शेतीप्रधान देश असल्यामुळे शेतीसुधारणेकडे आणि मोठमोठे उद्योगधंदे उभारण्याकडे लक्ष पुरवण्यात आले. शेतीसाठी पाणी आणि कारखान्यांसाठी वीज यांची आवश्यकता फारच होती. म्हणून निरनिराळ्या ठिकाणी धरणे, वीजगृहे आणि मग कारखाने उभारण्यात आले. या प्रकल्पांना पं. जवाहरलाल नेहरूंनी 'भारताची नवी तीर्थक्षेत्रे' म्हणून संबोधले होते. गेल्या पंचवीस वर्षांत अशी नवीन पुढील तीर्थक्षेत्रे अस्तित्वात आली आहेत.

**भाक्रा – नान्गल**

पंजाब राज्यात सतलज नदीवर १९५४ ते १९६३ या कालावधीत हे एक फार मोठे धरण बांधून झाले. १ अब्ज ७५-कोटी ६७ लक्ष-रुपये या प्रकल्पावर खर्च झाले. या धरणाच्या पाण्याखाली सुमारे २७·४ लाख हेक्टर जमीन पिकाऊ बनली आहे. नान्गल, भाक्रा व

कोटला अशी तीन विद्युतगृहे उभी राहिली असून त्यांची क्षमता ६०४ मेगॅवॅट इतकी आहे. पंजाब, हरियाना व राजस्थान या राज्यांना या योजनेचा लाभ होत असून भारतातील सर्वांत मोठे असे हे धरण आहे.

## बियास

पंजाबमधला हा दुसरा प्रकल्प. बियास आणि सतलज या दोन नद्यांचे पाणी अडवले असून पोंग येथे धरण बांधले आहे. या धरणाखाली ५·२६ लक्ष हेक्टर जमीन भिजणार असून, ६३६ मेगॅवॅट इतकी वीजनिर्मिती होणार आहे. पंजाब, हरियाना आणि राजस्थान या तीन राज्यांना या योजनेचा लाभ होत आहे.

## राजस्थान कालवा योजना

या योजनेवर सुमारे १९९ कोटी रुपये खर्च झाले असून, ४६९·८ किलोमीटर लांबीच्या या कालव्याने ११·४९ लक्ष हेक्टर जमीन पाण्याखाली येणार आहे.

## हिराकुड-बांध-योजना

ओरिसा राज्यातील महानदीवर ४, ८०० मीटर लांबीचा बांधलेला बांध हा जगातील सर्वांत जास्त लांबीचा बांध मानला जातो. दोन्ही किनाऱ्यांवर बांधलेल्या २१ किलोमीटर उंचीच्या तटबंदीने ८१ कोटी घनमीटर पाणी साठवले जाते. या योजनेवर सुमारे ६८ कोटी रुपये खर्च आला असून २·४३ लाख हेक्टर जमीन पाण्याखाली आलेली आहे. हिराकुड-विद्युतगृहात १९८ मेगवॅट वीज-निर्मिती होते. याच योजनेवरील चिपलिना येथील विद्युतगृहात ७२ मेगॅवॅट वीज-निर्मिती होते. ओरिसातील अनेक उद्योगधंद्यांना व धातु कारखान्यांना या विजेचा लाभ होत आहे.

## दामोदर-घाटी योजना

पश्चिम बंगालमधील या योजनेत दामोदर आणि बारकर नदीवर

१९५३ ते ५९ या कालावधीत तिलैया, कोनार, मायथन व पंचेन-पहाडी येथे ४ संग्रहण-बांध घातलेले आहेत. कोनारव्यतिरिक्त तिन्ही बांधांना संलग्न अशी सुमारे १,०४,००० किलोवॅट क्षमतेची विद्युत्‌गृहे उभारण्यात आली आहेत. याशिवाय बोकारो, दुर्गापूर आणि चंद्रपूर येथे ६·२५ लक्ष किलोवॅट क्षमतेची तीन थर्मल पॉवरस्टेशन्स उभारलेली आहेत. दुर्गापूर येथील बांधामुळे सुमारे ४ लक्ष हेक्टर भूमीला पाणी मिळेल.

## तुंगभद्रा प्रकल्प

म्हैसूर राज्यात तुंगभद्रा नदीवर मल्लापुरम येथे बांधलेल्या या धरणामुळे ३० लक्ष एकर फूट पाणी साठवले जाईल व त्यावर आंध्र आणि म्हैसूर राज्यातील ४·२ लाख हेक्टर जमीन पाण्याखाली येईल. दोन विद्युत्‌गृहे उभारण्यात येणार असून त्यांची वीजनिर्मितीची क्षमता १८,००० किलोवॅट इतकी आहे.

## कोसी-प्रकल्प

११० कोटी रुपये खर्चाची ही योजना बिहारमधील कोसी नदीवर १९५९ सालीच पूर्ण झाली आहे. या प्रकल्पामुळे नेपाळ व बिहारमधील २०,७२० वर्ग किलोमीटर जमीन महापुराच्या तडाख्यातून वाचली असून बिहार व नेपाळमधील १२ लक्ष हेक्टर जमीन पाण्याखाली आली आहे.

## चंबळ-प्रकल्प

मध्यप्रदेशातील या योजनेच्या प्रथमार्धात 'गांधी सागर' नामक विशाल बांध असून त्यात ७ अब्ज, ७४ कोटी, ६० लक्ष घनमीटर पाणी साठवता येते. या पाण्याने मध्यप्रदेश व राजस्थानमधील ४·४६ लक्ष हेक्टर जमीन भिजेल. गांधीसागर विद्युत्‌गृहातून ८०,००० किलोवॅट वीजनिर्मिती होईल. १९६० च्या नोव्हेंबरपासून धरणातील पाणी शेतीला मिळू लागले आहे.

या योजनेच्या द्वितीयार्धाचे काम सुरू असून त्यात 'राणा प्रतापसागर'

बांध व विद्युत्गृह होणार आहे. त्यायोगे १·२१ लक्ष हेक्टर भूमीला पाणी मिळेल आणि ९०,००० किलोवॅट वीज-निर्मिती होईल.

योजनेच्या तृतीयार्धाचेही काम सुरू झाले असून त्यात कोटा-बांध आणि विद्युतगृह होणार आहे.

## नागार्जुनसागर-योजना

आंध्रप्रदेशातील कृष्णा नदीवर हा प्रकल्प असून दोन्ही किनाऱ्यांवरून कालवे काढण्यात आले आहेत. त्यामुळे ८·१ लक्ष हेक्टर जमीन पाण्याखाली येईल. या धरणात ६५,६२० लक्ष घनमीटर पाणी साठवले जाईल. या योजनेवर २०० कोटी रुपये अंदाजे खर्च होतील.

## काकरापारा-योजना

गुजरातमधील तापी नदीवरील ही योजना काकरापारा येथे १९५३च्या जूनमध्ये पूर्ण झाली. यामुळे २·२७ लक्ष हेक्टर जमिनीला पाणी मिळते.

## पेरीयर घाटी योजना

केरळमधील एर्नाकुलम जिल्ह्यात अलवाये येथे पेरीयर नदीवर हे धरण असून याला ११ कोटी रुपये खर्च आला आहे. यामुळे ४१,००० हेक्टर जमिनीला पाणी मिळते.

याशिवाय बिहार आणि उत्तर प्रदेशाला उपयुक्त ठरणारी 'गंडक योजना', गुजरातमधील 'ऊकाई योजना', मध्यप्रदेशातील 'तावा योजना' महाराष्ट्रातील 'गिरणा', 'पूर्णा' व 'कोयना-योजना', म्हैसूरमधील 'भद्रा-प्रकल्प', 'अप्पर कृष्णा प्रॉजेक्ट' आणि 'मलप्रभा प्रकल्प', तामिळनाडूमधील 'परंबीकुलम' योजना, उत्तर प्रदेशातील 'रामगंगा प्रकल्प', पश्चिम बंगालमधील, 'मयूराक्षी प्रकल्प' व 'फराक्का प्रकल्प'—असे कितीतरी लहान-मोठे प्रकल्प या पंचवीस वर्षांत कार्यान्वित झालेले आहेत. तळी विहिरी, छोटे बंधारे, कूपनालिका इत्यादी लहान लहान प्रकल्पही

झालेले आहेत.

स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी २·२६ कोटी हेक्टर जमिनीला पाणी मिळत होते; या पंचवीस वर्षांत ३·७५ कोटी हेक्टर जमिनीला मिळू लागले.

वीज उत्पादन फक्त २० लक्ष किलोवॅट होते, ते आता १·६७ कोटी किलोवॅट झाले आहे. स्वातंत्र्यापूर्वी भारतात ४,००० शहरे नि गावे यांना विजेचा लाभ झाला होता. परंतु आता १,०५,२४२ खेडयांमधून वीज लखलखू लागली आहे.

औद्योगिक क्षेत्रातही स्वतंत्र भारताने बरीच प्रगतीपर वाटचाल केलेली आहे. देशातील उत्पादनक्षमता व उत्पादन वाढवण्यासाठी नवनवीन योजना सरकारने आखल्या. त्या प्रोत्साहित करण्यासाठी १९५८ च्या फेब्रुवारीमध्ये 'राष्ट्रीय उत्पादक परिषद' नावाची एक स्वतंत्र संस्था स्थापन करण्यात आली. सरकार, उद्योगपती व कामगार यांचे प्रतिनिधी या संस्थेत आहेत. या परिषदेने आतापर्यंत विभिन्न उद्योगकेंद्रांमधून स्थानिक स्वरूपाची उत्पादक मंडळे आणि कलकत्ता, कानपूर, बंगलोर, मुंबई, मद्रास आणि लुधियाना अशी ६ विभागीय उत्पादकता मंडळे स्थापन केलेली आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळात १९५९ साली पं. जर्मनीमधील एका फार्मच्या सहकार्याने राऊरकेला येथे, रशियाच्या सहकार्याने भिलाई येथे व ब्रिटिशांच्या सहकार्याने दुर्गापूर येथे पोलादाचे कारखाने सुरू झाले आणि १९६४-६५ साली रशियाच्या सहकार्याने चौथा पोलाद कारखाना बोकारो येथे उघडण्यात आला.

रेल्वे वाहतुकीचीही बरीच प्रगती या काळात झाली. बंगालमधील चित्तरंजन येथे रेल्वे इंजिने बनवण्याचा कारखाना २६ जानेवारी १९५० रोजी सुरू झाला. त्यानंतर वाराणशी येथे डिझेल इंजिने बनवण्याचा दुसरा कारखाना सुरू झाला. तामिळनाडूमधील पेरांबुर व बंगलोर येथे प्रवासी डबे-बांधणीचे कारखाने सुरू झाले. मालडबे-वाघिणी बनवण्याचे कारखाने

खाजगी क्षेत्रात आहेत. भारताची गरज भागवून या उद्योगाने द. कोरिया, युगोस्लाव्हिया, हंगेरी, इराण व तैवान इत्यादी विविध देशांत वाघिणींची निर्यात केलेली आहे.

विशाखापट्टण येथे जहाज निर्मितीचा कारखाना असून कोचीन येथे दुसरा कारखाना सुरू होत आहे.

बंगलोर येथील विमान कारखान्यात १९५२ पासूनच निर्मिती होऊ लागली आहे. या कारखान्यात आता सुपरसॉनिक जेट विमान, वँपायर, नॅट-लढाऊ आणि जेट-प्रशिक्षण विमानांचीही निर्मिती होत आहे. कानपूर येथील कारखान्यात ॲवरो-७४८ विमानाची निर्मिती होत आहे.

सिन्दरी, राऊरकेला, ट्रॉम्बे, येथे रासायनिक खत उत्पादनाचे कारखाने सुरू झाले आहेत.

पेनिसिलीन, स्ट्रेप्टोमायसीन आणि आधुनिक औषधी महाराष्ट्रातील पिंपरी येथील हिंदुस्थान ॲंटीबायोटिक्स कारखान्यात होत आहेत.

निरनिराळी इंजिने, मशिनरी, अवजारे, घड्याळे, टेलिफोन्स, तारा, चष्म्यांच्या काचा, बॉयलर्स, कोळसा खणण्याची यंत्रे, इत्यादी इंजिनियरी वस्तूंचे उत्पादन करणारे कारखाने भारतात निघाले असून भारत या बाबतीत स्वावलंबी बनला आहे.

साखर, कापड, तेल, कोळसा, चहा, रबर इत्यादीचे उत्पादनही वाढले आहे.

लघुउद्योगांनाही सरकारने सर्व प्रकारची मदत केली आहे. भारताचा कायापालट करणाऱ्या ह्या योजना, प्रकल्प म्हणजे खरोखरीच तीर्थक्षेत्रे आहेत.

☆ ☆ ☆

# गोमंतकाची मुक्ति चळवळ

भारत स्वतंत्र झाला. भारतावरील दीडदोनशे वर्षांचे ब्रिटिश पारतंत्र्य नष्ट झाले. भारताच्या काही भागावर असलेली फ्रेंच सत्ताही काळाची चाहूल ओळखून गेली. संस्थानेही विलीन झाली. भारतामधली कोट्यवधी जनता स्वातंत्र्य उपभोगू लागली. परंतु दीव, दमण आणि गोवा या प्रदेशातील ८-८॥ लक्ष जनतेला मात्र स्वातंत्र्याचा प्रकाश दिसलेला नव्हता. ७ मे १४९८ रोजी पोर्तुगीज वॉस्को-द-गामा कालिकत बंदरात उतरला आणि तेव्हापासूनच पोर्तुगीज सत्तेने आपले हातपाय पसरायला सुरुवात केली. एकेक मुलुख घशाखाली घातला. मराठ्यांनी त्यांच्याशी झुंज घेतली. छत्रपती शिवाजीराजांनी हल्ला करून फोंडयाचा किल्ला १६७५ मध्ये जिंकला होता. संभाजीराजांनी १६८३ मध्ये चौलवर स्वारी करून पोर्तुगीजांना फोंडयातून हुसकून लावले होते. पुढे पेशवाईच्या काळात चिमाजी अप्पाने १३ मे १७३९ रोजी वसईचा किल्ला जिंकून घेतला. अशा चकमकी अधुनमधून झडल्या,

पण पोर्तुगीज सत्ता समूळ गेली नाही. उलट मराठी सत्तेच्या पडझडीत ती दीव, दमण व गोवा येथे चिकटून राहिली. १७८८ साली गोव्यातील मराठी सत्तेचा शेवटचा अंश संपला आणि पोर्तुगीज सत्ता निर्वेध झाली. पुढे राण्यांची अयशस्वी बंडे उद्‌भवली, पण पोर्तुगीज सत्तेला ती नष्ट करू शकली नाहीत. गोव्यातली जनता अशा प्रकारे साडेचारशे वर्षे पारतंत्र्य भोगीत होती. ब्रिटिश हिंदुस्तानात ज्यावेळी इंडियन नॅशनल काँग्रेस स्वातंत्र्यासाठी लढत होती, त्याच वेळीं त्या लढ्यापासून स्फूर्ती घेऊन गोमंतकीयांनी १९३० साली गोवा काँग्रेस कमिटीची स्थापना केली होती. मुंबईत उद्योगधंद्यानिमित्त पुष्कळसे गोमंतकीय राहात असतात. त्यांनी मुंबईत गोवा काँग्रेस कमिटीची स्थापना १९३६ साली केली होती.

या वेळी खुद्द पोर्तुगालमध्ये सालाझारची हुकूमशाही राजवट शासन चालवीत होती. हुकूमशाही म्हणजे देखील स्वजनांचे पारतंत्र्यच ! हुकूमशाहीत व्यक्तीस्वातंत्र्याचा बराचसा लोप झालेला असतो.

सालाझारच्या जुलमी राजवटीने गोव्यात नागरिक-स्वातंत्र्यावर अनेक तऱ्हेची बंधने लादली, पण बंधनांनी, दडपणांनी, स्वातंत्र्याची प्रज्वलीत झालेली ज्योत विझवता येत नसते. उदय पावलेली स्वातंत्र्याची आकांक्षा मावळत नसते. गोव्यात आणि गोव्याबाहेरही गोमंतकीयांनी आपला स्वातंत्र्यलढा चालू ठेवला होता.

या लढ्याने खरे उग्र स्वरूप धारण केले १९४६ साली. भारतात नेहरूंचे हंगामी मंत्रिमंडळ अधिकारावर आलेले होते. स्वातंत्र्याच्या वाटाघाटी चाललेल्या होत्या. भारताचे स्वातंत्र्य दृष्टीपथात आले होते. ब्रिटीश सत्ता गुंडाळून जाण्याच्या तयारीत होते. ह्या सर्व घडामोडींनी गोमांतकाच्या स्वातंत्र्यभावना उचंबळून आल्याशिवाय कशा राहतील !

१९४६ चा जून महिना होता. १० तारखेला डॉ. राम मनोहर लोहिया यांनी गोव्यात प्रवेश केला. डॉ. लोहिया हे थोर विचारवंत आणि समाज-

वादी नेते म्हणून सुप्रसिद्ध होतेच. पण नुकत्याच होऊन गेलेल्या १९४२ च्या क्रांतीत त्यांनी भूमीगत राहून ब्रिटिश सत्तेशी दिलेली झुंज लोकांच्या लक्षात होती. त्यांनी त्यावेळी चालविलेली गुप्त आकाशवाणी अद्याप आठवणीत ताजी होती. डॉ. लोहियांच्या आगमनाने गोमंतक स्वातंत्र्य-लढ्याला नवें तेज चढले. अनेक गोमंतकीय स्वातंत्र्यभक्त डॉ. लोहियांच्या भोवती गोळा झाले. चर्चा, वाटाघाटी, पाहाणी या सर्वांतून पोर्तुगीज सत्ते-विरुद्ध कायदेभंगाचे रणशिंग फुंकण्याचे ठरले.

१८ जून १९४६ चा दिवस. मडगावच्या नगरपालिकेचे प्रचंड मैदान पन्नास-साठ हजार लोकांनी फुलून गेले होते. स्वातंत्र्यभावनेने हेलावणारा एवढा जनसागर गोमंतकाच्या भूमीने यापूर्वी कधी पाहिलेला नव्हता. स्वातंत्र्याच्या मंत्राने भारावलेले ते लोक निर्भय होऊन आपल्या नेत्याचे शब्द ऐकण्यासाठी उत्सुकतेने जमलेले होते. पण त्यांना वेगळीच वार्ता ऐकावी लागली. पोर्तुगीज सरकारने सभेपूर्वीच डॉ. लोहियांना अटक केली होती.

डॉ. लोहियांच्या अटकेचे वृत्त कळताच जमलेल्या हजारो लोकांत संतापाची लाट उसळली. डॉ. लोहियांचा जयजयकार आणि पोर्तुगीज सरकारच्या दडपशाहीचा धिक्कार याने मैदान कोंदाटून गेले.

पोर्तुगीजांनी आपले पाशवी बळ वापरले. जमलेल्या लोकांवर निर्दय लाठीहल्ला केला. अनेकांची डोकी फुटली. अनेकांना मुका मार बसला. सरकारने सर्वत्र दहशतीचे वातावरण निर्माण केले. पण राष्ट्रवादी गोमंतक जनता नमली नाही. दडपशाहीचा धिक्कार करण्यासाठी सर्वत्र हरताळ पाळण्यात आला. निषेध सभा झाल्या. अनेक कार्यकर्त्यांना अटक करून तुरुंगात डांबण्यात आले. झडत्या, दमदाटी, मारपीट असा अनेक प्रकारांनी छळ होऊ लागला. बघता बघता स्वातंत्र्याच्या आंदोलनाने रौद्र रूप धारण केले. गोमंतकीय साहित्यिक, पत्रकार, विचारवंत यांची लेखणी व

वाणी स्वातंत्र्यार्थ स्त्रवू लागली. कविवर्य बोरकरांची संगीतमय चित्रवीणाही गाऊ लागली.

**शांता झाली दुर्गा रे ।**
**जागृती आली दीनदुर्बला सगळ्या पीडित वर्गा रे ॥**
**रुद्रशक्तिही राष्ट्रदेवता**
**उठे पुकारित शुचिता, समता**
**दशलक्ष करें घडवी अभिनव मानवतेच्या सर्गा रे ।**
**सत्य, अहिंसा, शिस्त, शांतता**
**मोक्षाये फेकित ऋतरता**
**भूगर्भातुन, हृत्‌भगांतुन आणी अक्षय स्वर्गा रे ॥**
**सायुध तिजसम या रे सारे**
**दिव्य दृष्टिने दर्शन घ्या रे**
**व्यापुनी ती मग राहिल अनुदिन देऊळ, इगिंज, दर्गा रे ॥**

सत्ताधीशांना विवेक नसतो. त्यांनी अटक केलेल्या कार्यकर्त्यांवर खटले भरले. न्यायाचे नाटक उभे केले. दहा दहा पंधरा वर्षांच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. त्यांना लिस्बनच्या कोठडीत नेऊन डांबले.

१८ ऑगस्ट १९४६ रोजी श्रीयुत भेंब्रे यांच्या अध्यक्षतेखाली 'नॅशनल काँग्रेस गोवा' या संस्थेची स्थापना झाली. पोर्तुगीज सरकारची दडपशाही सुरूच होती. कुन्हा या स्वातंत्र्यवीराला पोर्तुगीज लष्करी कोर्टाने कठोर शिक्षा ठोठावली तेव्हा पं. जवाहरलाल नेहरूंनीही पत्रक काढून या जुलमाचा निषेध केला. काँग्रेसनेही गोव्यातल्या हुकूमशाहीचा धिक्कार केला. गोव्यातल्या स्वातंत्र्य-आंदोलनाला सहानुभूतीपूर्वक पाठिंबा प्रकट केला. 'हरिजन' मध्ये एका लेखाद्वारे गांधीजींनीही आपली सहानुभूती व्यक्त केली. नेहरू व गांधी यांनी त्यावेळचा गोव्याचा गव्हर्नर जनरल दो बांस याच्याशी पत्रव्यवहार करून जनतेच्या स्वातंत्र्यभावनेची कदर करण्याची

विनंती केली. परंतु " गोवा हा पोर्तुगालचाच भाग आहे " असा खुळचट दावा पोर्तुगीजांनी मांडला.

स्वातंत्र्याची चळवळ सुरूच होती. मेंत्रे आदी गोमंतकीय नेत्यांना अटक झाली. काहींना तुरुंगात टाकले, तर काहींना हद्दपार केले. मध्यंतरीच्या काळात डॉ. लोहियांना सोडले होते. त्यांनी परत गोव्यात प्रवेश केला. त्यांना अटक करून ८ ऑक्टोबरला पाच वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली.

दरम्यान भारत स्वतंत्र झाला. परंतु गोवा मात्र दास्यातच राहिला. गोव्यातील क्रांतिकारक नेटाने चळवळ चालवीत होते. पोर्तुगीज सरकार चळवळ दडपून टाकण्याचा हरतऱ्हेचा प्रयत्न करीत होते. अधूनमधून होणाऱ्या स्फोटांबाबत, गोव्यात आबादीआबाद असून भारतातून ही चिथावणी देण्यात येत आहे, असे बाहेरच्या जगाला पोर्तुगीज भासवीत होते.

भारतातील जनता आणि राजकीय पक्ष भारत सरकारवरही गोव्याच्या स्वातंत्र्याचा प्रश्न सोडवण्याबाबत दडपण आणीत होते. पं. नेहरूंनी तर एकदा 'गोव्यातील पोर्तुगीज सत्ता म्हणजे एखाद्या क्षुद्र पुटकळीसारखी आहे' असे उपहासाने उद्‌गार काढले होते. परंतु ही पुटकुळीच गोव्याच्या जनतेला अवस्थ करीत होती. तिथली जनताही पुटकुळी फोडून टाकण्यासाठी अधीर बनलेली होती. गोमंतकातील पोर्तुगीजांची वाढती दडपशाही पाहून तरुणांनी गुप्त संघटनांचे जाळे तयार केले. त्यांना कमांडोज म्हणत असत. 'आझाद गोमंतक दल' ही कार्यप्रवण झाले होते.

१९५४ च्या जुलै महिन्यात आझाद गोमंतक दलाच्या या बहाद्दरांनी दादरा-नगर हवेलीवर हल्ला चढवला. २ ऑगस्टला सेल्वासा जिंकून घेतले. लाहोरी, पिपरीया या खेड्यांनाही त्यांनी मुक्त केले. सेल्वासाचा पोर्तुगीज गव्हर्नर शरण आला. दादरा-नगर हवेलीवर भारताचा स्वातंत्र्यध्वज फडकू लागला. दमणचा स्वातंत्र्यलढाही क्रांतिकारकांनी यशस्वी केला.

३० सप्टेंबर १९५५ रोजी 'गोवे लिबरेशन आर्मी' किंवा 'गोवा मुक्ति फौज' स्थापन करण्यात आली. या मुक्तिफौजेतील क्रांतिकारकांनी मडगाव, पैंगिणी येथील पूल उडवून दिले. कुठे रेल्वेचे रूळ उखडले. तर कुठे खाणीत स्फोट घडवले. या घातपाती कृत्यांत काही हुतात्मेही झाले. ह्या भूमीगत क्रांतिकारकांना गोव्यातील जनता सहानुभूतीने मदत करीत असे. वातावरण तापत चालले होते.

६ एप्रिल १९५५ रोजी म्हापसे येथे गोवा नॅशनल काँग्रेसचे अधिवेशन भरले. बंदी मोडून सौ. सुधाताई जोशी यांनी अध्यक्षीय भाषण सुरू केले. भाषण करतानाच त्यांना अटक करून दहा वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली.

या घटनेनंतर चोहोकडूनच उठाव झाला. महाराष्ट्र गोव्याला लागून आणि भाषा संस्कृतीदृष्ट्या एकरूप, त्यामुळे साहजिकच महाराष्ट्रात विशेष खळबळ माजली. त्याच सुमाराला गोमंतक साहित्य संमेलन श्री. ना. ग. गोरे यांच्या अध्यक्षतेखाली भरले. त्याकाळी ही संमेलने गोव्यातील दडपशाहीमुळे महाराष्ट्रात होत असत. त्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना नानासाहेब गोरे यांनी 'मी गोव्यात प्रवेश करणार!' अशी घोषणा केली.

पुण्यात काँग्रेसव्यतिरिक्त सर्व राजकीय पक्षांनी एकत्र येऊन 'गोवा विमोचन समिती'ची स्थापना केली. महाराष्ट्राने व अन्य प्रांतांनीही या समितीला सर्व प्रकारे साहाय्य केले. या समितीच्या वतीने गोव्यात सत्याग्रहींच्या तुकड्या पाठवण्याचे ठरले. पहिल्या तुकडीचे नेते निवडले गेले श्री. नानासाहेब गोरे. त्यांच्या बरोबर वयोवृद्ध सेनापती बापटही निघाले. पोर्तुगीजांनी सर्व सरहद्दी रोखल्या होत्या. सावंतवाडी, बेळगाव येथे समितीची सत्याग्रह शिबिरे उघडली होती. आडवाटेने जंगल तुडवून सत्याग्रहींनी गोव्यात प्रवेश केला. आणि भारताचा स्वातंत्र्यध्वज फडकवला.

त्याबरोबर सैतानी पोर्तुगीज सैनिकांनी सत्याग्रहींना गिरफदार करून अमानुष अशी मारझोड केली. सेनापतींनाही मारले. त्यांना मारून सोडून दिले. परंतु नानासाहेब गोरे आदि सत्याग्रहींना आग्वादच्या तुरुंगात नेऊन टाकले. गोरे यांना दहा वर्षांची शिक्षा ठोठावली.

दुसरी तुकडी श्री. शिरूभाऊ लिमये यांच्या नेतृत्वाखाली गोव्यात घुसली. शिरूभाऊ व त्यांच्याबरोबरच्या सत्याग्रहींनाही भयंकर मारपीट केली. दहा दहा वर्षांच्या शिक्षा दिल्या.

पण या अमानुष, क्रूर प्रकाराला न घाबरता सर्व प्रांतांतून सत्याग्रहींची नोंद होऊ लागली.

१५ ऑगस्ट १९५५ रोजी गोव्याच्या सर्व बाजूंनी आत घुसून मोठ्या प्रमाणावर सत्याग्रह करण्याचा बेत आखण्यात आला. सत्याग्रहींचे जथेच्या जथे गोव्याच्या सरहद्दीवर जाऊन धडकले. गोव्याच्या चोहोबाजूला सत्याग्रहींचे तळ पडले. कॅसलरॉक, आरोंदा, कणकुंबी, दोडामार्ग, तेरेखोल, बांदा येथून सत्याग्रही निघाले. गोमंतकीय क्रांतिकारक जंगलातील वाटा दाखवीत असत. या वाटांनी, काट्याकुट्यांतून, नदीनाल्यांतून त्या दिवशी २४०८ सत्याग्रहींनी गोव्यात प्रवेश केला.

या सामुहिक सत्याग्रहाचे नेतृत्व भाई व्ही. डी. चितळे यांनी केले होते. पत्रादेवीच्या बाजूने त्यांनी गोव्यात प्रवेश केला. पोर्तुगीज सैनिकांनी त्यांच्या तुकडीवर गोळीबार केला. थोरात, सहा, कर्नलसिंग, मधुकर चौधरी, महांकाल हे सत्याग्रही जागच्या जागी गोळ्यांना बळी पडले. तेरेखोलजवळच्या गोळीबारात हिरवेगुरुजी कामी आले.

अखेर गोमंतक मुक्तीचा क्षण जवळ येऊन ठेपला. १७ डिसेंबर १९६१ रोजी भारतीय फौजा गोव्यात घुसल्या. त्या आधीच त्या सरहद्दीवर जाऊन खड्या होत्या. मेजर जनरल कँडेथ यांच्या हाती स्वारीची सूत्रे होती. रिअर अॅडमिरल सोमण यांच्याकडे आरमाराचे नेतृत्व होते. ' विक्रांत ', ' दिल्ली '

च्या प्रचंड युद्धनौकांनी गोव्याचा किनारा रोखला होता. बंदरे वेढली होती. या कारवाईचे सेनापती होते ले. ज. चौधरी !

१७ डिसेंबरच्या रात्री भारतीय रणगाडे गोव्यात घुसले. भारतीय चढाईला म्हणावासा प्रतिकार कुठेच झाला नाही. खेडोपाडी भस्मसात करीत, पूल उडवून देत, पोर्तुगीज सेनेने माघार घेतली. अखेरीस पोर्तुगीज गव्हर्नरने शरणागती पत्करली. दीड एक दिवसात गोव्याची कारवाई संपली नि ले. ज. चौधरींनी गोव्याचा ताबा घेतला सुद्धा.

१९ डिसेंबर १९६१. गोव्याचा भाग्यदिवस उजाडला. साडेचारशे वर्षांची परकीय गुलामीची काळरात्र संपून गोव्याच्या भूमीने स्वातंत्र्याचा प्रकाश पाहिला ! गोमंतक मुक्त झाला !

☆ ☆ ☆

# मधल्या घडामोडी

२१ जानेवारी १९५५ रोजी तामिळनाडू प्रदेशात आवडी येथे काँग्रेसचे ६० वे अधिवेशन भरले होते. श्री. ढेबर हे अध्यक्ष होते. या काँग्रेसचे वैशिष्ट्य असे की, 'समाजवादी समाजरचने' चा ठराव पास झाला. समाजवादाची भाषा पं. नेहरू फार पूर्वीपासूनच करीत होते. परंतु काँग्रेसने अधिकृतरीत्या आपले ध्येय म्हणून समाजवादाचा अंगीकार आवडी येथे प्रथमच केला.

मूळ समाजवादी पक्ष हा तोवर प्रजासमाजवादी पक्ष म्हणून अस्तित्वात आलेला होता. आचार्य कृपलानी आणि अन्य काही नेते यांचे काँग्रेसशी मतभेद झाल्यामुळे त्यांनी काँग्रेस सोडून प्रजापक्ष काढला होता. लवकरच हा पक्ष समाजवादी पक्षात विलीन झाला आणि प्रजासमाजवादी पक्ष बनला. पुढे कांही दिवसांनी डॉ. लोहिया यांच्या नेतृत्वाखाली या पक्षातील काही मंडळी बाहेर पडली आणि त्यांनी 'संयुक्त समाजवादी पक्ष' स्थापन केला. हळूहळू अन्य पक्षही समाजवादाची भाषा करू लागले. 'समाजवाद'

ही एक जीवनप्रणाली आहे, समाजव्यवस्था आहे या मूलभूत गोष्टीकडे दुर्लक्ष होऊन निवडणुकी जिंकण्यासाठी एक आकर्षक घोषणा म्हणूनच इतरेजनांनी या शब्दाचा वापर केला. त्यामुळे समाजवादी चळवळ जोमाने अंग धरू शकली नाही.

काँग्रेसने समाजवादी समाजरचनेचा ठराव केला, पण अंमलबजावणीत अनेक अडचणी आल्या. स्वातंत्र्यानंतर सत्तेच्या अनुरोधाने बळावलेला एक नवीन धनिक वर्ग देशात निर्माण झालेला होता. सहकार, सरकार, जिल्हा व ग्रामपंचायतीपर्यंत या गटाने सत्तेची स्थाने आपल्या हातात ठेवली होती, सर्व सवलती, पैसा, पत स्वतःच्या उत्कर्षासाठी राबवली होती. सत्तेच्या अनुषगांने भ्रष्टाचारही माजला होता. त्यामुळे ध्येय, ठराव, कायदा यांचा हेतूच अंमलबजावणीत सफल होत नव्हता. तथापी, काही राज्यांनी जमिनीसंबंधी कूळकायदे केले, जमीन धारणेची मर्यादा ठरवली, सहकारी कारखाने, खरेदी-विक्री सोसायट्या इत्यादी अनेक उपक्रम सुरू केले.

१९ जानेवारी १९५६ रोजी सरकारने भारतांतील आयुर्विमा व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण केले.

नागपूर येथे इंदिरा गांधींच्या अध्यक्षतेखाली १९५९ साली काँग्रेसचे अधिवेशन झाले. त्या अधिवेशनात आवडीच्या ठरावाच्या दिशेने आणखी एक पाऊल उचलण्यात आले–'सहकारी शेती' चा ठराव पास झाला.

पंचवार्षिक योजना राबवली जात होतीच. औद्योगिकदृष्ट्याही महत्त्वाचे प्रकल्प उभारले जात होते.

४ ऑगस्ट १९५६ रोजी मुंबई तारापूर येथे भारताची पहिली अणुभट्टी कार्यान्वित झाली. अणुयुगातील गरज ओळखून भारताने हा एक महत्त्वाचा उपक्रम हाती घेतला होता. अणूचे सामर्थ्य अगाध आहे, परंतु ही अणुशक्ती मानवी संहाराकरिता न वापरता 'शांततेसाठी अणू' वापरून समृद्धी

साधण्याचा विधायक दृष्टीकोन भारताने ठेवला आहे.

१९५७ साल उजाडले आणि भारतात दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकांचे पडघम निनादू लागले. बरेच राजकीय पक्ष निवडणुकीच्या आखाड्यात उतरले. आपआपल्या उद्दीष्टांचे जाहीरनामे त्यांनी प्रसिद्ध केले. दौरे-सभा-भाषणे, पत्रके, लेख, पुस्तिका, भित्तीपत्रके, यांना भरती आली. प्रचाराची धमाल उडाली.

२४ फेब्रुवारी १९५७ रोजी सार्वत्रिक निवडणुकांना देशात प्रारंभ झाला. मार्चच्या पहिल्या आठवड्यात त्या संपल्या. या निवडणुकीत पुढीलप्रमाणे प्रमुख पक्षांना मतदान झाले.

काँग्रेस ४७·७४ टक्के, प्रजासमाजवादी १०·४१ टक्के, कम्युनिस्ट ८·९२ टक्के आणि जनसंघ ५·९३ टक्के.

केंद्रस्थानी काँग्रेस पक्ष पुनश्च अधिकारावर आला. पं. नेहरू पंतप्रधान झाले. प्रांतोप्रांतीही केरळ सोडून सर्वत्र काँग्रेसला बहुमत मिळाले. केरळ-मध्ये कम्युनिस्टांना बहुमत मिळाले; आणि ई. एम्. एस. नंबुद्रीपाद हे केरळचे मुख्यमंत्री झाले. महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावरून काँग्रेसला मोठा पराभव पत्करावा लागला होता. परंतु त्यावेळी द्वैभाषिक असल्यामुळे गुजरातच्या बहुमताने काँग्रेसच्याच हाती सत्ता राहिली. श्री. यशवंतराव चव्हाण हे मुख्यमंत्री झाले.

नवी लोकसभा सुरू झाल्यावर १० मे १९५७ रोजी डॉ. राजेंद्रप्रसाद यांची पुनश्च भारताचे राष्ट्रपती म्हणून निवड झाली. डॉ. राधाकृष्णन यांची उपराष्ट्राध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली.

६ डिसेंबर १९५७ रोजी आसाम आणि बिहार येथे तेल शुद्धिकरण कारखाने स्थापन करण्याची घोषणा केंद्र सरकारने केली. औद्योगिक प्रगतीच्या दिशेने आणखी एक पाऊल उचलले.

परंतु समाजवाद म्हणजे काही केवळ आर्थिक क्षेत्रातलीच समता नव्हे.

जीवनाच्या अन्य क्षेत्रातही सर्वांना समान संधी आणि सारखी वागणूक मिळायला हवी. १५ डिसेंबर १९५७ रोजी काशी येथील श्रीविश्वनाथाचे प्रसिद्ध मंदिरात ६० हरिजनांनी प्रवेश केला, ही घटना फार महत्त्वाची आहे शेकडो वर्षे हिंदु समाजाने आपल्या हरिजन-दलित बांधवांना अस्पृश्य मानून लांब ठेवले आहे. त्यांना साध्या माणुसकीलाही पारखे केले आहे. महाराष्ट्रात साने गुरुजींनी पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात हरिजनांना प्रवेश मिळावा म्हणून १९४७ साली प्राण पणाला लावले होते. स्वातंत्र्यात हरिजनांना मंदिर प्रवेशाचा कायदाच झाला. कायद्याने अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरवला गेला. परंतु प्रत्यक्षात मात्र जुजबी सुधारणांशिवाय फारसे काही झाले नाही. शहरात काही फरक पडला, पण खेडोपाडी अजूनही अस्पृश्यता कायम आहे. दलितांना माणुसकी नाकारणाऱ्या हिंदु धर्माचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्याग केला आणि आपल्या हजारो दलित बांधवांसह १९५६ साली समतेवर आधारलेल्या बौद्ध धर्माची दीक्षा घेतली, गावोगावचे हरिजन तेव्हापासून स्वतःला नवबुद्ध म्हणवून घेऊ लागले.

६ डिसेंबर १९५६ रोजी बाबासाहेबांचे निर्वाण झाले आणि भारतातील लक्षावधी दलितांचा आधार गेला. बाबासाहेबांच्या पश्चात त्यांच्या रिपब्लिकन पक्षातही बरेच मतभेद झाले आणि निरनिराळ्या गटांचे पक्षोपपक्ष निघाले.

२२ फेब्रुवारी १९५८ साली भारताचे शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांचे दुःखद निधन झाले. आझाद हे प्रथमपासूनच राष्ट्रीयवृत्तीचे मुस्लीम पंडित होते, त्यांचा पर्शियन भाषेचा व कुराणाचा व्यासंग दांडगा होता, लीगच्या जातीय राजकारणापासून त्यांनी स्वतःला आणि अनेक मुस्लीमांना बाजूला ठेवले. १९४० ते १९४६ या अत्यंत आणीबाणीच्या कालखंडात ते काँग्रेसचे अध्यक्ष होते. स्वतंत्र भारताचे ते पहिले शिक्षणमंत्री बनले. आझादांच्या मृत्यूने स्वातंत्र्याच्या लढ्यातील आणखी

एक दीप मालवला.

१२ फेब्रुवारी १९५९ रोजी काँग्रेसच्या अध्यक्षपदावर इंदिरा गांधी यांची निवड झाली. नेहरू घराण्याची तिसरी पिढी काँग्रेसच्या अध्यक्ष-पदावर विराजमान होत होती.

इंदिराजींच्या अध्यक्षीय कारकीर्दीत दोन महत्त्वाच्या गोष्टी त्यांच्या पुढाकाराने झाल्या. एक म्हणजे, संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती व केरळमधील कम्युनिस्ट राजवटीचा शेवट.

महाराष्ट्राच्या भावना इंदिराजींनी जाणल्या होत्या. त्यांना महाराष्ट्राबद्दल आत्मीयता वाटते. त्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असताना सातारच्या सभेत म्हणाल्या होत्या,

> "मी स्वतःला महाराष्ट्राची कन्या समजते, माझे बालपणचे शिक्षण महाराष्ट्रात झाले. त्यामुळे माझ्या व्यक्तिमत्त्वावर महाराष्ट्राचा ठसा आहे. मी महाराष्ट्रात येते तेव्हा आपल्या घरीच आल्यासारखे मला वाटते."

इंदिराजींनीच पं. नेहरूंना त्यावेळी, "जर संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य केली नाही तर महाराष्ट्रही कम्युनिस्टांच्या घशात जाईल!" असे स्पष्टपणे सांगितले होते. इंदिराजींच्या प्रयत्नानेच १ मे १९६० रोजी मराठी जनतेचे संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार झाले.

केरळमधील कम्युनिस्ट राजवट हा देखील त्यावेळी एक मोठा चिंतेचा व डोकेदुखीचा विषय झालेला होता. त्यामुळे फार मोठे धोके उत्पन्न होणार होते. अशा स्फोटक परिस्थितीत इंदिराजी धैर्याने केरळात गेल्या. तेथील प्रजासमाजवादी, मुस्लीमलीग, व काँग्रेस या पक्षांशी वाटाघाटी करून त्यांच्यामध्ये कम्युनिस्ट विरोधी एकजूट व सलोखा निर्माण करून त्यांनी केरळातील कम्युनिस्ट राजवट संपुष्टात आणली. राष्ट्राध्यक्षांनी ३१ जुलै १९५९ रोजी नंबुद्रिपाद मंत्रिमंडळ एका हुकुमान्वये बरखास्त केले.

चीनच्या हालचालीवरून चीन तिबेटला आपल्या वर्चस्वाखाली घेईल आणि तिबेटचे स्वतंत्र अस्तित्वच संपुष्टात येईल हे भविष्य इंदिराजींनी पंडितजींना पूर्वीच सांगितले होते. आणि नंतर घडलेही तसेच.

१७ मार्च १९५९ रोजी मोठ्या नाट्यमय रीतीने सैनिकांचा वेष करून तिबेटच्या दलाई लामांनी ल्हासातून भारतीय सरहद्दीकडे प्रयाण केले होते. त्यांना पकडण्यासाठी चिनी लष्करी अधिकाऱ्यांनी आधी बराच कुटिल डाव रचलेला होता. पण दलाई लामांनी तो ओळखला. ते निसटले. त्यांच्या प्रयाणाची वार्ता २० मार्चला चिनी अधिकाऱ्यांना जेव्हा कळली तेव्हा त्यांनी संतप्त होऊन ल्हासा नगरीत सैतानशाही मांडली. जाळपोळ, लुट-मार, अत्याचार तर केलेच, शिवाय एका दिवसात पन्नास हजार तिबेटी लोकांची निर्घृण कत्तल केली. एवढी अमानुष कत्तल त्यापूर्वी कोठे क्वचि-तच झाली असेल !

दलाई लामा तिथून निसटले म्हणूनच वाचले. २६ मार्च रोजी लामांचे दूत सिक्कीमला आले. त्यांनी भारत सरकारकडे आश्रय मागितला. भारत सरकारने माणुसकीच्या दृष्टीने दलाई लामांची विनंती मान्य केली. ३१ मार्च १९५९ रोजी तिबेटी निर्वासितांसह दलाई लामा भारतात आश्रयाला आले. पं नेहरू त्यांना तेजपूरला जाऊन भेटले. तेव्हापासून दलाई लामा भारतातच आहेत.

चीनने तिबेट घशात टाकला, तेव्हापासूनच भारताशी तो वाकडेपणाने वागू लागला. २१ ऑक्टोबर १९५९ रोजी चिनी सैन्य लडाख हद्दीत घुसले. भारताने याविरुद्ध तक्रार केली. वाटाघाटींचा घोळ सुरू झाला. चीनचे पंतप्रधान चौ-एन-लाय नेहरूंशी वाटाघाटी करण्यासाठी दिल्लीला आले होते. त्यानंतर सरहद्दीसंबंधी बोलणी करण्यासाठी भारतीय शिष्टमंडळ ६ जून १९६० रोजी पेकिंगला गेले होते, चीन आणि भारत यांमधील सरहद्द दाखवणारी मॅकमोहन रेषा चीन मानायलाच तयार नव्हता. भारतीय

हद्दीतला बराचसा मुलूख त्याने आपल्या नकाशात दाखवला होता आणि त्यावरून भारताशी भांडण काढले होते. नेफा, अक्साई चीन व लडाख या भागात चिनी सैन्याने भारतीय सैन्याची ठाणीही सर केली होती. चीनने आपली फार मोठी फौज भारतीय सरहद्दीजवळ आणून ठेवली होती. युद्ध साहित्याची जमवाजमव सुरू केली होती.

१९६२ साल उजाडले आणि भारताची तिसरी सार्वत्रिक निवडणूक जवळ येऊन ठेपली. सर्व निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. राजाजींच्या नेतृत्वाखाली १ ऑगस्ट १९५९ साली स्थापन झालेला 'स्वतंत्र' पक्षही यावेळी निवडणूक लढवीत होता. राजकारणात ज्याला डावे आणि उजवे समजले जाते त्या दृष्टीने स्वतंत्र पक्षाचे धोरण उजवे होते. समाजवादाला विरोधी होते.

१६ फेब्रुवारी १९६२ पासून निवडणुकीला प्रारंभ झाला. या निवडणुकीतही काँग्रेसला बहुमत मिळाले. पक्षवार मते पुढीलप्रमाणे मिळाली.

काँग्रेस ४४·७२ टक्के, कम्युनिस्ट ९·९४ टक्के, स्वतंत्र ७·८९ टक्के, प्रजासमाजवादी पक्ष ६·८१ टक्के, जनसंघ ६·४४ टक्के, आणि संयुक्त समाजवादी पक्ष २·६९ टक्के.


डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

वरील टक्केवारीवरून नवीन स्वतंत्र पक्षाने बरीच मते मिळवल्याचे व जुना समाजवादी पक्ष भंगल्यामुळे त्याला कमी मते मिळाल्याचे लक्षात येते.

मार्चमध्ये नव्या लोकसभेचे अधिवेशन सुरू झाले. पं. नेहरूच पुनश्च भारताच्या पंतप्रधानपदी निवडले गेले.

११ मे १९६२ रोजी डॉ. राजेंद्रप्रसाद निवृत्त झाले आणि भारताचे राष्ट्रपती म्हणून डॉ. राधाकृष्णन यांची निवड झाली. राधाकृष्णन हे जागतिक कीर्तीचे थोर तत्त्वज्ञ म्हणून सर्वत्र ओळखले जातात. अध्ययन आणि अध्यापन यातच त्यांनी आपले आयुष्य वेचले. भारतीय तत्त्वज्ञानाची थोरवी त्यांनी पाश्चात्यांना पटवून दिली होती. स्वातंत्र्यानंतर ते भारताचे वकील म्हणून मास्कोला राहिले होते. त्यावेळी अन्य कोणाही वकिलांना न भेटणारा रशियाचा सर्वाधिकारी स्टॅलिन याने आपणहून राधाकृष्णन यांची भेट घेतली होती. प्लेटो नावाच्या तत्त्वज्ञाने ' फिलॉसफर किंग ' तत्त्वज्ञ राजाची कल्पना केली होती. भारतात ' तत्त्वज्ञ राष्ट्रपती ' झाला !

☆ ☆ ☆

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. १९८ दिनांक .....
विषय किशोर क्र... ३९५.

# चीनचे आक्रमण

चीनने भारताशी अत्यंत घातकी वर्तन केले. पं. नेहरूंशी पंचशील करार करून मैत्रीच्या घोषणा देत असतानाच चीनने तिबेट आणि त्या भोवतीच्या नेफा, भूतान, सिक्किम, नेपाळ व लडाख या प्रदेशावर डोळा ठेवलेला होता. चीनच्या संरक्षणाच्या दृष्टीने हा संरक्षक पंजा हातात राहावा अशी त्याची मनीषा होती. तिबेट तर चीनने ताब्यात घेतलाच होता. नेपाळशी खास राजनैतिक संबंध प्रस्थापित केले होते. सरहद्दीबद्दल करार केला. काठमांडू येथे आपली एक वकिलातही चीनने उघडली होती. आणि लडाखच्या भारतीय हद्दीत तो पुढे पुढे सरकत होता. १९५७ ते १९६२ या काळात एकीकडे वाटाघाटी सुरू असतानाच चीनने अक्साईचीन या भारतीय प्रदेशातून रस्ता बांधून काढला होता. भारताचा सुमारे १२००० चौरस मैल प्रदेश घशात टाकलेला होता.

हाजीलंगर या ठाण्यावर तेथील प्रदेशात पहारा करणाऱ्या भारतीय सैनिकांना चीनने १९५८ सप्टेंबरमध्ये हरकत

घेतली. १९५९ सालच्या ऑक्टोबरमध्ये चांग चेनमो खोऱ्यात भारतीय प्रदेशात ४० मैल आत घुसून कोंगका खिंडीजवळ तेथील भारतीय सैनिकांवर गोळीबार केला. ९ सैनिक ठार झाले. १० सैनिकांना पकडून नेले. त्यांचा अत्यंत छळ चिन्यांनी केला.

या सर्व प्रकरणी भारताने चीनकडे कडक निषेध खलिते धाडले. पण चीनने त्याला दाद दिली नाही. १९६२ साली छुप्या आक्रमणाचे प्रकार आणखीनच वाढले. चीनने भारतीय हद्दीत घुसून जवळजवळ १०० मैलांचा प्रदेश बळकावला होता. परंतु भारताच्या खलित्याला उत्तर देताना तो म्हणत होता की, चिनी संरक्षक आपल्या सरहद्दीचे संरक्षण करीत आहेत. चीनच्या दृष्टीने व्यापलेला प्रदेश हा चीनचाच आहे. साम्राज्यवाद्यांनी मध्यंतरीच्या काळात तो बळकावला होता. आणि चुकीच्या सरहद्दी निर्माण केल्या. परंतु चीनच्या या दाव्याला कसलाही ऐतिहासिक, भौगोलिक, राजकीय पुरावा उपलब्ध नाही. भारताने हा प्रदेश आपलाच आहे याविषयी अनेक पुरावे सादर केले, पण चीनने ते मानले नाहीत. वस्तुस्थिती अशी होती की चीनला सत्य, न्याय याची पर्वा नव्हती. भारताचा हा मुलुख त्याच्या स्वार्थाच्या दृष्टीने त्याला हवा होता. इसापनीतीत ओढ्यावर खालच्या बाजूला पाणी पिणाऱ्या कोकराला 'तू नाही तर तुझ्या बापाने माझे पाणी गढूळ केले असेल' असे म्हणून जसे वाघाने त्याला खाऊन टाकले, तसलाच जंगलचा दांडगाईचा कांगावा चीनने चालवलेला होता.

सरहद्दीचा वाद मिटविण्यासाठी भारताने अनेक विधायक सूचना केल्या. पण चीनने त्या फेटाळून लावल्या आणि सीमा निश्चित करण्यासंबंधीचा करार पाकिस्तान बरोबर केला. भारताने याही गोष्टीचा अत्यंत कडक शब्दात निषेध केला.

८ सप्टेंबर १९६२ रोजी ईशान्य सीमा ओलांडून नेफा भागात चिनी

सैन्य उतरले. तिबेट, भूतान व भारत या देशाच्या सरहद्दी जेथे मिळतात त्या थागलारिज या ठाण्यावर त्यांनी हल्ला केला. धोला हे ठाणे ताब्यात घेतले. भारताने निषेधापलिकडे काही केले नाही.

या आक्रमणाच्या आदल्या दिवशी ७ सप्टेंबर रोजी पं. नेहरू राष्ट्रकुल परिषदेसाठी लंडनला गेले होते. तेथून ते फ्रान्स, नायजेरिया, घाना देशांन पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार भेटी देऊन आले. भारतात परतल्यानंतर १२ ऑक्टोबरला पं. नेहरू तीन दिवसांच्या भेटीसाठी सिलोनला गेले. मध्यंतरीच्या काळात त्यांनी संरक्षणमंत्री कृष्णमेनन यांनाही यूनोत धाडले होते. या गोष्टीवरून एवढाच निष्कर्ष निघतो की, पं. जवाहरलाल नेहरूंना चीन भारतावर मोठे लष्करी आक्रमण करील व त्यातून उभय देशात शत्रुत्व निर्माण होऊन युद्ध भडकेल याची शक्यताच वाटत नव्हती. संरक्षणाची तयारी पाकिस्तानी आघाडीवर केली होती.

परंतु चीनने मात्र भारताचा प्रदेश जबरजस्तीने बळकवायचा आणि प्रसंग पडल्यास त्यासाठी युद्धही करायचे, अशी तयारी ठेवली होती. निष्णात लष्करी अधिकारी त्यांनी सीमेलगतच्या प्रदेशात आणून ठेवले होते. पुरवठा केंद्रे उभारली होती. रस्ते तयार केले होते. युद्धकैद्यांना ठेवण्याची सोय केली होती. थागला भागात दोन डिव्हीजन सैन्य व १५० तोफा तयार ठेवल्या होत्या. तट्टे व इतर वाहतुकीची साधने ठेवली होती.

२० ऑक्टोबर १९६२ या दिवशी चीनने लडाख भागात भारताच्या अकरा ठाण्यांवर एकदम प्रचंड हल्ला चढवला. चीनच्या मानाने भारताची तयारी चांगली नव्हती. अनेक ठाण्यात परस्परांशी दळणवळण नव्हते. डोंगरी भागात, एवढ्या उंचीवरल्या थंड हवेत लढण्याची भारतीय सैनिकांना सवय नव्हती. आधुनिक शस्त्रास्त्रे नव्हती. अशा प्रतिकूल परिस्थितीतही भारतीय जवानांनी शत्रूशी मुकाबला केला.

नामका चू नदीच्या साक्षीने घडलेला चित्रभयंकर प्रसंग !

नामका चू नदीवरच्या पुलाची राखण करीत होता सौदागरसिंग. हा राजपुती जवान प्राणाची तमा बाळगणाऱ्या कुळीचा नव्हताच. पुलाची राखण म्हणजे त्याच्या दृष्टीने प्राणाची राखण !

२० ऑक्टोबरच्या सकाळी चिनी सैनिक तेथे अवतरले. थव्याथव्यांनी धडकू लागले. आपल्या ठाण्यावर तोफांचा भडिमार करू लागले.

सौदागरसिंग पुलावर सज्ज होता. शत्रू सैनिकांनी पुलावर चाल केली. सौदागरसिंगाने बंदुकीचा चाप ओढला. प्रत्येक गोळी चिनी सैनिक टिपू लागली.

पण चिनी संख्येने अफाट होते. टोळधाडीसारखेच ते आले होते. तीन तीनच्या पथकाने ते पुढे सरकत होते. चीनला माणसाच्या हत्येचे सोयर-सुतक नव्हते. मुंग्यासारखी माणसे ते मरायला पाठवीत होते. माणसाच्या प्राणाची कदर त्यांना मुळीच नव्हती.

सौदागरसिंगाने पहिल्या सपाट्यातच बारा चिन्यांचा बळी घेतला. पण एवढ्या वेळात सौदागरसिंगाचे दोन साथीदारही कामास आले होते. शत्रू त्वेषाने पुढे पुढेच येत होता.

एवढ्या चिनी सैनिकांशी एकटा सौदागरसिंग आता किती वेळ लढणार ! सौदागरसिंगाने चपळाई केली आणि तो पुलावरच्या एका खडकाआड झाला. खडकाच्या आश्रयाने त्याने पुन्हा आपली बंदुक सरसावली.

चिनी सैनिकांच्या तुकड्या येत राहिल्या. सौदागरसिंगाने पुन्हा काही बळी घेतले. शत्रू अगदी समोरच येऊन ठाकला. अवघ्या पाच-सात फुटांवर ! आणि दुर्दैवाने त्याच वेळी सौदागरसिंगाच्या बंदुकीतल्या गोळ्या संपल्या !

मृत्यू तर चुकत नव्हताच, पण मरतानाही शत्रूला मारण्याचे साधन निकामी झाले होते !

सौदागरसिंगाने क्षणार्धातच त्वेषाने एक हनुमान उडी मारली. खडका-मागून तो सरळ शत्रूच्या पुढे येऊन ठाकला. आणि धन्य त्या हिंमतबहादुराची.

डोळ्याचे पाते लवते न लवते इतक्या चपळाईने त्याने पुढच्या चिनी सैनिकांच्या पोटात आपल्या संगिनीचे टोक खुपसले आणि त्याच्या हाता-तली बंदूक हिसकावून घेतली. परत खडकाआड आला नि त्या बंदुकीने शत्रूवर गोळ्यांचा वर्षाव करू लागला. आणखी काही चिनी सैनिकांचा त्याने चिनी शस्त्रानेच बळी घेतला.

वरिष्ठ अधिकाऱ्याची आज्ञा मिळेतोपर्यंत सौदागरसिंग पूल सोडून हालला नाही. एकाकीच लढत राहिला आणि शेवटी आज्ञा मिळताच सर-पटत, लपत, खडक, टेकडी व झाडाझुडपांचा आश्रय घेत तो भारतीय तळावर सुखरूप पोचला.

बचनसिंगानेही असेच विलक्षण धैर्य प्रकट केले. उत्तर सरहद्दीवरच्या एका महत्त्वाच्या ठाण्यावर बचनसिंगाची नियुक्ती झालेली होती. ठाणे मोक्याचे होते. दूर अंतरावर होते.

एक दिवशी चिनी सैनिकांनी त्याच्या ठाण्यावर हल्ला चढवला. शत्रूच्या हाती हे ठाणे पडू नये म्हणून बचनसिंगाने व त्याच्या साथीदारांनी पराक्रमाची शर्थ केली. शत्रूवर गोळ्यांचा वर्षाव केला. अनेक शत्रूंचा बळी घेतला. पण शत्रूही लेचापेचा नव्हता. शस्त्रास्त्रांचा, माणसांचा आणि दारूगोळ्यांचा मोठा साठा त्याच्याजवळ होता.

बचनसिंग त्या बादली शत्रूशी गनिमी काव्याने लढू लागला. ठाण्या-भोवती खंदक खणलेला होता. बचनसिंग खंदकातून बंदुकीच्या फैरी शत्रूवर झाडीत होता. पण चिनी सैनिक आपल्या हाडामांसाच्या माणसांचे मुडदे तुडवून पुढेच येत होते.

आणि बघता बघता अवघ्या काही यार्डांवरच शत्रूसैनिक आले. बचन-सिंगाने न थांबता, न डगमगता बंदूक चालू ठेवली. पण त्याच्या लक्षात आले की शत्रूशी अशा तऱ्हेने मुकाबला करणे आता कठीण आहे. दुर्दै-वाने ठाण्यावरचा दारूगोळाही संपत आला होता. कुमक यायला थोडा

अवकाश होता. शत्रू तर एकसारखा पुढेपुढेच येत होता !

बचनसिंग बहादुर धीराचा खरा !

या वीराने क्षणभरच विचार केला. आणि मनाचा धडा करून त्याने खंदकाबाहेर उडी घेतली.

हातात शस्त्र नाही, अंगात त्राण नाही, पण मनाचा निर्धार पहाडासारखा कणखर होता !

चिनी सेना ठाणे काबीज करण्याच्या इराद्याने पुढे येत होती. तोच बचनसिंग खंदकातून दत्त म्हणून समोर उभा राहिला आणि तोंडाने लाखोली वाहात, हातवारे करीत चिनी सेनेवर तुटून पडला.

या अकस्मात घडलेल्या प्रसंगाने चिनी सैनिक घाबरले. त्यांना वाटले की भारतीय सैनिकांनी आपल्याला चोहोबाजूंनी वेढले ! आणि या समजुतीनेच हातातली शस्त्रे टाकून चिनी सैनिक भेदरून पळाले. मधल्या काळात आपल्या जवानांनी दारुगोळ्याची पुनः जमवाजमव केली. ठाणे राखण्याची सिद्धता केली.

भिमू कांबळ्याचा भीमपराक्रम देखील असाच ! थक्क करणारा !

काराकोरम खिंडीजवळील महत्त्वाचे भारतीय ठाणे म्हणजे दौलत बेग ओलदी. या ठाण्यापासून काही अंतरावरच चिनी सैन्याची मोठी जमवाजमव चालल्याची बातमी लष्करी अधिकाऱ्यांना समजली. त्यांनी तावडतोब महार रेजिमेंटचा जमादार वीर भिमू कांबळे याला आपली तुकडी तेथे नेण्याचा हुकूम दिला.

भिमू आपली तुकडी घेऊन खिंडीजवळच्या ठाण्यावर हजर झाला.

२२ ऑक्टोबर १९६२ चा तो दिवस. थंडी मी म्हणत होती. गारठ्याने हातपाय बधीर होत होते. पण जिंकू किंवा मरू या निर्धाराने भिमू आणि त्याचे जवान १६५०० फूट उंचीवर जाऊन पोचले. आणि गेल्याबरोबर, क्षणाचीही उसंत न घेता, त्यांनी खंदक खणायला सुरुवात केली.

सकाळपासून संध्याकाळपर्यंत खपून खंदक खणण्याचे काम पुरे करीत आणले होते. आता मशीनगन्स रोवल्या की शत्रूशी दोन हात करायला सारे जवान तयार होणार होते. पण रात्री आठ वाजण्याच्या सुमाराला भिमूला दुसरा तातडीचा हुकूम मिळाला—' शत्रूची कुमक फार मोठी आहे. आपला निभाव लागणार नाही, तेव्हा भारी शस्त्रास्त्रे निकामी करून ताबडतोब माघार घ्यावी ! '

दिवसभराचे सगळे श्रम वाया गेले होते. हुकूम मानणे भागच होते. पण भारी शस्त्रास्त्रांचा, आपल्याच हातांनी, नाश करण्यास मात्र भीमूचे मन तयार नव्हते. शत्रूच्या हाती आपली शस्त्रे पडू नयेत हाच ती निकामी करण्यातला उद्देश असतो. भिमूने ठरवले, शस्त्रे निकामी करायची नाहीत किंवा ती शत्रूच्या हातीही लागू द्यायची नाहीत ! त्याने व त्याच्या तुकडीतील जवानांनी ती जडशीळ शस्त्रे स्वतः वाहून नेण्याचे ठरवले. आणि ते निधडे वीर निघाले तडक मशीनगन्स बरोबर घेऊन !

थंडीचा कडाका, रस्ता धड नाही, याच वाटेवर हिमालयातील अनेक मोठ्या खिंडी लागतात. तशात नव्वद मैलांची चाल आणि बरोबर हे एवढे ओझे ! पण जिद्दीचे जवान हिंमतीने चालत होते.

चालता चालता चार एक मैल ते पोचले असतील नसतील तोच भिमूच्या लक्षात आले की, गडबडीत निघताना काही मशीनगन्स मागेच राहिल्या. आहेत. क्षणाचाही विचार न करता भिमु आपल्या सहकाऱ्यांना घेऊन तशा थंडीत परत फिरला. नशीब असे की अद्यापी शत्रू तिथवर पोचला नव्हता.

भिमू त्या मशीनगन्स घेऊन परत आला. या खडतर प्रवासात या तुकडीला अत्यंत हालात दिवस काढावे लागले. चार दिवसपर्यंत तर अन्नच त्यांना दिसले नव्हते. रात्रीच्या रात्री भयंकर गारठ्यात केवळ एका जाकिटावर त्यांना काढाव्या लागल्या. आणि ९० पौंड वजनाची एकेक मशीनगन जवळ !

चौथ्या दिवशी भारतीय हवाई दलाच्या हेलिकॉप्टरने काही बिस्किटे आणि घोंगड्या मात्र त्यांच्यासाठी टाकल्या. तुकडीतले दोन जवान आजारी झाले होते. हेलिकॉप्टरने त्यांना उचलून घेतले. इस्पितळात पोचवले.

पाच दिवसांच्या वाटचालीनंतर भिमू आपल्या ठाण्यावर पोचला. त्यांना पाहून लष्करी अधिकारी उद्गारला, "दौलत बेग ओलदी येथे गेलेली आमची तुकडी सुखरूप परत येईल, अशी माझी कल्पनाच नव्हती. आणि आली तरी मशीनगन्स चांगल्या स्थितीत हाती परत येतील असे तर मुळीच वाटले नव्हते. कारण इतकी जडशीळ शस्त्रे अशा उंच-सखल प्रदेशातून फक्त खेचरावरूनच वाहून नेतात, माणसांनी नाही. पण भिमू कांबळे आणि त्याच्या शूर जवानांनी हा एक भीम-पराक्रमच केलेला आहे!'

अशा पराक्रमाच्या, शौर्याच्या किती कथा सांगाव्या! टॉगपॉगनजीक सरहद्द सांभाळणारा सुभेदार जोगिंदरसिंग, नेफातील धोला ठाण्यावर शत्रू-सैन्याला चकवणारे मेजर श्रीनिवास कुलकर्णी, सेला खिंड लढवणारे मेजर नायर, चुशूलचा वीर शैतानसिंग, वालाँग भागात लोहित नदीच्या काठी लढणारा केवलसिंग, किबितु ठाण्यावरचा बचीसिंग, पाँगाँग लेक, मेसामारी, लडाख आदी भागात शत्रूशी मुकाबला देणाऱ्या भारतीय वीरांनी शौर्याची गाथा रचली!

चिनी आक्रमणाने सारा देश ढवळून निघाला. देशाचे स्वातंत्र्य रक्षण करण्यासाठी एकजुटीने उभा राहिला. अकस्मात एक नवे तेज, नवे चैतन्य देशात संचरले.

**उत्तुंग आमची उत्तर सीमा इंच इंच चढवू।**
**अभिमान धरू, बलिदान करू, ध्वज उंच उंच लढवू॥**
**परक्यांचा येता हल्ला**
**प्रत्येक घर बने किल्ला**

हे कोटि कोटि भुजदंड
होतील इथे ध्वजदंड
छातीची करूनी ढाल, लाल या संगिनीस भिडवू ॥

हे कवी वसंत बापटांचे गीत महाराष्ट्रात घरोघरी गेले. कवी ग. दि. माडगूळकरांच्या

जिंकू किंवा मरू
माणुसकीच्या शत्रूसंगे युद्ध आमुचे सुरू
लढती सैनिक, लढू नागरिक
लढतील महिला, लढतील बालक
शर्थ लढ्याची करू
जिंकू किंवा मरू

ह्या गीताने लक्षावधी तरुणांना जोष दिला.

बर्फाचे तट पेटुनी उठले सदन शिवाचे कोसळते।
रक्त आपुल्या प्रिय आईचे शुभ्र हिमावर ओघळते॥

कवी कुसुमाग्रजांच्या ह्या गीताने देशभक्तीची ज्वाला प्रत्येकाच्या अंतःकरणात धगधगू लागली.

अशा सर्व भारतीय भाषांत समरगीते प्रांतोप्रांती गरजू लागली. युद्धसाहाय्यासाठी निधीचा ओघ लागला. बालकांनी खाऊतले पैसे दिले तर सुवासिनींनी अलंकार उतरून दिले. जवानांसाठी गरम कपडे, ब्लँकेटस्, बिस्किटे, पुस्तके इत्यादी उपयुक्त वस्तूंचे ढीग लागले. रक्तदानासाठी नागरिकांच्या रांगा लागल्या. अवघ्या भारतात एक अपूर्व दृश्य दिसले! भारताची एकता प्रकट झाली.

१४ नोव्हेंबर १९६२ रोजी भारतीय लोकसभेने ठराव केला—'परिपूर्ण श्रद्धेने आणि आशेने हे सभागृह भारतीय जनतेचा आक्रमणाला

हुसकून लावण्याचा निर्धार व्यक्त करीत आहे—मग हा लढा कितीही दीर्घ व कठीण ठरो.'

ज्या दिवशी हा ठराव झाला. त्या दिवशीच भारत व अमेरिका यांच्यात अमेरिकन शस्त्रास्त्रे भारताला मदत म्हणून घेण्याच्या करारावर सह्या झाल्या.

युद्धकाळात संरक्षणमंत्री श्री. कृष्णमेनन यांच्या कारकीर्दीविषयी खूपच असंतोष देशात माजला होता. म्हणून श्री. कृष्णमेनन यांनी राजीनामा दिला. तो स्वीकारून संरक्षणमंत्री म्हणून श्री. यशवंतराव चव्हाण यांची २१ नोव्हेंबर १९६२ रोजी नियुक्ती करण्यात आली. श्री. यशवंतराव चव्हाण हे संरक्षण मंत्री बनले, आणि २१ नोव्हेंबर १९६२ रोजीच चीनने एकतर्फी युद्धबंदी जाहीर केली. ३३ दिवस चाललेले हे युद्ध संपले. या युद्धात भारतीय जवान प्रतिकूल परिस्थितीत प्राणपणाने लढले, देशाने अपूर्व एकता दाखवली, चीनचे अन्यायी आक्रमण जगासमोर आले हे जरी खरे असले तरी भारताची बरीच हानी झाली. ३,००० चौ. मैलांचा प्रदेश चीनने बळकावला, भारताला माघार घ्यावी लागली हेही खरेच आणि पं. जवाहरलाल नेहरू या आक्रमणाने मानसिक व शारीरिकदृष्ट्याही खचले. ही मोठीच हानी झाली. भारताला पाकिस्तानप्रमाणे चीन हा एक शेजारी शत्रू होऊन बसला.

☆ ☆ ☆

# नेहरू पर्व संपले

१९६३ साल उजाडले. चीनच्या आक्रमणाने मने खट्टू झालेली होती. द्रव्यहानीही बरीच झालेली होती. परंतु युद्धकाळातही विकासाची कामे बंद पडलेली नव्हती. आणीबाणीचा परिणाम म्हणून त्यात मंदपणा आला असेल पण ती बाजूला सारली गेली नाहीत.

७ जानेवारी १९६३ रोजी उत्तर प्रदेशातील रिहांद धरणाचे उद्घाटन पं. नेहरूंनी केले. याच वर्षी आक्टोबरमध्ये भाक्रा धरणही बांधून पूर्ण झाले. नोव्हेंबरमध्ये थुंबा येथून दोन टप्प्यांचा पहिला भारतीय अग्निबाण अंतराळात सोडण्यात आला.

या वर्षाच्या सुरुवातीला २ फेब्रुवारी १९६३ रोजी डॉ. राजेंद्रप्रसाद यांचे पाटणा येथे दुःखद निधन झाले. डॉ. राजेंद्रप्रसाद केवळ भारताचे पहिले राष्ट्रपती होते, असे नव्हे, तर आपल्या जीवनभर ते पहिलेच होते. शिक्षण, चारित्र्य, देशसेवा, सौजन्य आदी सर्व बाबतीत ते पहिले होते. त्यांच्या निधनाने आणखी एक जुना दुवा निखळला.

यावर्षी ऑगस्टमध्ये पं. नेहरूंनी काँग्रेस संघटनेत एक बदल घडवून आणला. काही ज्येष्ठ नेते बरीच वर्षे मंत्री म्हणून सत्तेवर होते. सत्तेच्या प्रलोभनामुळे संघटनेकडे दुर्लक्ष होत होते. याचा परिणाम काँग्रेस जनतेत अप्रिय होत चालली होती. आणि जनतेपासून ती दुरावतही होती. म्हणून त्या वेळचे काँग्रेस अध्यक्ष श्री. कामराज यांनी काँग्रेसमध्ये नेहरूंच्या प्रेरणेने एक योजना मांडली. हीच पुढे 'कामराज योजना' म्हणून प्रसिद्ध झाली. काही ज्येष्ठ मंत्र्यांनी सत्तास्थाने सोडून संघटनेच्या कामात लक्ष घालावे व ती सुदृढ करावी अशी ही योजना होती. या योजनेनुसार श्री. मुरारजी देसाई, स. का. पाटील, लालबहादुर शास्त्री आदी सहा केंद्रीय मंत्री आणि सहा राज्यांचे मुख्यमंत्री यांनी राजीनामे दिले. नेहरूंनी आपल्या मंत्रिमंडळाची पुनर्रचना केली.

१९६४ साल उजाडले ते चिंता घेऊनच. जानेवारीतच काँग्रेसचे अधिवेशन भुवनेश्वर येथे झाले. आणि पं. जवाहरलाल नेहरू या ठिकाणी आजारी पडले. पंडितजी म्हणजे काँग्रेसची उत्सवमूर्ती. त्यांना पाहायला, ऐकायला लक्षावधी लोक जमले होते. आजवर नेहरूंनी आपल्यावर जीवा-पाड प्रेम करणाऱ्या जनतेच्या अपेक्षा जाणल्या होत्या. त्या पूर्ण करण्याचा प्रयत्नही त्यांनी सतत केला होता. ते लोकांत गेले, लोकांत मिसळले, लोकांच्या सुखदुःखाशी समरस झाले, लोकांचेच बनले! चंद्रबिंब पाहून जसे समुद्राला उधाण येते, तसेच नेहरूंना पाहून लोकसागराला भरती येई. आणि नेहरूही लोकांना पाहून खुलून जात असत. आनंदून जात असत.

पण भुवनेश्वरला लोकांचे लाडके जवाहरलाल एकाएकी आजारी पडले. डॉक्टरांनी त्यांच्या हालचालींवर बंदी घातली. सक्तीची विश्रांती घ्याव-यास लावली.

विजेप्रमाणे सदैव सळसळणारे नेहरूंचे तळपते, सुगंधी व्यक्तिमत्त्व,

आजाराने कोमेजले. मनाने ते चिरतरुण होते, पण शरीर चवऱ्याहत्तर वर्षांचे झाले होते.

अनेक वेळा कारावास, उन्हातान्हातून देशव्यापी दौरे, राजकारणातील गुंतागुंतीच्या कटकटी, स्वातंत्र्याचे संरक्षण, देशाच्या नवनिर्माणाची चिंता, विश्वशांतीचा ध्यास, अशा अनेकपरींच्या श्रमाने शरीर थकणे स्वाभाविकच होते. तरी नेहरूंनी आपल्या शरीराला नियमित आहार-विहाराने सदोदित ताजेतवाने राखले होते, हे खरे. पण भुवनेश्वरला त्यांच्या शरीराने हट्टीपणा केला. नेहरूंना अंथरुण धरावे लागले.

भुवनेश्वरहून दिल्लीला परतल्यावर, देशाची अहोरात्र चिंता वाहणाऱ्या नेहरूंनी आपल्या विश्वासातील लालबहादुरजींना बोलावणे पाठवले. शास्त्रीजींचा नि नेहरू कुटुंबांचा जुना ऋणानुबंध होता. शास्त्रीजी आले. नेहरू त्यांना म्हणाले, "माझ्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणून परत या!"

कामराज योजनेनुसार शास्त्रीजींनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. पण नेहरूंच्या इच्छेनुसार ते परत मंत्रिमंडळात आले. त्यांनी नेहरूंना एवढेच विचारले, "कोणते काम करू?"

नेहरू म्हणाले, "माझे काम करा!"

आणि बिनखात्याचे मंत्री म्हणून लालबहादुर शास्त्रींचा शपथविधी झाला. नेहरूंच्या गैरहजेरीत लालबहादुर शास्त्री त्यांचे काम पाहू लागले.

त्या काळात "नेहरूनंतर कोण?" असा एक चर्चेचा प्रश्न झालेला होता. पत्रकार, राजकारणी, मुत्सद्दी आपआपल्या परींनी विचार व्यक्त करीत होते. लोकांतही एक प्रकारचे कुतूहल निर्माण झाले होते. काही लोक तर्कवितर्क लढवीत होते. पं. नेहरूंनी शास्त्रीजींना 'माझे काम करा!' असे सांगून 'नेहरूनंतर कोण?' या प्रश्नाचेही जणू उत्तर दिले होते!

जानेवारीत, नेहरूंच्या आजारीपणामुळे घडलेल्या ह्या घटनेची पुढे अवघ्या पाच महिन्यांतच पुनरावृत्ती घडली.

दिल्लीला आल्यानंतर नेहरू काहीसे बरे झाले. हिंडू फिरू लागले. थकलेल्या शरीराने काम करू लागले. जुलैमध्ये लंडनला कॉमनवेल्थ परिषदेला जाण्याच्या तयारीत ते होते. बरोबर लालबहादुर शास्त्रींना घेऊन जाणार होते. जूनमध्ये काश्मीरसंबंधी पाकिस्तानशी वाटाघाटी करणार होते. पण नियती वेगळीच होती !

मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात प्रकृती पुनः बिघडली. डॉक्टरांच्या सल्ल्यावरून ते दोन तीन दिवस विश्रांतीसाठी डेहराडूनला गेले. २६ मे रोजी दिल्लीला परतले, ते थोडे ताजेतवाने होऊनच. परतल्यावर त्यांनी आपल्या कामाच्या फायलीही पाहिल्या.

पण २७ मे १९६४ हा दिवस उजाडला तोच अशुभ पोटी घेऊन. पाठीत दुखण्याच्या निमित्ताने सकाळी ६ वाजताच जवाहरलालजींची शुद्ध हरपली ती कायमचीच. वैद्यकीय उपचार करण्यात आले, पण काळाने मात केली !

दुपारी २ वाजता भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी या जगाचा निरोप घेतला.

अवघे जग शोकाकुल झाले. भारताचा राष्ट्रपुरुष हरपला. शांतीचा उद्‌गाता मावळला. मानवतेचा आधार उन्मळून पडला. एका चैतन्यशाली युगाचा अस्त झाला.

विनोबाजी म्हणाले, " पंडितजी राष्ट्रनेता होते आणि लोकनेता होते. असे दोन्ही प्रकारचे नेतृत्व एका माणसात एकत्र झालेले क्वचित पहायला सापडते. ते एका बाजूने राष्ट्रपुरुष होते, तर दुसऱ्या बाजूने विश्वमानव होते. आमच्या राष्ट्राचे हित आणि सबंध विश्वाचे हित एकच आहे. दोहोंचा विरोध असूच शकत नाही, असा त्यांचा विश्वास होता आणि या विश्वासावर ते काम करीत होते. आता हे काम आपल्याला पुढे चालवावयाचे आहे. ' पुढे गेले त्यांचा शोधीत मारग। चला जाऊ माग घेत त्यांचा ॥ '

“उपनिषदात म्हटले आहे : ‘मातृदेवो भव। पितृदेवो भव। आचार्य देवो भव।’ त्या भाषेत बोलायचे तर पंडितजी ‘लोकदेव’ होते. लोकच त्यांचा देव होता आणि लोकांना पाहून त्यांचे हृदय उचंबळून येत असे. असा मनुष्य देह सोडून गेला तर कुठे जाईल? तो ‘लोकात्मा’ होईल!”

जवाहरलालजी खरोखरच लोकात्मा होते. ‘मी लोकांकडे गेलो आणि लोक माझ्यामागून आले’ असे त्यांनीच म्हटले होते.

जवाहरलालजींचे सारे जीवनच अलौकिक! आयुष्यभर ते या देशात आणि लोकांशी एकरूप होऊन राहिलेच. पण मृत्यूनंतरही भारताच्या कणाकणाशी एकरूप होऊन जाण्याची भव्य दिव्य मनीषा त्यांनी बाळगली होती. १९६४ साली त्यांनी लिहून ठेवलेले मृत्युपत्र म्हणजे त्यांच्या उत्कट देशप्रीतीचे व रसिक-काव्यात्मतेचे प्रतीक आहे!

“.... माझ्या सर्व मनीषांचा व भावभावनांचा गंगा ही साक्षीदार आहे. तिच्यात विसर्जित केलेली माझी रक्षा म्हणजे भारताच्या सांस्कृतिक परंपरेला माझा अखेरचा प्रणिपात होय.

....मात्र मूठभर रक्षेचे गंगेत विसर्जन केल्यावर जी राख उरेल, ती विमानातून उंच आकाशात न्यावी आणि तिथून ती भारतभूमीवर विखरून टाकावी. तिथल्या मातीशी, धुळीशी ती एकजीव व्हावी. भारताच्या भूमीचाच तो एक अंश बनावा हीच माझी अखेरची इच्छा आहे....”

नेहरू आणि भारत यांचे नाते इतिहासात अजोड म्हणून राहील.

☆ ☆ ☆

## दुसरे पंतप्रधान

पं. जवाहरलालजी गेले आणि देश पोरका झाला. हंगामी पंतप्रधान म्हणून २७ मे १९६४ रोजीच गुलझारीलाल नंदा यांचा शपथविधी झाला. पंतप्रधानपदाची मानाची जागा आपल्यालाच मिळावी अशी इच्छा बाळगणारे राजकारणी लोक काँग्रेस संघटनेत होतेच. त्यांच्या त्या दृष्टीने कारवायाही चालू झाल्या. भारत देशाचा पंतप्रधान कोण होणार याकडे देशाचेच नव्हे, तर साऱ्या जगाचे लक्ष वेधून राहिले. नेहरूंची जागा घेणारे दिव्य भव्य व्यक्तित्त्व समोर नव्हते. तेवढी लोकप्रियता किंवा जनमानसावर प्रभावही नव्हता. पण संकटातून मार्ग काढणेही आवश्यकच होते. दिल्लीत अनेक खलबते झाली, अनेक युक्तिवाद झाले आणि अखेरीस सर्वांनुमते लालबहादुर शास्त्री हेच भारताचे दुसरे पंतप्रधान म्हणून निवडले गेले. " माझे काम करा ! " असे नेहरूच त्यांना शेवटच्या आजारात म्हणाले होते.

लालबहादुर शास्त्री उत्तर प्रदेशातले. २ ऑक्टोबर १९०४

ला मोगलसराई येथे त्यांचा जन्म झाला. रामनगर येथे बालपण गेले. हे गाव काशीजवळून वाहणाऱ्या गंगा नदीच्या पैलतीरावरच आहे. काशी क्षेत्राचे पवित्र सान्निध्य आणि गंगेचा निर्मळपणा शास्त्रीजींना जन्मल्यापासूनच अनुभवायला मिळाला. सद्‌विचारांचे व सत्कर्मांचे संस्कार या वातावरणातून आपोआपच त्यांच्यावर घडले. वाराणसीलाच काशी विद्यापीठात त्यांचे शिक्षण झाले. शिक्षण घेत असतानाच १९२० साली गांधीजींच्या हाकेने त्यांनी असहकारितेच्या आंदोलनात उडी घेतली. १९२१ साली कारावासातून सुटल्यावर परत शिक्षण सुरू केले. १९२५ साली पहिल्या श्रेणीत ते 'शास्त्री' होऊन बाहेर पडले. 'शास्त्री' ही त्या विद्यापीठाची सन्मानदर्शक पदवी आहे.

तसे लालबहादुरांचे खरे आडनाव 'श्रीवास्तव' होते. पण लोक व देश त्यांना पदवीवरूनच ओळखू लागला. पदवीने आडनावाची जागा घ्यावी असे 'शास्त्रीपण' लालबहादुरांच्या ठायी निश्चितच होते.

विद्यार्थीदशेपासूनच लालबहादुरजी राजकीय आंदोलनाकडे आकर्षित झालेले होते. पं. जवाहरलाल नेहरूंचे तरुण, तडफदार आणि आकर्षित करणारे नेतृत्व उदय पावत होते. लालबहादूर जवाहरलालजींच्या सान्निध्यात आले आणि त्यांचेच झाले. काँग्रेसचे अध्यक्ष झाल्यावर नेहरूंनी त्यांना काँग्रेसच्या कामासाठीच अलाहाबादला नेले, नेहरूंचे अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून ते ओळखले जाऊ लागले. नेहरूंच्या कुटुंबियांपैकीच ते एक झाले. स्वातंत्र्यापूर्वी आणि नंतरही उत्तर प्रदेशाच्या विधिमंडळावर ते निवडून गेले होते. १९५२ मध्ये ते राज्यसभेचे सदस्य झाले आणि त्याच वर्षी मध्यवर्ती वाहतुक व रेल्वे खात्याचे मंत्री म्हणून त्यांची नेहरूंनी नियुक्ती केली. १९५६ साली अरियालूर येथे रेल्वे अपघात होऊन त्यात १५० लोक ठार झाले. या अपघाताची घटनात्मक जबाबदारी आपलीच आहे असे मानून शास्त्रीजींनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि

लोकशाहीला उपकारक आदर्शवत असा एक चांगला पायंडा पाडला. लोकसभेने व भारताने त्यांचे कौतुक केले. या प्रसंगी लोकसभेत भाषण करताना पं. नेहरू म्हणाले, " या अपघातास श्री. शास्त्री हे कुठल्याही प्रकारे जबाबदार आहेत म्हणून नव्हे, तर ते घटनेचे माहात्म्य आणि पावित्र्य दाखवण्याचा आदर्श घालून देत आहेत म्हणून मी त्यांचा राजीनामा स्वीकारीत आहे. "

१९५७ साली शास्त्रीजी पुन्हा लोकसभेवर निवडून आले. त्यांची मध्यवर्ती वाहतुक व दळणवळणखात्याचे मंत्री म्हणून प्रथम नियुक्ती झाली. नंतर १९५८ मध्ये ते व्यापार व उद्योगमंत्री बनले. या खात्याचे मंत्री असतानाच त्यांनी शेती व उद्योगधंदे यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला.

पंडित गोविंद वल्लभ पंत यांच्या निधनानंतर १९६१ सालच्या एप्रिलमध्ये शास्त्रीजी भारताचे गृहमंत्री झाले. गृहमंत्री या नात्याने त्यांनी मोठमोठ्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. आसाममधील भाषिक दंगल मिटवून आसामी व बंगाली लोकांत सलोखा निर्माण केला. १९६३ साली नेपाळचा सदिच्छा दौरा केला. काही गैरसमजामुळे दुरावलेले भारत-नेपाळ-संबंध शास्त्रीजींनी परत मैत्रीचे केले. १९६३ साली कामराज योजनेनुसार त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला व कॉंग्रेस संघटनेच्या कामाला वाहून घेतले. २४ जानेवारी १९६४ रोजी नेहरूंच्या सांगण्यावरून ते परत बिनखात्याचे मंत्री झाले, हे कार्य करीत असतानाच त्यांनी काश्मीरमध्ये उद्‌भवलेले ' हजरत बाल ' प्रकरण अत्यंत कौशल्याने हाताळले व शांततेने मिटवले.

९ जून १९६४ रोजी भारताचे पंतप्रधान म्हणून त्यांची निवड झाली, तेव्हा भारतीय लोकशाहीचा, श्रेष्ठ परंपरेचा, शांतीमय मार्गाचा आणि

नेहरूनिष्ठेचा हा विजय होता. साऱ्या जगाला या निवडीने आनंद झाला. भारताच्या पंतप्रधानपदी निवड होताच शास्त्रीजी पवनारच्या आश्रमात असलेल्या विनोबांच्या दर्शनासाठी व आशीर्वादासाठी वर्ध्यास तात्काळ गेले. यातही त्यांची थोरवी व ऋषीमुनींना श्रेष्ठत्व देण्याची भारतीय परंपरा दिसून येते.

☆ ☆ ☆

# भारत–पाक युद्ध

पाकिस्तान जन्माला आले तेच मुळी भारताशी कुरापत काढून. 'सारे जहाँसे अच्छा, हिंदोस्ताँ हमारा' असे म्हणणाऱ्यांनीच द्विराष्ट्रवादाचा पुरस्कार करून वेगळी चूल मांडण्याचा घाट घातला. पाकिस्तान झाले पण भारतामागच्या कटकटी मिटल्या नाहीत. जन्मापासूनच पाकिस्तानने भारताशी या ना त्या कारणावरून सतत खुसपटी काढणे चालूच ठेवले आहे. सरहद्दीवरच्या एखाद्या भारतीय खेड्यात घुसायचे नि गुरे पळवायची, शेतीची नुकसानी करायची, गोळीबार करायचा, भारतीय हद्दीवरून विमान न्यायचे— एक ना अनेक प्रकाराने पाकचे त्रास देणे चालूच होते, आजही चालूच आहे. १९६५ सालात जुलैपर्यंत – म्हणजे अवघ्या सात महिन्यांतच अशी लहान मोठी १८०० आक्रमणे पाकने केली होती. तत्पूर्वी केलेली हजारो आक्रमणे वेगळीच. दर वेळी भारताने निषेध करून, समजूत घालण्याच्या भावनेने पाकची आगळीक पोटात घातली. पण वाह्यात पोराप्रमाणे पाकचा व्रात्यपणा चालूच राहिला आहे.

१९६५ साली ९ एप्रिल रोजी पहाटेच्या वेळीच पाकने भारताच्या कच्छभूमीवर आक्रमण केले. तोफा धडाडू लागल्या. रणगाडे फिरू लागले. कच्छ हे स्वातंत्र्यापूर्वी एक संस्थान होते. आता गुजराथचा कच्छ हा एक जिल्हा आहे. बराचसा मुलुख रेताड, दलदलीचा आहे. सीमेवर पोचण्यास ९० मैल वाळवंट तुडवावे लागते. रस्ते नाहीत, पिण्याचे पाणी नाही. पाकला सिंधच्या सीमेपासून कच्छची हद्द जवळच आहे. पाकने तिकडे रस्ते बांधले आहेत. भारताने कच्छच्या रणातील ३५,००० चौ. मैलांचा टापू बळकावला आहे ही पाकची तक्रार. चीन काय किंवा पाकिस्तान काय शेजाऱ्याच्या हद्दीत घुसून आक्रमण करायचे आणि शेजाऱ्यानेच आमचा मुलुख वळकावला आहे, अशी उलटी ओरड करायची, असा त्यांचा कावा आहे.

वास्तविक फाळणीच्यावेळी सरहद्दी ठरल्या. कच्छच्या रणातील सरहद्दीवर खुणेचे दगडी खांब रोवले होते. पण पाकने ते उखडून टाकले. भलेपणाशी जणू वावडेच !

एप्रिलच्या आक्रमणापूर्वीच पाकने भारताचे डिग नामक ठाणे बळकावले होते. ९ एप्रिलला सरदार नामक ठाणे ताब्यात घेतले. या आक्रमणाचा प्रतिकार भारताने त्वरित केला. सरदार ठाणे परत जिंकून घेतले. विगोकोट, कांजरकोट, छाडवेट येथे धुमश्चक्री झाली. पाकचे बरेच सैनिक कामास आले. लढाई चालूच होती. तोवर पावसाळा आला. कच्छच्या रणात समुद्राचे पाणी शिरू लागले. लढाई चालू ठेवणे शक्यच नव्हते. ३० जून १९६५ रोजी ब्रिटिश पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सन यांच्या मध्यस्थीने औपचारिक युद्धबंदी झाली आणि हा वादग्रस्त प्रश्न सोडवण्यासाठी स्वीडन, युगोस्लाव्हिया व इराण या तीन सदस्यांचे लवाद मंडळ नेमण्यात आले. लवादाचा निर्णय मान्य करण्याचे भारताने आश्वासन दिले. या लवाद मंडळाने ९०० पृष्ठांचा विस्तृत अहवाल १९ फेब्रुवारी १९६८ ला प्रसिद्ध केला. ३५०० चौरस मैलांवर पाकिस्तानने आपला हक्क असल्याचा जो दावा केला होता

तो लवाद मंडळाने फेटाळून लावला आणि ३५० चौ. मैलांवरील पाकचा हक्क मान्य केला. भारतातील सर्व राजकीय विरोधी पक्षांनी लवाद मंडळाचा हा निर्णय निःपक्षपाती नसून राजकीय आहे असे जाहीर केले आणि हा भाग पाकिस्तानला देण्याच्या भारताच्या कृतीविरुद्ध 'चलो कांजरकोट' अशी घोषणा देऊन सत्याग्रह पुकारला. प्रजासमाजवादी, संयुक्त समाजवादी, जनसंघ आदी पक्षांच्या सत्याग्रहींना अटक करून तुरुंगात टाकण्यात आले.

कच्छ प्रकरणावर युद्धबंदी झाली, पण युद्धखोर पाकिस्तानने ५ ऑगस्ट १९६५ रोजी म्हणजे महिन्याभरानेच काश्मीर खोऱ्यात मोठे आक्रमण केले.

काश्मीर म्हणजे भारताचे नंदनवन. निसर्गाचे अपूर्व लावण्य या भूमीला लाभले आहे. पूंच हा याच लावण्यभूमीतला एक जिल्हा आणि मेंघार हा या जिल्ह्यातीलच एक लहानसा गाव. काश्मीरी लावण्याने नटलेला आणि भोळ्याभाबड्या माणसांनी वसती केलेला. पोटासाठी शेतीभाती करावी, कलाकुसरीचा हस्तोद्योग करावा, अल्लाचा दुवा मागावा आणि बंधुभावाने, गुण्यागोविंदाने गावात गुजराण करावी असा नित्यक्रम.

वझीर महंमद असाच एक भोळाभाबडा, सरळ मनाचा शेतकरी. आपल्या शेतात कष्ट करावेत आणि आपली भाकरी मिळवावी, आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करावे, अशा तऱ्हेचे कष्टाळू, प्रामाणिक जीवन जगणारा तो. त्याचे आपल्या कुटुंबावर जसे प्रेम, तसेच आपल्या जमिनीवरही, आणि आपल्या गावावरही. काश्मीरच्या भूमीचा वझीरला अभिमान वाटे. तो आपल्या मुलुखावर प्यार करी.

आणि म्हणूनच एके दिवशी तो चांगलाच चरकला. मनातून किंचित हदरलाही.

गोष्ट वरवर पाहता साधीच होती. पण भोळ्या वझीरच्या मनाने तिचे गांभीर्य चटकन हेरले. पुरते जाणले.

झाले होते असे की त्या दिवशी संध्याकाळी वझीर शेतातून काम

आटोपून घरी परत येत होता. दिवसभराच्या कष्टाने थकला होता, पण घराच्या ओढीने तो चालला होता. घरच्या मुलाबाळांत बसून हुक्का पिण्यासाठी, त्यांच्याशी चार गोष्टी मजेने बोलण्यासाठी तो उत्सुक होता. गावाच्या दिशेने भरभर पाय उचलीत होता. रोजचीच पायाखालची वाट. तीच जमीन, तीच शेती, तेच आभाळ, तीच झाडे, तेच डोंगर, तेच ओहोळ. पण याखेरीज त्या दिवशी वझीरला काही नवीन, अनोळखी दिसले. काही माणसंच होती ती, पण वझीरच्या गावातली नव्हती. शेजारपाजारच्या गावांतलीही नव्हती. वझीरने त्यांना कधी पूर्वी पाहिलेच नव्हते. आणि त्या अनोळखी माणसांच्या हालचालीही काही वेगळ्याच तऱ्हेने चाललेल्या वझीरने पाहिल्या. ती माणसे आपसांत काही कुजबुजत होती. खाणाखुणा करीत होती. काही तरी न्याहाळीत होती. कसला तरी बेत आखीत होती.

वझीरच्या मनाने घेतले, ही माणसे काही साधीसुधी नव्हेत. यांच्यापासून काही तरी दगाफटका आहे खास. गावाला धोका आहे हे निश्चित ! आणि वझीरचा हा तर्क खराही ठरला. त्याने थोडे आडबाजूला होऊन न्याहाळून पाहिले. तेव्हा त्याला आढळून आले की, या नवीन आलेल्या माणसांजवळ शस्त्रास्त्रेही आहेत व दारूगोळाही आहे. सुरुंग पेरण्यासाठीच ते जागा पाहात आहेत.

" या अल्ला ! " वझीर मनात पुटपुटला, " म्हणजे हे हैवान गावाला लुटायला आले आहेत तर ! प्याऱ्या काश्मीरवर मागच्यासारखा हल्ला करण्याचा तर यांचा डाव नसेल ! "

टोळीवाल्यांनी आणि पाकिस्तान्यांनी १८ वर्षांपूर्वी आपल्या प्रिय काश्मीरवर केलेल्या दुष्ट हल्ल्याची याद वझीर अद्याप विसरलेला नव्हता. त्या घातकी हल्ल्याची आठवण येताच वझीरचे रक्त आज अठरा वर्षांनीही उसळून उठले. कानशिले गरम झाली. डोळ्यात इंगळ फुलले. तो आड-

बाजूला होता, तो सरळ पुढे झाला आणि त्या अनोळखी माणसांना हटकलेही.

त्याच्या हटकण्याने ती माणसेही थोडी चपापली. गांगरली. पण वझीरला आता गप्प करणे त्यांना भागच होते. वझीरशी त्यांनी गोडगोड बोलण्यास सुरुवात केली. वझीरच्याही लक्षात येऊन चुकले होते की, आपण एकटे आहोत. अंधार पडायला थोडाच अवकाश आहे. शिवाय या अनोळखी माणसांजवळ शस्त्रास्त्रेही आहेत. वझीरने त्यांचे बोलणे ऐकून घेतले. आपण गरीब भाबडे आहोत असा बहाणा केला. अनोळखी माणसांच्या बोलण्यामधून हळूहळू त्याच्या लक्षात आले की, गावाजवळच्या जंगलात हल्लेखोर दबा धरून बसले आहेत; आणि काश्मीरवर हल्ला करण्याचा त्यांचा मनसुबा आहे. आणि या बेतात सामील करून घेण्यासाठी त्यांनी वझीरच्याही तोंडाला मधाचे बोट लावण्यास कमी केले नाही. वझीर सामील झाला तर त्यांना हवेच होते. कारण स्थानिक माहितगार माणसांकडून सर्व काही कळू शकते. वझीरला त्या अनोळखी माणसांनी आता वेढलेच होते. वझीर एकटाच होता. तो सामील झाला तर ठीकच—नाही. तर वझीरला जिवंत सोडणेही त्यांच्या दृष्टीने आता धोक्याचे ठरले असते. कारण या त्यांच्या गुप्त हालचालीची माहिती वझीरलाच होती.

वझीरनेही सारा डाव ओळखला होता. त्यानेही त्यांच्याशी मिळते जुळते घेऊन गोडगोड बोलायला प्रारंभ केला आणि संधी साधून त्यांच्या तावडीतून तो सुटला.

हल्लेखोरांना हुलकावणी देऊन वझीर निसटला. तो तडक भारतीय सैन्याच्या छावणीवर येऊन धडकला. तेथील लष्करी अधिकाऱ्यची भेट घेऊन वझीरने सारी हकिकत सांगितली. अधिकाऱ्याला धोक्याची तत्काळ कल्पना आली. त्याने जवानांना ताबडतोब सिद्ध होण्याची आज्ञा दिली आणि वझीरला बरोबर घेऊन भारतीय सैन्याची एक तुकडी त्या जंगला-

जवळ पोचली.

संध्याकाळची वेळ टळून गेली होती. अंधार पडला होता. सैनिकांची हालचाल कानांवर येताच हल्लेखोर जंगलाच्या आश्रयाने दडून बसले. झाडाझुडपांत व खडकाच्या आडोशाने दबा धरून राहिले! भारतीय जवान निर्धाराने पुढे सरकले; तोच हल्लेखोरांनी मशीनगन्सचा मारा सुरू केला. शांत रात्रीची वेळ, पण गोळ्यांच्या वर्षावाने धरतीही थरारून गेली. डोंगरकपारीतून आवाज घुमले. भारतीय जवानही काही कमी नव्हते. ते तर हल्लेखोरांचा नक्षा उतरवण्यासाठीच आलेले होते. आपल्याही जवानांनी मोर्चे बांधले, बंदुका सरसावल्या, आणि शत्रूवर गोळ्यांच्या फेरी झाडण्यास सुरवात केली. हा निर्धार व शौर्य पाहून हल्लेखोर घाबरले. खरे तर ते संख्येने आपल्या जवानांपेक्षा जास्तीच होते-शंभराच्या वर तरी असावेत. शिवाय त्यांच्याजवळ मशीनगन्स आणि उखळी तोफाही होत्या. पण भारतीय जवानांचे धैर्य व शौर्य पाहून त्यांना पळता भुई थोडी झाली. हातांतली शस्त्रास्त्रे जिथल्या तिथेच टाकून ते पळून गेले. बराचसा शस्त्रसाठा, दारूगोळा आणि इतरही युद्धसामुग्री आपल्या जवानांनी हस्तगत केली. चकमकीत दहा हल्लेखोर ठार झाले. एक फार मोठे अरिष्ट टळले होते. आणि याला कारणीभूत होता वीर वझीर महंमद!

उत्कट देशभक्तीच्या व उत्तुंग पराक्रमाच्या किती तरी कथा आणि प्रसंग या युद्धात घडले. पाकिस्तानने सात आघाड्या एकदम उघडल्या होत्या. पण सहा आघाड्यांवर भारतीय जवानांनी पाकिस्तानला जराही पुढे येऊ दिले नाही. जम्मूमधील छांब विभागात मात्र जोराचा प्रतिकार झाला. घनघोर लढाई झाली. पाकने १९० चौ. मैलांचा भाग व्यापला, तर भारताने ६९० चौ. मैलांचा प्रदेश जिंकला. पाकने श्रीनगर-लेह मार्ग तोडला. अनेक आघाड्या उघडून हिंदी सैन्य विभागून गुंतवून ठेवायचे आणि काश्मीर ताब्यात घेऊन दिल्लीवर चालून येण्याचा घाट पाकिस्तानी

सेनाधिकाऱ्यांनी घातला होता. दहा हजार हल्लेखोरांची टोळीही त्यांनी तयार केली होती. परकीय मदतीने आधुनिक शस्त्रास्त्रेही प्रचंड प्रमाणावर जमवलेली होती. १५ ऑगस्टला पाक फौजा सिआलकोटहून छांब भागात उतरल्या २१ तारखेला पाकने आपली सेबरजेट विमाने काढली. भारतीय अधिकाऱ्यांनी प्रसंग ओळखला. उत्तरेकडून २४ ऑगस्टला पाक सेनेवर हल्ला चढवला. टिटवालजवळ युद्धबंदी रेषा ओलांडली. पाकची दोन लष्करी ठाणी जिंकून घेतली. त्यानंतर अत्यंत आणीबाणीची व खडतर अशी घनघोर लढाई हाजीपीर खिंडीजवळ झाली. भारतीय जवानांनी पराक्रमाची शर्थ केली. मृत्यूवर मात केली. आणि २८ ऑगस्ट रोजी हाजीपीरवर विजयाचे निशाण फडकवले !

१ सप्टेंबरला पाकिस्तानने छांब विभागात पुनश्च फार मोठे आक्रमण केले. परंतु हिंदी सेनेने त्याचा तेवढ्याच प्रभावी रीतीने प्रतिकार केला. या वेळी अमेरिकेचे पॅटन रणगाडे पाकने वापरले होते, पण हिंदी जवानांनी मोठ्या बहादुरीने विमानातून बॉंब टाकून १३ आणि जमिनीवरील सरळ हल्ल्यात ५ असे १८ रणगाडे नष्ट केले !

पाकिस्तानी सेनेने आपले सारे सामर्थ्य जणू छांबवर केंद्रित केले होते. भारताचे जनरल चौधरी यांनी या शहाला काटशह म्हणून पाकिस्तानच्या लाहोर शहरावर धडक मारली. बागा, डोंगराई, खलटा, बर्की आणि खेम-करण–कसूर अशा तिन्ही बाजूंनी हल्ले चढवले. या मोहिमेच्या पहिल्या दिवशीच ६ सप्टेंबर रोजी हिंदी फौजांनी इचोगिल कालवा आणि रावी नदी ओलांडली. लाहोरच्या वेशीवर त्या पोचल्या. पाकिस्तानी सेना आणि सरकार गडबडून गेले. इचोगिल कालव्याच्या परिसरात असल–उत्तर, खेमकरण येथे भक्कम पाय रोवून बसल्या. ९–१० सप्टेंबरला या भागात घनघोर लढाई झाली. हवालदार अब्दुल हमीद या पठ्याने ३ पॅटन रणगाडे नष्ट केले. मरणोत्तर 'परम वीरचक्र' त्याला देण्यात आले. कर्नल तारापोर

यांनीही फिलोरा भागात पराक्रमाची शर्थ केली. त्यांनाही मरणोत्तर परमवीर चक्र देण्यात आले.

८ सप्टेंबरच्या सियालकोटच्या लढाईत पाकचे ६६ रणगाडे नष्ट केले.

डोगराई ठाण्यावर २१ सप्टेंबरला घनघोर युद्ध झाले. पाकिस्तानी सेनेने उभारलेल्या ' पिल–बॉक्सेस ' चा पार धुव्वा उडवून हिंदी सेनेने पाकची संरक्षण फळी फोडून टाकली. शत्रूची बरीच हानी झाली. पुष्कळशी शस्त्रे, दारूगोळा हिंदी जवानांच्या हाती लागला.

हिंदी जवान प्राणाची बाजी लावून रणांगणात लढत होते, तर सारा भारत एक होऊन त्यांच्या पाठीशी निर्धाराने उभा होता! सर्व तऱ्हेची मदत देण्यास सिद्ध झाला होता. भारतीय एकतेचे पुनश्च दर्शन घडले. पंतप्रधान शास्त्रींनी " जय जवान! जय किसान!" अशी घोषणा दिली. प्रत्येक भारतीय आपल्या हातातले काम हे ' युद्ध कार्य ' अशा भावनेने झटून करू लागला. भारताने ही लढाई जिंकली!



पंतप्रधान लालबहादुर शास्त्री

दोन्ही देशात मध्यस्थी करण्याचा प्रयत्न काही राष्ट्रांनी युद्धकाळात केला. शास्त्रीजी त्यांना म्हणाले, " पाकला आधी आक्रमक ठरवा!"

यूनोच्या सुरक्षामंडळाने ठराव करून युद्धबंदीचा आदेश दिला. शास्त्रीजी म्हणाले, " पाकिस्तान युद्धबंदी करणार असेल तर आम्ही तयारच आहोत.

शत्रूने चालून यावे आणि आम्ही स्वस्थ बसावे हे चालणार नाही." अशी तडफदार भूमिका शास्त्रीजींनी मांडली. शांतीप्रेम, यूनो संघटनेचा मान, मध्यस्थ राष्ट्रांच्या प्रयत्नांबद्दल आदर आणि स्वदेशरक्षणाची स्वाभिमानयुक्त तयारी असे विविध गुण शास्त्रीजींच्या भूमिकेतून व्यक्त झाले. म. गांधी, जवाहरलाल नेहरू यांनी भारताला जी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली होती त्यात शास्त्रीजींनी विशेष भर टाकली.

पाकिस्तानशी लढाई चालू असतानाच चीननेही धमकी देऊन उत्तर-सीमा पुन्हा पेटवण्यासाठी फुसकी कुरापत काढली होती. १६ सप्टेंबरला चीनने भारत सरकारला एक दमदाटीचा खलिता धाडला होता. त्यात म्हटले होते, 'आमच्या हद्दीत हिंदी लष्कराने केलेली बांधकामे पाडून टाकावीत. ५९ याक व ८०० मेंढे पळवले आहेत, ते परत करा. नाहीतर युद्धाला तयार व्हा!' तीन दिवसांची मुदतही दिली होती. परंतु शास्त्रीजींनी अत्यंत बाणेदारपणाने चीनचे आरोप धुडकावून लावले आणि "भारताच्या स्वातंत्र्यावर व सार्वभौमत्वावर आक्रमण करणाऱ्यांशी प्राणपणाने लढू", असा खणखणीत इशारा दिला. तीन दिवस होऊन गेले. चीनने पुन्हा तीन दिवसांची मुदत वाढवून दिली. भारताने त्याचीही दखल घेतली नाही. चीनने 'आमचे याक व मेंढे भारताने परत दिले, बांधकामे पाडून टाकली', असे खोटेच जाहीर करून जगापुढे आपले हसे करून घेतले.

या युद्धात भारतीय वीरांनी जो अभूतपूर्व पराक्रम केला त्याने जग थक्क झाले! पाकच्या पॅटन रणगाड्यांची ऐट पार धुळीला मिळवली. ३६० पाक पॅटन रणगाड्यांपैकी २१६ आपल्या जवानांनी नष्ट करून टाकले. नऊ ताब्यात घेतले.

रशियाच्या मध्यस्थीने सुरक्षामंडळाच्या ठरावानुसार भारत–पाक यांच्यामध्ये युद्धबंदीचा करार २३ सप्टेंबर १९६५ रोजी झाला. पुढील वाटाघाटीसाठी ताश्कंद येथे जाण्यापूर्वी शास्त्रीजींनी रशियाला सांगितले,

“ भारत शांतताप्रिय आहे. पाकिस्तानशी वाटाघाटी करून शांतता प्रस्थापित करण्यात आमची तयारी आहे. मात्र काश्मीर प्रश्नावर चर्चा करता येणार नाही. कारण काश्मीर हा भारताचाच अविभाज्य भाग आहे. ”

या अटीवर ताश्कंद येथे ३ जानेवारी १९६६ पासून भारताचे पंतप्रधान लालबहादुर शास्त्री व पाकिस्तानचे अध्यक्ष अयुबखान यांच्या वाटाघाटी सुरू झाल्या. रशियाचे कोसीजीन मध्यस्थ म्हणून साहाय्य करीत होते. पाकिस्तानने काश्मीरवरून आधी बरेच आढेवेढे घेतले. पण शास्त्रीजी ठामपणे भूमिका मांडीत होते. साऱ्या भारताचेच नव्हे तर जगाचे लक्ष ताश्कंदकडे लागले होते. वाटाघाटींच्या फेरी सुरू होत्या. वाटाघाटी फिसकटणार की काय, अशी काळजीही पसरली होती. परंतु १० जानेवारीच्या सायंकाळीच वार्ता आली की, “ ताश्कंद वाटाघाटी यशस्वी झाल्या. युद्धबंदीच्या करारावर शास्त्री–आयुबखान यांनी स्वाक्षऱ्या केल्या ! ”

सुटकेचा, समाधानाचा श्वास जगाने व भारतीय जनतेने टाकला.

पण हाय ! मध्यरात्रीनंतर ती भीषण वार्ता येऊन थडकली !

रात्री दोनच्या सुमारास ताश्कंद येथे भारताचे पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले !

भारतीय जनतेवर आकाशीची कुऱ्हाड कोसळली. सारे राष्ट्र शोकसागरात बुडून गेले.

शास्त्रीजींची पंतप्रधान म्हणून अवघी १८ महिन्यांचीच कारकीर्द झाली. पण या १८ महिन्यांतही त्यांनी भारताची मान जगात उंचावली होती. भारतीय जनतेमधला स्वाभिमान व सत्त्व जागृत केले होते.

—आणि हा लहानसा बुटका, माणूस केवढा मोठा होता, हेही जगाला दिसले होते !

☆ ☆ ☆

# इंदिरा–युग

अवघ्या अठरा महिन्यांनीच नव्या दिल्लीत नवा पंतप्रधान निवडण्यासाठी पुन्हा हालचाली सुरू झाल्या. अनेक संभाव्य नावे वृत्तपत्रातून झळकू लागली. देशाचे आणि जगाचेही लक्ष दिल्लीकडे लागले. आणि शेवटी कॉंग्रेस पार्लमेंटरी बोर्डाने कॉंग्रेस संसदीय पक्षाच्या नेतेपदी इंदिरा गांधी यांची बहुमताने निवड केली. ही निवड एकमताने व्हावी यासाठी कॉंग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष श्री. कामराज नाडर व अन्य कॉंग्रेसश्रेष्ठींनी पुष्कळ प्रयत्न केला, परंतु श्री. मोरारजीभाई देसाई यांच्या आग्रही स्वभावामुळे तो फलदायी झाला नाही. मोरारजी देसाई हे इंदिरा गांधी यांच्याविरुद्ध उभे राहिले.

१९ जानेवारी १९६६ रोजी सकाळी मतनोंदणी झाली आणि मोरारजींच्या पेक्षा दुप्पट मते अधिक मिळवून इंदिराजी निवडून आल्या. इंदिराजींच्या निवडीने भारतीय जनतेला अत्यंत आनंद झाला. जगाच्या कानाकोपऱ्यातून समाधान व्यक्त झाले. अभिनंदनाचा वर्षाव झाला. 'तास'

नामक रशियन वृत्तसंस्थेने म्हटले, "ही निवड म्हणजे कै. जवाहरलाल नेहरू व कै. लालबहादूर शास्त्री यांचेच तटस्थतेचे, शांततामय सहजीवनाचे व राष्ट्रीयीकरणाचे ध्येय, धोरण चालू राहणे होय."

पंतप्रधान इंदिराजी म्हणाल्या, "कॉंग्रेस पक्षाने स्वीकारलेले आणि दिवंगत श्री. शास्त्रीजी यांनी अनुसरलेले माझ्या वडिलांचे धोरण मी पुढे चालवीन. या धोरणापासून मी स्वभावतःच बाजूला जाऊ शकत नाही.'

२४ जानेवारी १९६६ रोजी इंदिराजींनी आपल्या नव्या मंत्रिमंडळाची यादी राष्ट्रपतींना सादर केली आणि शपथविधीनंतर त्या रीतसर पंतप्रधान बनल्या. इंदिराजी भारताच्या तिसऱ्या पंतप्रधान होत.

भारतासारख्या प्राचीन व महान देशाचे पंतप्रधानपद एका महिलेने विभूषित केले याचा आनंद भारतातल्या स्त्रियांप्रमाणेच जगातील स्त्रियांनाही झाला. एका महिलेला हा श्रेष्ठ मान भारताने दिला यातच भारताच्या संस्कृतीचे थोरपण सामावलेले आहे.



पंतप्रधान इंदिरा गांधी

इंदिराजींच्या महामंत्रीपदाला एक वर्ष झाले आणि भारताची चौथी सार्वत्रिक निवडणूक येऊन ठेपली.

एक वर्षाच्या कारकीर्दीत अनेक संकटांना आणि आपत्तींना त्यांना तोंड द्यावे लागले. खुद्द लोकसभेतच विरोधी पक्षांनी त्यांच्या सरकारविरुद्ध अविश्वासाचे ठराव आणले. त्यांच्या सहकाऱ्यांवर व त्यांच्यावर देखील आरोप ठेवले गेले

परंतु इंदिराजींनी धैर्याने या आरोपांचे खंडन केले. प्रतिपक्षाला चोख उत्तर दिले.

या वर्षभरात देशाच्या काही भागात भीषण दुष्काळ पडले. महाराष्ट्र व बिहार प्रांतातील काही खेडी होरपळून निघाली. इंदिराजी तातडीने तिकडे धावल्या आणि त्यांनी अन्नधान्याची सोय करविली. ठिकठिकाणी उद्‌भवलेल्या विद्यार्थ्यांच्या हिंसक असंतोषालाही त्यांनी तोंड दिले. गोवध-बंदीची चळवळ याच काळात झाली. इंदिराजींनी सहानुभूतीने सर्व प्रश्न समजावून घेतले. आणि शक्य ते करण्याची तयारी दाखवली.

कितीतरी दिवस भिजत पडलेले प्रश्न सोडविण्यातही त्यांनी पुढाकार घेतला. पंजाबी सुभ्याचा प्रश्न कौशल्याने हाताळून पंजाब व हरियाना हे दोन प्रांत निर्माण केले. गोव्यामध्ये जनता-कौल घेतला. निपाणी-बेळगाव सीमाप्रश्नाच्या विचारासाठी महाजन कमिशनची नियुक्ती केली. परराष्ट्रांशी मैत्रीचे संबंध दृढ करण्यासाठी रशिया, अमेरिका, इस्रायल आदी देशांना त्यांनी भेटी दिल्या. अमेरिकेत त्यांचे भव्य 'गुलाबी स्वागत' झाले.

व्हिएतनामच्या जळत्या प्रश्नावर, इंदिराजींनी पुढाकार घेऊन नासर व टिटो यांच्याबरोबर वाटाघाटी करून तेथे युद्धबंदी व्हावी व शांतता नांदावी यासाठी प्रयत्न केले.

चौथ्या निवडणुकीच्या प्रचारासाठी त्या सर्व भारतभर फिरल्या. १५ फेब्रुवारी १९६७ रोजी चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीस प्रारंभ झाला आणि केंद्रात कॉंग्रेसला बहुमत मिळाले. काही प्रांतात मात्र कॉंग्रेस अल्पमतात गेली. या निवडणुकीत पुढीलप्रमाणे मतदान झाले.

कॉंग्रेस ४०·७३ टक्के, जनसंघ ९·४१ टक्के, स्वतंत्र ८·६८ टक्के, उजवे कम्युनिस्ट ५·१९ टक्के, संयुक्त समाजवादी ४·९२ टक्के, मार्क्सिस्ट ४·२१ टक्के, आणि प्रजासमाजवादी ३·०६ टक्के.

भारताच्या पंतप्रधान म्हणून इंदिराजींचीच पुनश्च निवड झाली.

१३ मार्च १९६७ रोजी इंदिराजींच्या नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधि झाला.

या निवडणुकीने काँग्रेस पक्षाला बराच हादरा बसला. विरोधकांची 'काँग्रेस हटाव' ही घोषणा बरीच लागू पडली होती. प. बंगाल, बिहार, तामिळनाडू, पंजाब, हरयाना, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, केरळ, ओरिसा या नऊ प्रांतात विरोधकांच्या हाती सत्ता गेली. लोकसभेतले बहुमत घसरले. ५२१ पैकी २७३ जागा मिळाल्यावर विरोधकांची संख्या वाढली. काँग्रेसच्या काही ज्येष्ठ नेत्यांचा व पूर्वीच्या मंत्रिमंडळातील काही मंत्र्यांचा निवडणुकीत पराभव झाला. इंदिराजींच्या मंत्रिमंडळात नवीन, तरुण चेहरे दिसले. भारतात रुजत चाललेली लोकशाही पाहून जगाला नवल वाटले. भारताबद्दल आदरही वाढला.



डॉ. झकीर हुसेन

देशाची सूत्रे हाती घेताच इंदिराजींना प्रथम तोंड द्यावे लागले ते राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीच्या प्रश्नास. डॉ. राधाकृष्णन यांची मुदत संपत होती. इंदिराजींनी या उच्च पदासाठी शिक्षणक्षेत्रात बहुमोल कार्य केलेले आणि उपराष्ट्रपदी असलेले डॉ. झाकीर हुसेन यांना व उपराष्ट्रपतीपदासाठी मजूर क्षेत्रात कार्य केलेले श्री. व्ही. व्ही. गिरी यांना पाठिंबा दिला. विरोधी पक्षाने त्यावेळचे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. सुब्बाराव यांना उभे केले. नोकरीचा राजी-

नामा देऊन सुब्बाराव उभे राहिले. निवडणूक अटीतटीची झाली आणि डॉ. झाकीर हुसेन हे राष्ट्रपती म्हणून व व्ही. व्ही. गिरी हे उपराष्ट्रपती म्हणून निवडून आले. १३ मे १९६७ रोजी त्यांचा शपथविधी झाला.

या पुढचा काही काळ भारतात राजकीयदृष्ट्या फारच अस्थिरतेचा व गोंधळाचा गेला. प. बंगालमध्ये नक्षलवादी नामक दहशतवादी पंथाचा उदय झाला होता. खून, मारामाऱ्यांना ऊत आला. कम्युनिस्टांच्या अडवणुकीच्या धोरणामुळे प. बंगाल सरकारला शासन चालवणे अशक्य झाले. म्हणून तेथील राज्यपालांनी अजय मुखर्जींचे संयुक्त आघाडीचे सरकार बरखास्त केले. मद्रासमधील द्रविड मुन्नेत्र कळघमचे सरकार स्वतःच्या बहुमतावर होते म्हणून टिकले. परंतु इतर प्रांतातली सरकारे निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या आघाड्यांची बनलेली होती. त्यांच्यातली हिडीस सत्ता-स्पर्धा वारंवार उघड्यावर आली. भ्रष्टाचार माजला. सत्तेसाठी या पक्षातून त्या पक्षात येणाऱ्या-जाणाऱ्या ' आयाराम-गयारामां ' चे पेवच फुटल्यासारखे झाले. ती एक समस्याच निर्माण झाली. आणि राष्ट्रीय पातळीवर याचा विचार करण्यापर्यंत पाळी आली. कारण लोकप्रतिनिधींच्या अशा बेछुट वर्तनामुळे लोकशाहीसच धोका निर्माण झाला होता. काही राज्यांतून विधिमंडळ बरखास्त करून राष्ट्रपतींची राजवट जारी करावी लागली होती. विरोधी पक्षांना सत्ता हाती घेण्याची संधी मिळूनही त्या संधीचा उपयोग जनहिताकरिता त्यांना करून घेता आला नाही. या काळात राज्य विरुद्ध केन्द्र, विधिमंडळ विरुद्ध राज्यपाल असे किती तरी घटनात्मक प्रसंग निर्माण झाले. याशिवाय भूकंप, अवर्षण, जातीय दंगली, महागाई-वेतनवाढ या प्रश्नांवरून ठिकठिकाणी संप, टाळेबंदी असे प्रकार घडत होते. स्वतंत्र तेलंगणाची चळवळ, म्हैसूर-महाराष्ट्राचा सीमा प्रश्न, कृष्णा पाणीतंटा, संतप्त विद्यार्थ्यांची आंदोलने या सर्व घडामोडींमुळे भारतात अराजक माजणार असेच विचारवंतांना वाटत होते. पण या बिकट परिस्थितीतूनही

इंदिराजींच्या कणखर नेतृत्वाखाली भारताची राष्ट्रनौका सुखरूप पार पडली.

इंदिराजींना देशातील किंवा आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील दडपणांना किंवा अडचणींनाच केवळ तोंड द्यावे लागत होते असे नाही, तर खुद्द त्यांच्या काँग्रेस पक्षातही, ज्येष्ठ समजल्या जाणाऱ्या सहकाऱ्यांशी त्यांना झगडावे लागत होते. जबलपूर येथे झालेल्या अ. भा. काँग्रेस कमिटीने जो 'दहा कलमी' कार्यक्रम स्वीकारलेला होता, तो असा होता—

( १ ) बँकिंगचा व्यवहार करणाऱ्या संस्थांचे सामाजिक नियंत्रण.

( २ ) जनरल इन्शुअरन्सचे राष्ट्रीयीकरण.

( ३ ) अधिकाधिक वस्तूंचा आयात-निर्यात व्यापार सरकारीरित्या करणे.

( ४ ) धान्याचा सरकारी व्यापार.

( ५ ) सहकारी संस्थांचा विस्तार.

( ६ ) मिरासदारीचे नियंत्रित उच्चाटन.

( ७ ) समाजाच्या किमान गरजा भागविण्याची व्यवस्था.

( ८ ) शहरातील जमिनीच्या किंमतीत वाढ झाल्याने होणाऱ्या फायद्याचे नियंत्रण.

( ९ ) ग्रामीण भागात सार्वजनिक कामे व जमीन सुधारणा वगैरे.

(१०) माजी संस्थानिकांचे खास अधिकार रद्द करणे.

हा कार्यक्रम तसा संपूर्ण समाजवादी नव्हता, पण प्राप्त परिस्थितीतली त्या दिशेने वाटचाल केवळ होती. परंतु त्याच्या अंमलबजावणीस पक्षातील पुराणमतवादी व प्रतिगामी मंडळींचा छुपा विरोध होता. समाजवादाची भाषा जरी ते बोलत होते तरी त्यांची मनोवृत्ती भांडवलशाहीला पोषक होती. परंतु इंदिराजींना समाजवादाचे बाळकडूच मिळालेले! भिन्न दृष्टिकोणाची अशी ही माणसे एकाच संघटनेत फार दिवस राहू शकत नाहीत.

ती आजवर राहिली याला कारण म. गांधींचे व नंतर प. जवाहरलालजींचे अलौकिक व्यक्तिमत्व.

इंदिराजींच्या कारकीर्दीत या संघर्षाला उघड तोंड फुटले. ते जुलै १९६९ साली बंगलोर येथे भरलेल्या अ. भा. काँग्रेसच्या अधिवेशनात. परंतु छुप्या संघर्षाला त्या आधीच सुरुवात झाली होती. राष्ट्रपतींच्या निवडीनंतर काँग्रेस संघटनेचे अध्यक्षपद हा त्या पक्षात असाच वादाचा प्रश्न बनलेला होता. नव्या दहा कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यास समाजवादावर संपूर्ण निष्ठा असणारा अध्यक्ष इंदिराजींना हवा होता; तर ' जैसे थे ' धोरण राबवणारा अध्यक्ष जुन्या मंडळींना हवा होता. या विचारसरणीचे काँग्रेस-अंतर्गत दोन गटच निर्माण झालेले होते. ' जैसे थे ' वाल्या जुन्या श्रेष्ठींच्या गटाला ' सिंडिकेट ' हे नाव प्राप्त झाले होते. म्हणून त्यांच्या विरोधात उभ्या राहिलेल्या इंदिराजींच्या नव्या गटाला ' इंडिकेट ' असे गमतीने लोक म्हणू लागले. सिंडिकेटने निजालिंगप्पा यांना काँग्रेसचे अध्यक्ष केले. इंदिराजींनी ते तडजोड म्हणून मानले.

सिंडिकेट-इंडिकेटमधील मतभेद बंगलोर येथे स्पष्ट झाले व तेथून ते वाढतच गेले. ९ जुलै १९६९ रोजी बंगलोर येथे काँग्रेस महासमितीचे अधिवेशन झाले. पहिल्या दिवशी प्रकृती ठीक नसल्यामुळे इंदिराजी उपस्थित राहू शकल्या नाहीत; परंतु त्यांनी एक निवेदन विचारार्थ पाठवले. या त्यांच्या निवेदनात त्यांनी आर्थिक धोरणाच्या संदर्भात मोठ्या व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण व इतर मूलगामी फेरबदल यासंबंधी आपले विचार व्यक्त केले होते. या निवेदनामुळे काँग्रेस श्रेष्ठीत मोठी खळबळ माजली. १९६७ च्या निवडणुकीनंतर काँग्रेस महासमितीने जबलपूर अधिवेशनात जे धोरण ठरवले होते, त्यापेक्षा वेगळे धोरण आता पंतप्रधान इंदिराजींनी स्वीकारले होते. मोठ्या बँकांच्या बाबतीत सरकारने सामाजिक नियंत्रणाची कार्यवाही अमलात आणावी असा त्यावेळचे उपपंतप्रधान श्री. मोरारजी

देसाई यांचा आग्रह, तर प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण करावे, हा इंदिराजींचा आग्रह. दोन विचारांचे दोन गट पडले. तरुण गटाचा ज्यांना 'यंग टर्क' किंवा 'तरुण तुर्क' असे नाव मिळाले आहे, त्यांचा इंदिराजींना पाठिंबा होता. बरेच वादंग माजले. पक्षात फूट पडण्याचा धोका निर्माण झाला. परंतु पक्षाचे ऐक्य टिकवण्यासाठी श्री. यशवंतराव चव्हाण यांनी दोन्ही गटांशी चर्चा करून समझोता घडवून आणला.

आर्थिक प्रश्नावरील फूट टळली तरी राष्ट्रपतीपदाच्या उमेदवार निवडी-वरून पुन्हा मतभेद झालेच. ३ मे १९६९ रोजी राष्ट्रपती झाकीर हुसेन यांचे आकस्मिक निधन झाले होते. आणि राष्ट्रपतीपदासाठी पुनश्च निवडणूक होणार होती. इंदिराजींना या वेळी श्री. जगजीवनराम हे राष्ट्र-पती व्हावेत असे वाटत होते. कारण ते वर्ष गांधी जन्मशताब्दीचे होते. त्या वर्षात एका हरिजनाची राष्ट्रपतीपदी निवड होणे अत्यंत उचित ठरेल असा त्यांचा विचार होता. परंतु बंगलोर येथे काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाने इंदिराजींची सूचना फेटाळली आणि संजीव रेड्डी यांना राष्ट्रपतीपदाचे उमेदवार म्हणून घोषित केले. इंदिराजींनी आपली नापसंती व्यक्त केली. संघर्षाची ठिणगी पडली. दिल्लीत परतल्यावर १६ जुलै रोजी त्यांनी मोरारजी देसाई यांचेकडील अर्थमंत्रीपद काढून स्वतःकडे घेतले. मोरार-जींना हा अपमान वाटला व त्यांनी उपपंतप्रधानपदाचाही राजीनामा दिला. समाजवादी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी अर्थखाते स्वतःकडे घेतल्याबरोबर १९ जुलै १९६९ रोजी इंदिराजींनी भारतातील प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा वटहुकूम राष्ट्रपतींच्या सहीने जारी केला. त्यांच्या या धाडसी निर्णयाचे साऱ्या देशाने हर्षभराने स्वागत केले.

दरम्यान राष्ट्रपतीपदाची निवडणूक जवळ आली. श्री. संजीव रेड्डी यांचे नाव बंगलोरला जाहीर झाले. त्या दिवशीच दिल्लीत श्री. व्ही. व्ही. गिरी यांनी आपली स्वतंत्र उमेदवारी घोषित केली होती. श्री. चिंतामण-

राव देशमुख यांनाही काही विरोधी पक्षांनी उभे केले होते. समाजवादी गटाचा पाठिंबा गिरींना होता. राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत मतस्वातंत्र्याची मागणी काही काँग्रेसवाल्यांनी श्रेष्ठींकडे केली. अध्यक्षांनी ती फेटाळली. इंदिराजींना त्यांनी काँग्रेस खासदार-आमदारांना 'आदेश' द्यावा अशी आज्ञा केली. इंदिराजींनी ती फेटाळली. निवडणुकीचे वातावरण तंग झाले. दोन्ही बाजूंनी कसून प्रचार करण्यात आला. आणि अखेरीस श्री. व्ही. व्ही. गिरी हे राष्ट्रपती म्हणून निवडून आले. हा विजय इंदिराजींचाच होता.

ह्या निवडणूक प्रश्नावरून काँग्रेस पक्षात बरेच रण माजले. अध्यक्षांनी श्री. जगजीवनराम व फक्रुद्दीन अली अहमद व इंदिरा गांधी यांना त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई का करू नये अशी विचारणा करणारी पत्रे लिहिली, तर 'काँग्रेस पार्लमेंटरी पक्षाच्या नेत्यावर हुकमत गाजवण्याचा काँग्रेस अध्यक्षांना अधिकारच काय?' असा प्रतिप्रश्न इंदिराजींनी विचारला. दोन्ही गटांतील वाग्युद्ध वाढत चालले. आरोप-प्रत्यारोपांची खैरात उडाली. घटनेची कलमे घासून पुसून निघाली. पक्ष दुभंगण्याचा धोका निर्माण झाला. काँग्रेस अध्यक्ष निजलिंगप्पांनी श्री. सी. सुब्रह्मण्यम यांना तांत्रिक मुद्यावरून काँग्रेस कार्यकारिणीतून काढून टाकले, तर इंदिराजींनी श्री. गुरुपादस्वामी, मुथुअल, राव व पहाडिया या चार कनिष्ठ मंत्र्यांना मंत्रिमंडळाचे राजीनामे मागितले. शहकाटशह चालू होते. दोन गटाच्या दोन वेगवेगळ्या कार्यकारिणी सभा झाल्या. अखेरीस



राष्ट्राध्यक्ष व्ही. व्ही. गिरी

सिंडिकेटचा पगडा असलेल्या काँग्रेस कार्यकारिणीने, इंदिरा गांधी यांनी पक्षशिस्त मोडली, पक्षाच्या हिताविरुद्ध वर्तन केले अशा आरोपाखाली १२ नोव्हेंबर १९६९ रोजी त्यांना पक्षातून काढून टाकल्याचा निर्णय जाहीर केला. परंतु इंदिराजींनी दुसऱ्याच दिवशी, १३ नोव्हेंबर १९६९ रोजी बोलावलेल्या काँग्रेस संसदीय पक्षाच्या बैठकीत बहुसंख्य खासदारांनी उपस्थित राहून इंदिराजींच्या नेतृत्वावर एकमताने फेरविश्वास व्यक्त केला.

इंदिराजींच्या नेतृत्वाखाली विभागलेल्या नवकाँग्रेसचे अधिवेशन श्री. जगजीवनराम यांच्या अध्यक्षतेखाली २६-२७ डिसेंबर १९६९ रोजी मुंबईस झाले, तर सिंडिकेट गटाचे अधिवेशन २०-२१ तारखांना अहमदाबादजवळ गांधीनगर येथे झाले.

८४ वर्षांचा जुना काँग्रेसपक्ष दुभंगला!

इंदिराजींनी बँकांचे राष्ट्रीयीकरण करून समाजवादी कार्यक्रमाला चालना दिली होतीच. त्या पाठोपाठ १ सप्टेंबर १९७० रोजी त्यांच्या प्रेरणेने संस्थानिकांचे तनखे व खास हक्क रद्द करणारे विधयेक लोकसभेत मांडण्यात आले. ७ सप्टेंबर रोजी राष्ट्रपती गिरींनी संस्थानिकांची ऐतिहासिक संस्था त्वरेने विसर्जित केली असा वटहुकूम काढला.

काळाची पावले न ओळखणारे व स्वार्थासाठीच झटणारे संस्थानिक या आदेशाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात गेले. घटनेच्या कलमावर बोट ठेऊन चालणाऱ्या न्यायालयाने राष्ट्रपतींचा हुकूम बेकायदा ठरवला. आता घटनेत दुरुस्ती करून घेतल्याशिवाय काही करणेच शक्य नव्हते. आणि तशी दुरुस्ती करायची तर आवश्यक तेवढे बहुमतही लोकसभेत पाठीशी नव्हते. विरोधक केवळ विरोधासाठी विरोध करीत होते. ही परिस्थिती लक्षात घेऊन इंदिराजींनी राष्ट्रपतींना लोकसभा विसार्जित करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार २७ डिसेंबर १९७० रोजी राष्ट्रपतींनी भारतीय लोकसभा विसर्जित केल्याची ऐतिहासिक घोषणा केली व नवीन निवडणुकी जाहीर

केल्या. या निमित्ताने १९७१ फेब्रुवारी-मार्च महिन्यात भारतभर लोकसभेसाठी मध्यावधी निवडणूक झाली.

ही निवडणूक अत्यंत अटीतटीची झाली. विरोधकांनी तर काहीही करून इंदिराजींना सरकार बनवू द्यायचे नाही, असा जणू पणच केला होता. त्यासाठी आपली ध्येयधोरणे, विचार यांचा विधिनिषेध न बाळगता त्यांनी इंदिरा-विरोधी निवडणूक आघाड्या बनवल्या. जनसंघ, स्वतंत्र, संयुक्त समाजवादी व संघटना कॉंग्रेस यांची बडी आघाडी निर्माण झाली, आणि त्यांनी 'इंदिरा हटाव' हाच मुख्य कार्यक्रम घोषित केला. याउलट इंदिराजींनी 'गरिबी हटाव' ची घोषणा दिली!

विरोधकांची आवळ्या-भोपळ्यांची मोट व व्यक्तिद्वेषावरील आधारित 'इंदिरा हटाव' हा कार्यक्रम जनतेला मुळीच आवडला नाही. उलट इंदिराजींच्या 'गरिबी हटाव' घोषणेचा सामान्य माणसाच्या मनावर जादूसारखा परिणाम झाला. इंदिराजींची प्रतिमा सामान्य माणसाच्या मनात सुप्रतिष्ठित झाली होती.

निवडणुकांचे निकाल आश्चर्यजनक लागले! इंदिराजींच्या नवकॉंग्रेसला ५१५ पैकी ३५० जागा मिळून दोन-तृतीयांश इतके हुकमी बहुमत लोकसभेत हाती आले. विरोधकांची दाणादाण उडाली!

भारताला इंदिराजींच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा कणखर, समाजवादावर निष्ठा असलेले व स्थिर सरकार लाभले. त्या बळावर त्यांनी २५ वी घटनादुरुस्ती मंजूर करून घेतली आणि १ जानेवारी १९७२ रोजी संस्थानिकांचे तनखे व खास हक्क रद्द केले. कै. वल्लभभाई पटेल यांनी दोन तपांपूर्वी हिंदी संस्थानांचे विलीनीकरण घडवून आणले होते. इंदिराजींनी संस्थानिक ही संस्थाच संपवून टाकली. इतिहासजमा केली.

१९७१ साल फारच धामधुमीचे उजाडले. पूर्व बंगाली जनतेने प. पाकिस्तानच्या हुकूमशहांकडे स्वायत्तता मागितली होती. नुकत्याच झालेल्या

निवडणुकीत बंगाली लोकांनी निर्भयपणाने आपल्या नेत्यांना निवडून दिले होते. शेख मुजिबुर रहमान यांना निर्विवाद बहुमत लाभलेले होते. परंतु पाक अध्यक्ष याह्याखान यांनी लोकमताचा अनादर केला आणि पूर्व बंगालमधील जनतेला न्याय नाकारला. गेली २५ वर्षे बंगालवर प. पाकिस्तानचे पाशवी वर्चस्व होते. बंगालचे अनेक तऱ्हेने शोषण चाललेले होते. आणि बंगालच्या नशिबी निसर्गाने समृद्धी देऊनही प. पाकिस्तान्यांनी कंगाली लादलेली होती. दडपलेल्या बंगाली जनतेने शेख मुजिबर रहमान यांच्या नेतृत्वाखाली आपल्या मागण्यांसाठी लढा उभारला. बंगाली भाषा व संस्कृती यांचा उद्घोष केला. आंदोलन सुरू झाले. याह्याखानाने लष्कराच्या बळावर हल्ला चिरडून टाकण्याचा निर्घृण प्रयत्न केला. शेख मुजिबुर रहमान यांनी मार्च १९७१ मध्ये बांगला देशाचे स्वातंत्र्य जाहीर करून टाकले. सोनार बांगलाचा ध्वज फडकावला !

याह्याखानाने मुजीबसाहेबांना अटक करून प. पाकिस्तानात तुरुंगात डांबले. त्यांच्यावर देशद्रोहाचा आरोप ठेवून खटलाही भरला. त्यांचा पक्ष बेकायदा ठरवून जनतेचा स्वातंत्र्यलढा लष्करी सामर्थ्याने चिरडण्यासाठी, मानवी इतिहासाने शरमेने मान खाली घालावी असा भयंकर वंशसंहार सुरू केला. खेडीपाडी, घरेदारे उध्वस्त करण्यात आली. निराधार, भयभीत बंगाली जनता साहजिकच आश्रयासाठी भारताकडे धावली. हजारो निर्वासितांचे लोंढे भारतात येऊ लागले. भारताने आलेल्या सुमारे ९० लक्ष निर्वासितांना माणुसकीला जागून आश्रय दिला. पण भारताला हा आर्थिक ताण परवडणारा व झेपणारा नव्हता. शिवाय शेजारी एवढा नरसंहार चाललेला असताना पाकिस्तानची ती अंतर्गत बाब आहे असे म्हणून स्वस्थ बसणेही भारताला शक्य नव्हते. शेख मुजिबुर रहमान यांची सुटका करावी व बंगाली जनतेचे न्याय्य हक्क त्यांना देण्यासाठी वाटाघाटी कराव्यात असे अध्यक्ष याह्याखानना भारताने आवाहन केले. परंतु सत्तापिसाट हुकूम-

शहाने ते मानले नाही. उलट भारतच पूर्व बंगालमधील लोकांना चिथावणी देत आहे, आक्रमण करीत आहे, पाकच्या अंतर्गत बाबीत ढवळाढवळ करीत आहे, असे आरोप केले.

निर्वासितांना पोसण्याचा ताण भारतावर दिवसेंदिवस वाढत होता. इंदिराजींनी ही वस्तुस्थिती जगातल्या राष्ट्रांसमोर मांडली. नव्वद लक्ष निर्वासित भारतात लोटून पाकिस्ताननेच कसे आक्रमण केले आहे हे दाखवून दिले. परंतु बडी समजली जाणारी राष्ट्रेही कशी क्षुद्र मनोवृत्तीची व स्वार्थी असतात याचे या निमित्ताने पुनः एकदा हिडीस दर्शन झाले. भारताच्या हाकेला साथ न देता अमेरिका, चीन इत्यादी राष्ट्रांनी पाकिस्तानच्या हाकाटीला उचलून धरले. प्रचंड मानवी संहार होत असतानाही पाकिस्तानला शस्त्रास्त्रांची मदत चालू ठेवली. काही राष्ट्रांनी सोयीस्करपणे हा अंतर्गत प्रश्न आहे म्हणून पाठ फिरवली आणि भारतावर ठपका ठेवला.

पाकिस्तानने भारताच्या सरहद्दीवर फौजा आणून उभ्या केल्या. युद्धाच्या धमक्या देणे सुरूच होते.

निर्वासितांचा प्रश्न समोर असतानाच देशरक्षणाचाही प्रश्न पुढे आला, इंदिराजींनी भारतीय फौजाही सरहद्दीवर नेऊन ठेवल्या. पाकने 'भारत आक्रमण करतो' अशी ओरड केली. तेव्हा इंदिराजींनी सांगितले, "भारताला कुणावरही आक्रमण करायचे नसून, कुणी आक्रमण केल्यास त्यापासून संरक्षण करायचे आहे व तो त्याचा हक्क आणि कर्तव्य आहे." मोठमोठ्या राष्ट्रांनी कोरडे उपदेश केले, धमक्या दिल्या. दबाव आणले; पण इंदिराजींनी त्यांना जराही भीक घातली नाही.

देशात 'बांगला देशाला मान्यता द्या!' असा विरोधी पक्षांचा तगादा सुरूच होता. तशात ९ ऑगस्ट १९७१ रोजी 'भारत-रशिया-मैत्री करार' झाला. विरोधकांनी कठोर टीका सुरू केली. पण दूरदृष्टीच्या

इंदिराजींनी हा करार करून भारताला एक समर्थ मित्र मिळवला होता. हे पुढील काही महिन्यांतच सिद्ध झाले.

बंगालचे हत्याकांड सुरूच होते. निर्वासितांची आवक चालूच होती. आणि युद्धखोर पाकिस्तान धमक्या देऊन रोज काही ना काही कुरापती काढीतच होते. युद्धाचा भडका केव्हा उडेल याचा नेम राहिलेला नव्हता.

एक प्रयत्न म्हणून, सर्व परिस्थितीची जगातील राष्ट्रप्रमुखांना स्पष्ट जाणीव द्यावी या इराद्याने इंदिराजींनी २४ ऑक्टोबर ते १३ नोव्हेंबर १९७१ पर्यंत तीन आठवड्यांचा परदेशांचा दौरा केला. या दौऱ्यावर निघण्यापूर्वी त्यांनी देशाला उद्देशून नभोवाणीवर भाषण केले आणि आक्रमणाला तोंड देण्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले.

जर्मनी, फ्रान्स, ब्रिटन यांनी भारताची बाजू काळजीपूर्वक ऐकली, पण अमेरिकेने भारत विरोधाचेच पाऊल उचलले होते! चीनची त्याला साथ होती. रशिया व पोलंड या राष्ट्रांनी मात्र भारताला पाठिंबा दिला.

तिकडे याह्याखानच्या युद्ध धमक्या चालूच होत्या. दहा दिवसात युद्ध होईल असाही त्याने २६ नोव्हेंबरला दम दिला. पण या दमबाजीकडे दुर्लक्ष करून ज्या देशांनी भारतालाच नीतिपाठ देण्यास सुरुवात केली, त्या ब्रिटनसारख्या देशालाही, "समुद्राच्या पलीकडे हजारो मैलांवर बसून उपदेश करण्याचे दिवस आता राहिले नाहीत!" असा खणखणीत इशारा इंदिराजींनी दिला.

आणीबाणीची परिस्थिती जाहीर करून पाकने युद्ध हालचाली वाढवल्या. भारत कसल्याही प्रसंगाला तोंड द्यायला सज्ज होता.

अखेरीस ३ डिसेंबर १९७१ रोजी सायंकाळी पाकिस्तानने काश्मीर, राजस्थान आणि पंजाब या राज्यातील हवाई तळावर हल्ले चढवून भारताच्या विरोधी युद्ध पुकारले!

भारताला ह्या हल्ल्यांचा प्रतिकार करणे भागच होते. इंदिराजींच्या

सल्यावरून त्याच रात्री राष्ट्रपतींनी आणीबाणी घोषित केली. त्यांच्या घोषणेनंतर मध्यरात्री इंदिराजींनी राष्ट्राला उद्देशून नभोवाणीवरून भाषण केले. त्या म्हणाल्या,

"शुक्रवारच्या सायंकाळच्या बेछुट बॉम्बफेकीने पाकिस्तानने भारताविरुद्ध सर्वंकष युद्ध पुकारले असून पाकिस्तानचे बांगला देशातील युद्ध हे आता भारतविरोधी युद्ध झालेले आहे. पाकिस्तानचे नवे प्रक्षोभक आक्रमण परतवून लावण्यासाठी सारे राष्ट्र युद्धपातळीवरून प्रयत्न करील!"

भारत-पाक-युद्धाला तोंड लागले. भारतीय जवान प्राणपणाने शत्रूशी लढू लागले. पंतप्रधानांच्या प्रयत्नाला सर्व विरोधी पक्षांनी मतभेद विसरून पाठिंबा दिला. जनसंघाचे अध्यक्ष श्री. अटलबिहारी वाजपेयी म्हणाले, "पंतप्रधान इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली सारे राष्ट्र हा आता एक पक्ष बनला आहे. आमच्या एकमेव नेत्या इंदिरा गांधी आहेत."

सर्व देशभर हीच भावना पसरली. एक देश, एक जनता, एक नेता, एक पक्ष—असे दृश्य दिसले! आघाडीवर तिन्ही सैन्यदलांचे जवान शौर्य गाजवीत होते. शत्रूला पिटाळून लावीत होते. पाकची कितीतरी विमाने, रणगाडे हिंदी सेनेने नष्ट करून टाकली. नौदलाने कराची बंदरात धडक देऊन शत्रूचे आरमारी सामर्थ्य खलास केले. प्रचंड युद्धनौका बुडविल्या. सर्व आघाडीवरच शत्रूची दाणादाण उडाली!

युद्ध सुरू असतानाच इंदिराजींनी लोकसभेत ६ डिसेंबर १९७१ रोजी 'बांगला देश' ला भारताची मान्यता जाहीर केली.

युद्ध सुरू झाल्याबरोबर मात्र अमेरिका व इतर राष्ट्रांनी धावपळ सुरू केली. यूनोच्या सुरक्षामंडळाची तातडीची बैठक बोलावली. युद्धबंदीचा ठराव अमेरिकेने मांडला, चीन व इतर राष्ट्रांनी त्याला पाठिंबा दिला; पण रशियाने नकाराधिकार वापरून तो ठराव फेटाळला! भारत-पाक युद्धात

बाहेरच्या देशांनी हस्तक्षेप करू नये असा इशाराही रशियाने दिला. यूनो आमसभेत युद्धबंदीचा ठराव पास झाला. परंतु भारताने तो फेटाळला. त्या नंतर अमेरिकेने पुनः सुरक्षा मंडळात ठराव आणल्यावर रशियाने दुसऱ्यांदा नकाराधिकार वापरून तो फेटाळला! अमेरिकेने व जपानने भारतावर दबाव आणण्यासाठी आर्थिक मदत बंद केल्याची घोषणा केली. इंदिराजी म्हणाल्या, "परराष्ट्रांनी मदत दिली तर आम्ही तिचे स्वागतच करू; पण त्या मदतीमुळे भारताच्या स्वातंत्र्यावर मर्यादा पडणार असेल तर आम्ही मदतीशिवाय निभावून नेऊ शकतो!" कसल्याही प्रकारच्या धाकदपटशाला, अडवणुकीला किंवा दबावाला इंदिराजींनी या वेळी भीक घातली नाही. अत्यंत तेजस्वीपणाने आणि बाणेदारपणाने त्यांनी धैर्याने राष्ट्राचे नेतृत्व केले. त्यामुळे लढणाऱ्या जवानांचे आणि देशातील कोट्यावधी जनतेचे मनोधैर्य अत्यंत खंबीर राहिले. भारतीय सेनेच्या पराक्रमाने सारे जग स्तिमित झाले!

इंदिराजी म्हणाल्या, "आमच्याजवळ धन नसेल, शस्त्रास्त्रे नसतील, पण न्याय आणि आमचा आत्मा जिवंत आहे. सत्य हेच आमचे बळ आहे."

याच बळावर भारतीय सेनेने अपूर्व पराक्रम केला आणि १६ डिसेंबर १९७१ रोजी बांगला देश शत्रूच्या ताब्यातून घेतला! पाकिस्तानी सेनानीने शस्त्रे खाली ठेवून डाक्क्यात शरणागती पत्करली!

इंदिराजींनी पश्चिम आघाडीवरही तातडीने युद्धबंदी जाहीर केली. या त्यांच्या निर्णयाने तर अवघे जग चकित झाले! इंदिराजींच्या संयमपूर्ण नेतृत्वाचा आणि मुत्सद्देगिरीचा गौरव सर्व जगाने केला. एक समर्थ राष्ट्र म्हणून भारताला प्रतिष्ठा लाभली. स्व-सामर्थ्याची ओळख भारताला प्रथमच झाली.

१८ डिसेंबर १९७१ रोजी राष्ट्रपतींनी 'भारतरत्न' हा सर्वोच्च किताब देऊन इंदिराजींच्या दैदीप्यमान कर्तृत्वाचा यथोचित गौरव केला.

८ जानेवारी १९७२ रोजी पाकिस्तानी कैदेतून मुक्त झालेले शेख मुजीबुर रहमान लंडनहून नवी दिल्ली येथे आले. राष्ट्रपतींनी, पंतप्रधानांनी व भारतीय जनतेने त्यांचे प्रचंड स्वागत केले. शेखसाहेबांनी भारतदेशाविषयी आपली कृतज्ञता व्यक्त केली. इंदिराजींचा गौरव त्यांनी 'मानवतेच्या माता!' अशा शब्दांत केला. त्याच दिवशी ते डाक्का येथे गेले. आपल्या प्रिय नेत्याचे, वंगबंधु शेख मुजीब यांचे बंगाली जनतेने भव्य स्वागत केले.

मुजीब साहेबांनी नंतर बांगला देशाच्या पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली. पुनर्रचनेच्या कामाला ते लागले. जगातल्या अनेक राष्ट्रांनी बांगला देशला मान्यता दिली.

थोडे स्थिरस्थावर झाल्यावर १२ मार्च रोजी भारताने बांगला देशमधून आपली सेना मागे घेतली. १७ मार्चला इंदिराजींनी डाक्क्याला सदिच्छा भेट दिली. १९ मार्चला इंदिराजी आणि शेख मुजिबुर रहमान यांनी दोन्ही देशांतील शांतता, मैत्री व सहजीवनाच्या करारावर सह्या केल्या.

दरम्यान फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात लोकसभेशिवाय भारताच्या पाचव्या सार्वत्रिक निवडणुकी झाल्या. विधानसभेच्या एकूण २६६८ जागांपैकी कॉंग्रेसला १८८० जागा मिळाल्या. मेघालय, मणिपूर, व गोवा हे प्रदेश सोडून कॉंग्रेसला सर्वत्र बहुमत मिळाले. केरळ व मद्रासमध्ये विरोधी पक्षांची मंत्रिमंडळे होतीच. या निवडणुकीने पुनश्च एकदा कॉंग्रेसच्या हाती घवघवीत सत्ता आली. इंदिराजींच्या कर्तृत्वाचाच हा विजय होता. विरोधी पक्षांची स्थिती फारच खालावल्यासारखी झाली.

निवडणुक काळात जनतेला दिलेल्या वचनांची पूर्ती करण्याचा कार्यक्रम नंतर सरकारने हाती घेतला आहे. चौथी पंचवार्षिक योजना कार्यान्वित झालेली आहे.

पाकिस्तानात युद्धानंतर बरेच बदल घडून आले. याह्याखान नजरकैदेत अडकले नि झुल्फिकार अली भुट्टो हे अध्यक्षपदी आले. पाकिस्तानी युद्ध-

कैद्यांचा व जिंकलेल्या प्रदेशाचा प्रश्न ते वारंवार उपस्थित करीत राहिले. युद्ध-कैद्यांचा प्रश्न बांगला देशच्या सहकार्यानेच भारत सोडवील असे सांगितले आहे. पण भुट्टो अजून बांगला देशला मान्यता देण्यास तयार नाहीत. आणि ते जोवर मान्यता देत नाहीत तोवर पाकिस्तानशी वाटाघाटी करणार नाही अशी भूमिका शेख मुजिबुर रहमान यांनी घेतली आहे. त्यांच्या ताब्यात असलेल्या युद्धगुन्हेगारांवर खटले भरण्याचा निर्णयही त्यांनी घेतला आहे.

बऱ्याच पत्रोत्तरांनंतर युद्धकैद्यांच्या प्रश्नाखेरीज इतर सर्व प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी २८ जून १९७२ रोजी सिमला येथे इंदिरा गांधी व भुट्टो यांच्यात शिखर वाटाघाटी सुरू झाल्या आणि २ जुलै रोजी सिमला करारावर दोघांनी सह्या केल्या. या करारान्वये भारत व पाकिस्तान या देशांतील कोणताही तंटा सोडवण्यासाठी कोणत्याही पक्षाने सामर्थ्याचा वापर करावयाचा नाही व सर्व अनिर्णित प्रश्न द्विपक्षीय वाटाघाटींनी व शांततापूर्ण मार्गानेच सोडवावयाचे असे ठरले.

तसेच परस्परांच्या प्रदेशातील फौजा मागे घ्याव्यात, मात्र काश्मीरात १७ डिसेंबर रोजी झालेल्या युद्धविरामाच्या वेळी अस्तित्वात असलेल्या नियंत्रण रेषेवरच सध्या फौजा रहाव्यात असे ठरले.

परकीय तिसऱ्या राष्ट्राच्या हस्तक्षेपाशिवाय हा करार झाला हे याचे एक वैशिष्ट्य म्हणता येईल. भारतात जनसंघाशिवाय सर्व राजकीय पक्षांनी व राजाजी, विनोबा व जयप्रकाश यांच्यासारख्या मान्यवर विचारवंतांनीही सिमला कराराचे स्वागत केले. परराष्ट्रांनी आनंद प्रदर्शित केला. जनसंघाने मात्र कराराच्या विरोधी सत्याग्रह सुरू केला. प्रचार सभा घेतल्या. पत्रके काढली.

भारताच्या लोकसभेने व पाकिस्तानच्या नॅशनल असेंब्लीनेही करारास बहुमताने पाठिंबा दिला. २८ जुलै १९७२ रोजी राष्ट्रपती गिरी यांनी कराराला मान्यता दिली. कराराचे यशापयश भावी काळात दिसून येईल.

१५ ऑगस्ट १९७२ चा दिवस उगवला !

भारतीय स्वातंत्र्य २५ वर्षांचे झाले !

स्वातंत्र्याची रजत जयंती भारत साजरी करीत आहे.

या २५ वर्षांत भारताने बरीच मजल मारलेली आहे, पण अद्याप पुष्कळच कमवायचे आहे ! जे कमावले आहे ते लोकसंख्येच्या प्रमाणात अल्प आहे. दारिद्य, गरीबी-पूर्णपणे हटलेली नाही. सामाजिक समताही पुरती प्रस्थापित झालेली नाही. परंतु प्रगतीचे चक्र फिरत आहे. विकासाचा रथ वाटचाल करीत आहे. राष्ट्राच्या जीवनात पंचवीस वर्षांचा कालखंडही अल्प असतो. लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, विज्ञानाभिमुखता, शांती, सहजीवन ह्या मार्गाने भारत सर्वांगीण समृद्धीच्या ध्येयाकडे जाई-लच जाईल !

भारतीय स्वातंत्र्य चिरायू होवो !

☆ ☆ ☆

म. ग्रं. सं, ठाणे, वाचनालय शाखा
बाल वाङ्मय विभाग
दा, क्र. ...६९८ दिनांक
विषय ...किशोर क्र... ३९५.

BVBK-0400818

* * *

मंगल पांडेने १८५७ च्या स्वातंत्र्यसमराचा
शुभारंभ केला आणि स्वातंत्र्याच्या
प्रभातकालाची चाहूल लागली.
देशात एक प्रचंड उत्थान निर्माण झाले.

१८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामापासून
लोकमान्य टिळकांच्या अस्ताबरोबर
संपलेल्या स्वातंत्र्य लढ्याच्या एका पर्वाचा
ललित इतिहास

याच पुस्तकाबरोबर प्रकाशित झालेल्या
**असा झुंजला माझा भारत**
या पुस्तकात
श्री. राजा मंगळवेढेकर यांनी
शब्दांकित केलेला आहे.

* * *

* * *

१९२० साल म्हणजे लोकमान्यांचा अस्त
आणि गांधीयुगाचा प्रारंभ.

स्वातंत्र्यासाठी संपूर्ण देशव्यापी आंदोलन
महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली सुरू झाले.
अनेक भारतीय नररत्ने
या लढ्यात अग्रभागी चमकू लागली
आणि १५ ऑगस्ट १९४७ या दिवशी
भारत स्वतंत्र झाला !

भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाचा हा
ललित इतिहास

**स्वतंत्र झाला माझा भारत**

या उत्तरार्धात
श्री. राजा मंगळवेढेकर यांनी
शब्दांकित केलेला आहे.

* * *

अनिरुद्ध साहित्य

## नवी प्रकाशने

### टेलिव्हिजन

महाराष्ट्र राज्य पारितोषिक विजेते पुस्तक

रमेश के. सहस्रबुद्धे

### महासागर

सागर विज्ञानावरील पहिलाच मराठी ग्रंथ

विद्याधर सहस्रबुद्धे

### सोनेरी जयगाथा

बांगला देश लढ्याची कुमारांसाठी स्फूर्तिदायक कथा

वि. के. फडके

## छापत आहोत

### सोन्याची कथा

लोभस सोन्याची चित्ताकर्षक ओळख

दि. बा. मोकाशी

### भारताची विज्ञानभूषणे

भारतीय शास्त्रज्ञांची ललित चरित्रे

प्रा. ना. वा. कोगेकर